म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. २९०३
REFBK-0023352

वाङ्मय परिषद्

२।८७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

ना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे,
न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा
ी भरावी लागेल.

2 MAR 1986

6 MAR 1986

( क्रु. मा. प. )
५०००-४-८०

संदर्भ निबंध
2003
23352

मोरोपंत

# विराटपर्व

## एक विवेचन

कविवर्य मोरोपंत यांच्या काव्याच्या संदर्भात
विराटपर्वाचा मार्मिक, अभ्यासू व रसग्रहणात्मक परिचय

लेखक
डॉ. प्र. न. जोशी

REFBK-0023352

मूल्य सहा रुपये

नूतन प्रकाशन, पुणे ३०

प्रकाशन क्र. ६

प्रकाशक :
गो. के. जोगळेकर,
नूतन प्रकाशन
२१८१ सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

© डॉ. प्र. न. जोशी

पहिली आवृत्ती : १९७५

मुद्रक :
म. बा. जोशी,
ज्ञानविलास छापखाना,
२७ बुधवार पेठ,
पुणे ४११००२

## दन

कवविर्य मोरोपंत पराडकर हे पेशवाईअखेरचे एक अग्रगण्य
ाकवी. स्वराज्यकाळात आख्यानक कवितेचा जो विकास झाला,
ार कळसरूपाने शोभणारे मोरोपंत. मोरोपंत समकालीनांत
ाके लोकप्रिय तितकेच ते नंतरच्या पंडिती काव्यधारेसही पूज्य.
ांच्या कवितेचे गुणदोष काळाच्या संदर्भात पाहावयास हवेत.
ारामतीसारख्या गावी राहून स्वतःच्या हयातीतच आपल्या कवितेस
सिक पंडितांकडून मान्यता मिळाल्याचे भाग्य मोरोपंतांना लाभले
ोते. त्यांची रचना क्लिष्ट असेल, कमालीची संस्कृतनिष्ठ असेल,
ण अशाच प्रकारच्या काव्याची मागणी रसिकांकडून त्या काळी
होती हे विसरून चालणार नाही. रामायण, महाभारत, भागवत
इत्यादी संस्कृत कथाग्रंथांतील बहुतेक साऱ्या कथा त्यांनी मराठीत
आर्या वृत्तात आणल्या. 'आर्या मयूरपंतांची' अशी लोकप्रियता
त्यांना लाभली.

मोरोपंत हे कवीच नव्हेत, येथपासून ते एक थोर दर्जाचे महा॰
कवी होते; असा त्यांच्या कवितेचा परामर्श आजवर घेतला गेला
आहे. या सर्व समीक्षेच्या संदर्भात मोरोपंतांच्या महाभारतातील
'विराटपर्वाचा' हा वाङ्मयीन परिचय रसग्रहणात्मक व विवेचनात्मक
असल्याने प्राचीन मराठी पंडितकवींच्या अभ्यासकांना महत्त्वाचा
वाटेल अशी आशा आहे. 'नूतन प्रकाशन'चे श्री. गो. के. जोगळेकर
यांनी मोठ्या उत्साहाने या पुस्तकाचे प्रकाशन केले आहे.
'ज्ञानविलास' छापखान्याचे श्री. मधुकरपंत जोशी व रा. प्रकाशराव
जोशी या पितापुत्रांनी सुबक मुद्रण करून दिले. या लहानशा
पुस्तकाचा लाभ विद्यार्थी व अध्यापक यांना होईल असा विश्वास
वाटतो.

—प्र. न. जोशी

# विषयानुक्रम


१. प्राचीन मराठी काव्याचे दुहेरी रूप ...

२. मोरोपंतांचे काव्यकर्तृत्व ...

३. पंतांचे कथनकौशल्य ...

४. विराटपर्वातील कथाविषय ...

५. विराटपर्वातील स्वभावचित्रण ...

६. पंतांची संवादकुशलता ... ४८

७. विराटपर्वातील रसाविष्कार ... ५२

८. पंतांचे कल्पनावैभव–अलंकार ... ५८

९. पंतांचे भाषाविशेष ... ६६

१०. मुक्तेश्वर व मोरोपंत ... ७०

११. आख्यानपरंपरेत मोरोपंत ... ७९

परिशिष्ट १ : विराटपर्व : अध्यायवार कथाविषय ... ८९

परिशिष्ट २ : अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ ... ९१

२००३
२३३५२
निबंध
२८१९२१९

# १ प्राचीन मराठी काव्याचे दुहेरी रूप

कविवर्य मोरोपंत हे पंडितकवींचे मुकुटमणी मानले जातात. पंडिती काव्याचे गुणविशेष पाहाण्यापूर्वी एकंदर प्राचीन मराठी काव्याची परंपराच थोडक्यात पाहाणे उद्‌बोधक ठरेल. प्राचीन मराठी काव्याचा उदय सुमारे सातशे वर्षांपूर्वीचा आहे. ज्या एका ग्रंथाचा फार मोठा प्रभाव मराठी जन-मानसावर पडला व ज्याची एक परंपराच पुढे निर्माण झाली असा एक ग्रंथ शके १२१२ मध्ये म्हणजे सन १२९० मध्ये निर्माण झाला. हा ग्रंथ मराठी भाषेत व ओवी वृत्तात असून त्यात भगवद्‌गीतेवर भाष्य आहे. हा ग्रंथ ज्ञानेश्वरांनी श्रोत्यांसमोर सांगितला. काव्य, तत्त्वज्ञान, भक्तिभाव, सदा-चारनिरूपण इत्यादी बाबतींत या ग्रंथाने जी श्रेष्ठता मिळविली तिला इतरत्र तुलना नाही. या ग्रंथाचे नाव ज्ञानेश्वरी अथवा भावार्थ-दीपिका असून महाराष्ट्राच्या संस्कृतीच्या जडणघडणीत याचा मोठाच वाटा आहे. हजारो नव्हे लाखो लोकांनी 'माऊली' म्हणून या ग्रंथास व ग्रंथकारास हृदयात स्थान दिले आहे.

श्रीज्ञानेश्वरांनी या आपल्या गीताटीकेच्या रूपाने महाराष्ट्रातील भागवतधर्मास तात्त्विक अधिष्ठान प्राप्त करून दिले. 'ज्ञानदेवें रचिला पाया' असे म्हटले जाते. आधीच असलेल्या भागवतधर्माचे तात्त्विक स्वरूप स्पष्ट करून ज्ञानेश्वरांनी पंथाची बांधणी बळकट केली. कर्मकांड, व्रतेवैकल्ये, यज्ञयाग, जादूटोणा, सोवळेओवळे इत्यादी बाह्योपचारांत अडकलेला धर्म ज्ञानेश्वरांनी मुक्त केला. शुद्ध प्रेमतत्त्वावर व मानवी बंधुत्वावर त्यांनी एका नव्याच भागवतधर्माची इमारत उभी केली. नामस्मरण, सदाचार, हरिकीर्तन व भजन, सद्‌ग्रंथांचे श्रवण, संतसहवास, अशा सुलभ मार्गांची निर्मिती ज्ञानेश्वरांनी केली. मूठभर लोकांच्या स्वाधीन असलेली व संस्कृत

भाषेत जखडलेली आत्मविद्या त्यांनी बहुजनसमाजासाठी खुली केली.मराठी भाषेत ओव्या लिहून प्रथमच त्यांनी ब्रह्मविद्येचा सुकाळ करून सोडला. आबालवृद्धांना व स्त्रीशूद्रादिकांना ब्रह्मज्ञानाचे द्वार खुले करून ज्ञानेश्वरांनी एक प्रकारची सामाजिक क्रांतीच केली. ' म्हणोनि कुळ जाति वर्ण । हें आघवेंचि गा अकारण । एथ अर्जुना माझेंपण । सार्थक एक ॥...तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया । कां शूद्र अंत्यजादि इया । जाती तंवचि वेगळालिया । जंव न पवती मातें ॥ ' (ज्ञानेश्वरी : ९. ४५६–६०). ' मग जातीं व्यक्तीं पडे बिंदुलें । जेव्हां भाव होती मज मीनले । जैसे लवणकण घातले । सागरामाजीं ॥' (९.४६१) अशा प्रकारची ग्वाही ज्ञानेश्वरांनी दिलेली असल्याने परमार्थाच्या क्षेत्रात तरी जातिजातीमधील दुरावा कमी होत गेला. आत्मज्ञान मराठी भाषेत काव्यरूपाने अवतरू शकते, हा फार मोठा प्रत्यय येत राहिला. पुन: हे आत्मज्ञान नाना जातिजमातींत फुलू शकते, याचाही प्रत्यय गोरा कुंभार, नरहरी सोनार, सावता माळी, सेना न्हावी, चोखा महार, दासी जनी इत्यादींच्या रूपांनी येत राहिला. सगुणप्रेमी नामदेवांनी तर भक्तितत्त्वाची एक नवी परिभाषाच तयार केली. 'अनुभवामृत', ' चांगदेवपासष्टी' हे आणखी काही ग्रंथ ज्ञानेश्वरांनी निखळ स्वानुभवपर तत्त्वज्ञान सांगण्यासाठी मराठी भाषेत सांगितले.

प्राचीन मराठी काव्याची परंपरा पाहाताना आपण ज्ञानेश्वरांचा प्रथम उल्लेख केला हे खरे. परंतु काटेकोरपणे पाहिल्यास मराठीतील आद्यकवीचा मान मुकुंदराज कवीस द्यावयास हवा. ज्ञानेश्वरीच्या आधी सुमारे शंभर वर्षे म्हणजे शके १११० मध्ये मुकुंदराजांचा ' विवेकसिंधु ' तयार झालेला दिसतो. वेदान्त, तत्त्वज्ञान व विवेकवैराग्य यांचे विवरण करणारा हा ग्रंथ मराठीमधील पहिला काव्यग्रंथ म्हणून प्रसिद्ध आहे. ज्ञानेश्वरांच्या अनुभवामृतावर या विवेकसिंधूचा बराच प्रभाव दिसतो. मुकुंदराजांनीच ' परमामृत ' या नावाचा आणखी एक छोटा काव्यग्रंथ मराठी भाषेत वेदान्तनिरूपणासाठी लिहिलेला आहे. महावाक्यांचा बोध, जीवाशिवाचे ऐक्य, सच्चिदानंदपद, वैराग्यनिरूपण इत्यादी अनेक विषयांचे विवेचन मुकुंदराजांनी आपल्या ग्रंथांतून केले आहे.

मुकुंदराज, ज्ञानेश्वर हे प्रथम तत्त्वविवेचक होते. साक्षात्कारी सत्पुरुष होते. स्वतःला झालेल्या आत्मसुखाच्या लाभाचा वाटा इतर जिज्ञासूंना मिळावा म्हणून त्यांनी ग्रंथरचना सुमारे सातआठशे वर्षांपूर्वी केली. परमार्थाचे, वेदान्ताचे, अध्यात्माचे तत्त्वज्ञान समाजातील सर्व स्तरांवरील माणसांना सुलभ व्हावे म्हणून ते त्यांनी देशी म्हणजे मराठी भाषेत आणले. आणि हीच परंपरा पुढे पाचसहा शतके वाढीस लागली. सर्वसामान्य जिज्ञासू लोकांना हे तत्त्वज्ञान गोचर व्हावे, सावयव व्हावे म्हणून या साक्षात्कारी पुरुषांनी ते आपल्या प्रतिमेच्या बळाने काव्यरूपात उभे केले, उपमादृष्टान्तांनी खुलविले, नटविले. ज्ञानेश्वर–नामदेव यांनी भक्तिप्रेमाचे तत्त्वज्ञान ओवी व अभंग या खास मराठी वृत्तांत सांगून सर्व जनतेसमोर उभे केले. ज्याला म्हणून जिज्ञासा होती त्याला भाषेची, जातीची, वयाची, धंद्याची बंधने उरली नाहीत. मुकुंदराज, ज्ञानेश्वर, नामदेव इत्यादी तत्त्वचिंतकांची व प्रेमी भक्तांची परंपरा पुढे एकनाथानंतर चांगलीच विकसित झाली.

ज्ञानेश्वरांच्या समाधीनंतर तेराव्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रात एक प्रकारचे धार्मिक व राजकीय अराजक माजले. देवगिरी येथील मराठी राज्य संपुष्टात येऊन महाराष्ट्राच्या फार मोठ्या भूमीवर मुसलमानी राजसत्ता सुरू झाली. धर्माची, संस्कृतीची, विद्येची पडझड फार मोठ्या प्रमाणावर झाली. दीर्घायुषी नामदेवांनी सन १३५० साली समाधी घेतली. त्यांनी या विपरीत काळाचा अनुभव घेतला असावा. ज्ञानेश्वरानंतरच्या या अराजकाचा काळ सुमारे दोनशे वर्षांचा आहे. या कालखंडात सत्यमलनाथाचा ‘ललितप्रबंध’, चोंभा कवीचे ‘उखाहरण’, अज्ञातसिद्धाचा ‘वरदनागेश’, बहिरापिसाची भागवतटीका, कान्हूपात्रेचे स्फुट अभंग, भानुदासांचे काही अभंग, अशी तुरळक रचना आढळते. इस्लामी संस्कृतीचा ऐन भर असताना दत्तोपासना प्रसारित करणारे श्रीपादवल्लभ व श्रीनृसिंहसरस्वती या दोन अवतारी पुरुषांनी धर्मसंस्कृतीच्या, पर्यायाने समाजाच्या रक्षणाचे कार्य केले. सरस्वती गंगाधर यांच्या ‘श्रीगुरुचरित्र’ या ग्रंथात या दोन पुरुषश्रेष्ठांचेच अवतारकार्य ओवीवृत्तात कथन केले आहे.

ज्ञानेश्वरांच्या भागवतधर्माची पडझड सावरून धरली ती सन १५३२ साली जन्मलेल्या एकनाथांनी. देवगिरीवरील जनार्दनस्वामींचा उपदेश एकनाथांना होता. एकनाथांची दत्तोपासना पुढे विठ्ठलप्रेमात रंगून गेली. दत्त-विठ्ठल यांचे ऐक्य त्यांनी अनुभविले. एकनाथांनी ज्ञानेश्वरीचे संशोधन करून एक पाठशुद्ध संहिता लोकांसमोर ठेविली. श्रीकृष्णाने उद्धवास केलेला उपदेश त्यांनी आपल्या भागवतटीकेत मराठी लोकांसाठी साकार केला. ' चतुःश्लोकी भागवत ' नावाचा एक ग्रंथ एकनाथांचा प्रसिद्ध आहेच. पण भागवताच्या एकादश स्कंधावरील नाथांची मराठी टीका वीस हजार ओव्यांची असून ज्ञानेश्वरीच्या खालोखाल भागवतधर्मीयांत तिला मान आहे. श्रीकृष्णकथांच्या माध्यमातून नाथांनी भक्तिप्रेमाचे व विवेकवैराग्याचे निरूपण केले आहे. नाथांचे ' भावार्थ रामायण' ही असेच लोकप्रिय आहे. रुक्मिणीस्वयंवर, हस्तामलकटीका, चिरंजीवपद, आनंदलहरी, शुकाष्टक-टीका, आत्मबोध, अनुभवानंद इत्यादी लहानमोठी प्रकरणे लिहून एक-नाथांनी भक्तिप्रेमाचे, वेदान्ताचे, आत्मबोधाचे विवरण केले आहे. नाथांचे अभंगवाङ्मयही असेच समृद्धीने व विविधतेने नटले आहे. आत्मज्ञान, रंजकता, विनोद, नाट्य इत्यादी गुणांनी त्यांची भारुडे मराठी काव्याच्या इतिहासात विशेष रूपाने प्रसिद्धीस आली आहेत.

एकनाथ सन १५९९ साली समाधिस्थ झाले. त्यानंतर नऊच वर्षांनी दोन श्रेष्ठ सत्पुरुष महाराष्ट्रात जन्मास आले. इंद्रायणीच्या तीरावर वसलेल्या देहू गावी तुकाराम महाराजांचा जन्म सन १६०८ मध्ये झाला. तुकारामांची जात शूद्र, कुणबी, व्यवसाय वाण्याचा; परंतु हरिकृपेचा उमाळा एवढा मोठा की,' संसाराच्या तापें तापलों मी देवा ' येथपासून प्रवास करून त्यांनी ' तुका झाला पांडुरंग ' या अवस्थेपर्यंत मजल गाठली. प्रपंचातून, व्यवसायातून त्यांचे मन उठले. वैराग्य, नामस्मरण, एकान्तवास, हरिकीर्तन, सत्संग, सद्ग्रंथाचे चिंतन यांचेच व्यसन त्यांना लागले. भंडाऱ्याच्या डोंगरा-वरील एकान्तवासात वृक्षवल्लींच्या सोबतीने हरिचिंतन करीत असताना त्यांच्यावर सद्गुरूंची कृपा झाली. त्यांना कवित्वाची स्फूर्ती झाली. आणि मराठी भाषेतील अभंगवाणी सतेज व टवटवीत बनली. विठ्ठलस्वरूप,

नामस्मरण, कीर्तन, परमेश्वराच्या भेटीसाठी व्याकुळता, त्याच्या भेटीचा आनंद, अशा विविध विषयांनी व अनुभवांनी तुकोबांचे अभंग रसाळ बनले आहेत. साध्या, सरळ पण मनाची पकड घेणाऱ्या त्यांच्या प्रेमळ व लडिवाळ वाणीने मराठी मनावर फार मोठा प्रभाव उमटविला आहे. लौकिक संसारात रमलेल्या सर्वसाधारण माणसाच्या मनास तुकारामांचे अभंग एक उच्च भूमिकेवर नेतात व अलौकिक समाधानाचा लाभ करून देतात. ढोंगी साधुसंत यांना तुकोबांनी कडवट शब्दांनी फटकारले आहे. केवळ संसार करून, स्वार्थबुद्धीने जगणाऱ्या प्रापंचिकानांही तुकोबांनी मार्गदर्शन केले आहे. दया, परोपकार, ईश्वरनिष्ठा, नामस्मरण, सदाचरण यांची शिकवण देण्यास तुकोबांचे अभंग समर्थ बनले आहेत. उच्च स्तरावर असणारे ज्ञानेश्वरांचे आत्मज्ञान तुकोबांनी आपल्या रसाळ वाणीने शेतकऱ्यांच्या बांधावर नेऊन उभे केले. जनतेच्या जिव्हाग्री असणारा तुकोबाएवढा थोर कवी मराठी भाषेत दुसरा नाही. तुकोबांच्या या परंपरेत कचेश्वर ब्रह्मे, निळोबा पिंपळनेरकर, बहिणाबाई इत्यादींचे कवित्व त्यांच्या साधुत्वाबरोबर नजरेत भरण्याजोगे आहे.

तुकाराम महाराज ज्या वर्षी जन्मले त्याच वर्षी रामदासांचा जन्म असूनही रामदासांचे कार्य मात्र काहीसे उशिरा सुरू झालेले दिसते. बारा वर्षे तपचर्या, बारा वर्षे तीर्थाटण, अशी चोवीस वर्षे समर्थांची साधनेत गेली. सारा हिंदुस्थान त्यांनी पायी हिंडून देशस्थिती, लोकस्थिती निरखून पाहिली. लोकांचा संसार, त्यांचा परमार्थ, त्यांचा लौकिक व्यवहार इत्यादींची वाताहत त्यांनी डोळ्यांनी पाहिली. अस्मानी व सुलतानी संकटांनी प्रजा कशी ग्रस्त झाली होती हे त्यांनी हेरले. या आपद्ग्रस्त लोकांना शुद्ध परमार्थाआधी प्रपंचाची, व्यवहाराची निकड असल्याचे त्यांनी ओळखले आणि आपल्या कवित्वाच्या माध्यमातून त्यांनी प्रपंचविज्ञानाची मांडमांड केली. वैराग्य, परमार्थनिरूपण, अध्यात्मविचार हे विषय त्यांना मान्य होतेच; परंतु प्रपंचाकडे सर्वसामान्य माणसाने अगदी पाठ फिरवावी हे त्यांना समकालीन देशस्थितीचा विचार करता मानवेना. म्हणून त्यांनी 'यत्न तो देव जाणावा,' आधी प्रपंच करावा नेटका ' इत्यादी वचनांतून लोकांना

ऐहिक वा लौकिक व्यवहाराचे महत्त्व पटवून दिले. 'दासबोध' हा त्यांचा एक महत्त्वाचा ग्रंथ असून त्यात ब्रह्मनिरूपण, नवविधाभक्ती, सगुणनिर्गुण, पंचीकरण, मोक्षलक्षण इत्यादी विषयांबरोबर व्यवहारकथनही आहे. या ग्रंथाखेरीज आत्माराम, मनाचे श्लोक, मानपंचक, जनस्वभावगोसावी, पंचीकरणयोग इत्यादी लहानमोठी प्रकरणे समर्थांनी लिहिलेली आहेत. समर्थ रामदास स्वामींच्या परिवारात जयरामस्वामी वडगावकर रंगनाथ-स्वामी निगडीकर, केशवस्वामी भागानगरकर, आनंदमूर्ती ब्रह्मनाळकर इत्यादी प्रसिद्ध कवी होते, समर्थांचे श्रेष्ठ बंधू रामीरामदास, दिनकर गोसावी, वेणाबाई, गिरीधर, उद्धवस्वामी, भीमस्वामी, मेरुस्वामी, आत्मारामबोवा चरेगावकर इत्यादी लहानमोठ्या कवींनी समर्थांच्या उप-देशपरंपरेत राहून कवित्वाची रचना केलेली आढळले.

मुकुंदराज–ज्ञानेश्वरांपासून रामदासांपर्यंत जे प्रमुख संतकवी झाले त्यांची कविता मुख्यतः तत्त्वनिरूपणाची आहे. वेदान्तचर्चा, परमार्थविचार, आत्मज्ञान, भक्तिसाधना इत्यादी विषयांत हे साक्षात्कारी पुरुष रंगून गेलेले दिसतात. ही संतमंडळी प्रथम संत, साक्षात्कारी असून एक साधन म्हणून त्यांनी कवितेचा आसरा घेतलेला दिसतो. ओवी, अभंग ही त्यांची खास मराठी वृत्ते होत. गीता–भागवतातील तत्त्वविचार व आत्मानुभूती हे त्यांचे विषय होते. बहुतेक संतांचे लक्ष समाजस्थितीवर होते. समाज अधोगतीला जाऊ नये, नीतिपथावर राहावा म्हणून प्रसंगी त्यांनी कडवट भाषेत समाजातील अप्रवृत्तींवर प्रहार केलेले दिसून येतात. परंतु या साक्षात्कारी संतश्रेष्ठांचे कवित्व परतत्त्वाच्या स्पर्शाने पावन झाले होते. किंबहुना या परतत्त्वाच्या स्पर्शामुळेच त्यांच्या कवित्वाचा प्रभाव जनमानसावर पडला होता. प्राचीन मराठी काव्याचा हा एक धागा साक्षात्कारी कवित्वाचा आहे. वेदान्तचर्चा, आत्मज्ञान, वैराग्यनिरूपण, मोक्षसाधना, नीती व सदाचार हे त्यांच्या कवित्वाचे विषय आहेत. संतकवी प्रथम साक्षात्कारी संत आहेत. नंतर ते कवी आहेत. संतकवींच्या शिकवणुकीचा प्रभाव जनमानसावर पडलाच. परंतु नुसते कोरडे तत्त्वज्ञान सर्वसामान्य माणसाच्या मनास रुचत नाही. वेदान्तचर्चा, आत्मज्ञान, वैराग्यनिरूपण, पंचीकरण, ब्रह्ममाया इत्यादी

विषय कितीही दृष्टांन्तांनी खुलवले तरी त्याला कोरडे वाटतात, शुष्क वाटतात, जड वाटतात. हे तत्त्वज्ञान, हे वैराग्यनिरूपण, हे आत्मज्ञान ज्या श्रेष्ठ स्त्रीपुरुषांत साकारले त्यांच्या चरित्रकथा बऱ्याच अंशी मानवी असल्यामुळे त्याच्या हृदयाचा ठाव चटकन घेतात. म्हणूनच मराठीत तत्त्वचर्चेबरोबरच कथाकाव्याचाही विकास झालेला दिसतो. कथा, आख्यान, गोष्ट यांचा लोभ मानवी मनास आरंभापासून आहे. कथा किंवा आख्यान मनाची पकड चटकन घेण्यास समर्थ असते. म्हणूनच मराठीच्या आरंमकाळापासूनच या कथांची व आख्यानांची निर्मिती झालेली दिसते. तत्त्वनिरूपण करणारे एकनाथ व ययार्थदीपिका लिहिणारे वामनपंडित यांना या आख्यानकवितेचे मर्म समजले होते. श्रीकृष्णाचे, श्रीरामाचे तत्त्वज्ञान नुसत्या निरूपणाने सांगण्यापेक्षा ते जर कथेत व आख्यानात गुंफून सांगितले तर त्याचा परिणाम चटकन अनुकूल असा होतो. याच दृष्टिकोणातून आख्यानकाव्याचा मराठीत विकास होत राहिला. कविवर्य मोरोपंत हे आख्यानकवींचे मुकुटमणी असल्यामुळे प्राचीन मराठी काव्याच्या या धाग्याचा आणखी थोडा परिचय करून घेऊ.

आख्यानक कविता मराठी काव्याच्या इतिहासात पंडिती काव्य म्हणूनही प्रसिद्ध आहे. कारण आख्यानाने वा कथा लिहिणारे कवी प्रामुख्याने पंडित होते, विद्वान होते; आणि नंतर संताचे गुणही त्यांच्यांत होते. परंतु संतत्व वा साक्षात्कार हा प्रधान गुण त्यांचा नव्हे. रामाची, कृष्णाची, हरिश्चंद्राची, कौरवपांडवांची कथा सुरसपणे सांगणे हेच या आख्यानकवींचे वा पंडितकवींचे मुख्य कार्य होते. या आख्यानक कवितेचा धागा पेशवाईत परिपुष्ट झालेला दिसत असला तरी त्याचा प्रारंभ ज्ञानेश्वरादिक संतांच्या बरोबरच झालेला दिसेल. किंबहुना कथा, गोष्ट, आख्यान यांचा लोभ सहज सुलभ मानला तर तत्त्वचर्चेच्या आधीच मानवी जीवितात कथा वा गोष्ट तयार झाली असावी. विवेकसिंधू सन ११८७-८८ मधील, ज्ञानेश्वरी सन १२९० मधील. यामधील काळात महानुभाव पंथीयांची गद्य व पद्यरचना आढळते. महदंबेचे धवळे सन १२८६ च्या सुमाराचे, केशिराजाचा मूर्तिप्रकाश सन १२८९ मधील आहे. ज्ञानेश्वरीनंतर

दोनच वर्षांनी म्हणजे सन १२९२ मध्ये नरेंद्रकवीचा 'रुक्मिणीस्वयंस्वर' नावाचा एक महत्त्वाचा काव्यग्रंथ महानुभावीय परंपरेत आढळतो. प्राचीन मराठी आख्यानकवितेचा हा प्रारंभ मोठा डौलदार, प्रगल्भ व प्रतिभासंपन्न म्हणावा लागेल. सन १३०८ मध्ये भास्करभट्टकवीचा शिशुपालवध नावाचा काव्यग्रंथ कथा सांगणाराच. याच वर्षी त्याचा 'उद्धवगीता' हा ग्रंथ तयार झाला. दामोदरपंडितांचे 'वत्सहरण' नारायण वहाळियेकृत 'श्रीऋद्धिपूरवर्णन', विश्वनाथ बाळापूरकर याचा 'ज्ञानप्रबोध', रवळो व्यासाचा 'सैह्याद्रिवर्णन' इत्यादी महानुभावीय आख्यानस्वरूपाचे काव्यग्रंथ याच सुमारास निर्माण झाले. आद्य कवयित्री महदंबा हिचे 'धवळे' अथवा 'मातृकी रुक्मिणी स्वयंवर' ही लहान प्रकरणे म्हणजे पुढे पेशवाईत निर्माण झालेल्या स्वयंस्वरकथांचे आदिस्थानच मानावे लागेल. महानुभावीय परंपरेने जशी मराठी ग्रंथांची जोपासना अगदी प्रारंभीच्या काळात केली तशीच ती कथाकाव्याच्या बाबतीतही झालेली दिसून येते.

एकनाथपूर्व काळात चोंभाकवीचे 'उखाहरण' तयार झाल्याचे मागे सांगितले आहेच. सरस्वती गंगाधराचा 'श्रीगुरुचरित्र' हा ग्रंथ तर अनेक आख्यानांनी व व्रतकथांनी भरलेला असल्यामुळेच लोकप्रिय झाला. एकनाथांच्या भागवताचा व भावार्थरामायणांचा उल्लेखही आपण मागे केला आहेच. तत्त्वनिरूपणापेक्षा देवादिकांच्या कथांत सर्वसामान्य मनुष्य रमतो व त्याच्यापुढे विशिष्ट असा आदर्शही उभा राहतो, हे एकनाथांना ते स्वतः थोर पुराणिक वा प्रवचनकार असल्याने पटले होते. हरिकथेत पूर्वरंगातील वेदान्तचर्चेनंतर उत्तररंगात आख्यान सांगण्याची पद्धतही याच कारणामुळे वाढीस लागली. एकनाथांचा नातू मुक्तेश्वर हा तर एक थोर दर्जाचा प्रतिभासंपन्न आख्यानक कवी मानला जातो. प्रसाद, प्रतिभा, अर्थवाही भाषा, निसर्गसौंदर्याची आवड यांचा प्रत्यय मुक्तेश्वरांचे कथाकाव्य वाचताना येतो. मुक्तेश्वराने महाभारताखेरीज हरिश्चंद्राख्यान, शुकरंभासंवाद, एकनाथचरित्र अशी स्फुट रचना कथात्मक पद्धतीने केलेली दिसते.

फादर स्टीफन्सचे ख्रिस्तपुराणही याच आख्यानपरंपरेत शोभून दिसणारे आहे. पुढे स्वराज्याच्या काळात या आख्यानकवितेची प्रतिष्ठा

वाढली. ती पांडित्याकडे, संस्कृतनिष्ठतेकडे झुकली. वामनपंडितांनी निरनिराळ्या संस्कृत वृत्तांत पौराणिक कथांची मराठीत रचना केली. यमक, अनुप्रास, श्लेष इत्यादी शब्दचमत्कारांचा लोभही या सुमारास वाढला. गजेंद्रमोक्ष, भरतभाव, द्वारकाविजय, राधाविलास, हरिविलास, बालक्रीडा, मृत्तिकाभक्षण इत्यादी लहानमोठ्या प्रकरणांतून वामनाची कथात्मक कविता साकारलेली आहे. नागेश, विठ्ठल, रघुनाथपंडित, सामराज, निरंजनमाधव इत्यादी पंडितकवी याच सुमाराचे. सीतास्वयंवर, रुक्मिणीस्वयंवर, बिल्हणचरित्र, नलदमयंतीस्वयंस्वराख्यान, रुक्मिणीहरण इत्यादी कथात्मक ग्रंथ या काळात तयार झाले. कृष्णदयार्णवांनी 'हरिवरदा' या आपल्या विस्तृत काव्यग्रंथात श्रीकृष्णाची कथा सांगितली. ' हरिविजय ', ' रामविजय ', ' पांडवप्रताप ' इत्यादी ओवीवृत्तात्मक कथात्मक ग्रंथ लिहून श्रीधर नाझरेकरांनी याच काळात लोकप्रियता मिळविली. ' संतलीलामृत ' ' भक्तलीलामृत ', 'संतविजय' इत्यादी ओवीबद्ध ग्रंथांतून महीपतीबोवा ताहराबादकर यांनी संतांच्या व भक्तांच्या चरित्रकथा मराठीत लिहून आख्यानपरंपरा समृद्ध केली. पेशवाईतील कथाकाव्य पांडित्याकडे, विद्वत्तेकडे झुकलेले असताना श्रीधर व महिपती यांनी ओवी वृत्ताचा पुनः स्वीकार करून सर्वसामान्य जनतेसाठी सोप्या, रसाळ व प्रसादपूर्ण भाषेत रामकृष्णांच्या व साधुसंतांच्या कथा मराठी भाषेत लिहिल्या.

रामायण, महाभारत, व भागवतादी पुराणे हे या आख्यानक कवींचे आधारग्रंथ होते. आख्यान वा कथा सांगणारे प्रथम कवी होते, पंडीत होते. साधुत्वाचा वा संतत्वाचा अंश असेल वा नसेल. परंतु बहुधा सर्व पंतकवी प्रथम कवी, पंडित होते. कोणा तरी देवतेची ते उपासना करीत. भक्तीचा आश्रय धरीत. परंतु त्यांची भूमिका प्रामुख्याने कवीची, पंडिताची होती. ऐन स्वराज्यकाळात तर मराठीमधील आख्यानककवितेचा हा धागा बराच जटिल झाला. संस्कृत वृत्ते, संस्कृत अलंकार, अवघड समाजप्रचुर शब्दरचना, कृत्रिम अशी चित्रकाव्यरचना यांनी हे पंडिती काव्य समृद्ध झाले खरे. पण ते क्लिष्टतेमुळे सर्वसामान्य माणसापासून दूर गेले. पांडित्याची. विद्वत्तेची ऐट स्वराज्यकाळात शोभली. कथाकीर्तनांचे प्रसंग या आख्यान-

कवितेने साजरे होत राहिले. एकेका श्लोकाचा वा आर्येचा अर्थ लावण्यात कथाकार व श्रोते तल्लीन झाले. हेही एक दृश्य मराठी आख्यानक कवितेच्या संदर्भात महत्त्वाचे मानावे लागेल. प्राचीन मराठी काव्याचे स्वरूप अशा प्रकारे दुहेरी होते. एक संतकाव्याचा धागा वा दुसरा पंत काव्याचा धागा. पंतकाव्याच्या धाग्यासच पंडिती काव्य, आख्यानक काव्य म्हणून ओळखले जाते. या धाग्याचे मुगुटमणी बारामतीचे मोरोपंत पराडकर होत. त्यांचा व त्यांच्या काव्यकर्तृत्वाचा थोडक्यात परिचय पुढील प्रकरणात करून घेऊ.

# २ | मोरोपंतांचे काव्यकर्तृत्व

कविवर्य मोरोपंत पराडकर यांचा जन्म सन १७२९ मध्ये कोल्हापूरजवळील पन्हाळगडावर झाला. पराडकर हे कऱ्हाडे ब्राह्मण. त्यांचा कुलस्वामी सोलापूर जिल्ह्यातील सोनारी येथील भैरवदेव हा होय. पराडकरांचे मूळगाव रत्नागिरी जिल्ह्यातील सौंदळ हे होय. या घराण्याचे मूळ पुरुष सोनोपंत. सातवे पुरुष रामजीपंत. रामजीपंतास कृष्णाजीपंत व नरसिहपंत असे दोन पुत्र. कृष्णाजीपंतास रामजीपंत व मेघश्यामपंत असे दोन पुत्र. पैकी रामजीपंत हे मोरोपंतांचे पीताजी होत. सौंदळच्या या पराडकरांच्या घराण्यात डांगी–पतकीचे वतन चालू होते. जमिनीवरील जकात घेणारे अधिकारी डांगी व समुद्रावरील जकात घेणारे पतकी. हे दोनही अधिकार पराडकरांच्याकडे असत. ऐन पेशवाईत सौंदळचे पराडकर व गोळीवलीचे पाध्ये हे सन १७१३ च्या सुमारास पन्हाळगडावर येऊन स्थायिक झाले. रामजीपंत पराडकरांचे तिसरे अपत्य म्हणजे मोरोपंत. पंतांच्या आईवडिलांची उपासना गणपतीची असल्याने त्यांचे नाव ' मयूर ' अथवा मोरोपंत ठेविले गेले. मोरोपंत हा गणेशाचा अवतार अशीही एक समजूत आहे. ' ते श्रीगुरु मोरो पंडित। गणपतीचा अवतार सत्य ' असे भक्तमंजरीत राजाराम प्रासादींनी म्हटले आहे.

मोरोपंतांचे लौकिक शिक्षण त्या काळच्या रीतीनुसार पाध्येबंधूंच्या हाताखाली झाले. केशव पाध्ये व गणेश पाध्ये हे बंधू धर्म, काव्य, मीमांसा, न्याय इत्यादी शास्त्रांत प्रवीण होते. पंतांच्या वडिलांनी म्हणजे रामजीपंतांनीही त्यांना रूपावली, समासचक्र, रामरक्षा, विष्णुसहस्रनाम इत्यादींची संथा दिली. मोरोपंतांची बुद्धी तल्लख व स्मृती चांगली असे. पंचमहाकाव्ये, पुराणे व इतर धर्मग्रंथ यांचे अध्ययन मोरोपंतांनी पाध्येबंधूंजवळ केले. पंतांचा व्यासंग वाढत राहिला. काही कारणावरून रामजीपंत पराडकर

यांना पन्हाळा सोडून बारामतीचे बाबूजी नाईक या लक्षाधीश सावकाराकडे कोठीचे अधिकारी म्हणून राहावे लागले. वयाच्या चोविसाव्या वर्षी मोरोपंतही बारामतीस येऊन स्थायिक झाले. मोरोपंतांची काव्यवृत्ती याच नाईक घराण्याच्या संसर्गात उफाळून आली. नाइकांच्या मुलींसाठी, सुनांसाठी मोरोपंतांनी सीतागीत, सावित्रीगीत, रुक्मिणीगीत, अशी लहान गाणी सुबोध व प्रसन्न भाषेत तयार केली. धनी बाबूजी नाइकांनी मोरोपंतांच्या या कवित्वाचे मनापासून कौतुक केले, उत्तेजन दिले. मोरोपंत उत्तम रीतीने पुराणही सांगत असत. रसाळपणे आख्यान रंगवून सांगण्यात त्यांना संतोष होई. भजन, पूजन, पुराणनिरूपण, भवच्चिंतन इत्यादी कार्यक्रमाबरोबरच मोरोपंतांच्या कवित्वास प्रारंभ झाला. मोरोपंतांच्या प्रारंभीच्या ओव्यांपेक्षा त्यांच्या आर्या सरस वठू लागल्या. ‘ निरंतर पाटीलेखणी हातीं । आर्याकाव्य नित्य करिती । नरनारी मुमुक्षु येती । अनुग्रह देती तयांसी ’ असे मोरोपंतांच्या कर्तृत्वाचे वर्णन राजाराम प्रसादींनी केले आहे. ‘ पंडित आणि भजनशीळ । काव्यकर्ता संत निर्मळ ’ अशी त्यांची कीर्ती त्यांच्या हयातीतच वाढू लागली. मुलाबाळांच्या, स्त्रीपुरुषांच्या तोंडांत पंतांची आर्या घोळू लागली. समकालीन हरिदास व कीर्तनकार यांच्याकडून मोरोपंतांच्या आर्यांवर कथाकीर्तने होत राहिली. रामाची उपासना, थोर चारित्र्य, पांडित्य व कवित्व यांचा दुर्मिळ मेळ, सात्त्विक कर्मनिष्ठा इत्यादी गुणांनी पंतांचे चरित्र आदर्शभूत ठरत राहिले. कवित्वाच्या क्षेत्रात, विशेषतः आख्याननिरूपणात त्यांचा हात धरणारा दुसरा कोणी कवी मराठीत नाही.

पंडितकवींचे मुकुटमणी ही सार्थ पदवी मोरोपंतांना त्यांच्या हयातीतच मिळाली. पंतांची आर्यावृत्तातील कविता सुमारे पाऊण लाखापर्यंत असावी. महाभारत (१७१७०), सर्व रामायणे (१६०००), मंत्रभागवत (३५९२), कृष्णविजय (३६६९), ब्रह्मोत्तरखंड (१२००), हरिवंश (५४४) आणि इतर अनेक स्फुट प्रकरणे मिळून पंतांचे काव्य आज आपल्यासमोर आहे. पंतांनी प्रथम प्रथमची कविता ओवी वृत्तात लिहिली असली तरी त्यांच्या काव्याचे पहिले स्फुरण आर्या वृत्तातले आहे असे एका

आख्यायिकेवरून दिसते. पंढरपुरास रेवडीकर बोवांच्या कीर्तनप्रसंगी पंतांनी

**नित्य तुम्हीं प्रभुपाशीं पेढे बर्फी नवा खवा खावा।**
**तरि म्यां एके दिवशीं रेवडिचा स्वाद कां न चाखावा ? ॥**

अशी आर्या रचल्याचे सांगितले जाते. पन्हाळगडावर असतानाच त्यांनी गणेश पाध्यांच्या आज्ञेवरून 'देवीमाहात्म्य' तयार केले असावे. ब्रह्मोत्तरखंड, भस्मासुराख्यान, कुशलवचरित्र इत्यादी काही प्रकरणे पंतांनी प्रारंभीच्या काळात लिहिली असली तरी त्यांची सतींची गाणी अधिक लोकप्रिय झाली. वर सांगितल्याप्रमाणे सीतागीत, सावित्रीगीत, रुक्मिणी-गीत इत्यादी ओवीबद्ध गीते नाइकांच्या सुनांलेकींत फारच लोकप्रिय झाली. पंतांचे कवी म्हणून नाव याच स्त्रीगीतांनी सर्वांच्या मुखांत स्थिरावले. अभंगसदृश ओवीची रचना, सुलभ व सुगम भाषा, रसानुकूल सोपी शब्दरचना आणि प्रसन्न अशी मनोवृत्ती या गीतांतून व्यक्त होत असल्याने आजही ही गीते गाताना वा म्हणताना वृत्ती तदाकार होते. या रसाळ गीतांचे काही नमुने पाहाण्यासारखे आहेत.

**यज्ञासाठी भूमि। नांगरिता धन्या।**
**सांपडली कन्या। सीतादेवी॥ १ ॥**

या पहिल्याच ओवीने स्त्रीमनावर प्रभाव पाडलेला दिसेल. रामाबरोबर वनात सीता कशी चालत होती ?

**लक्ष्मण भावोजी । मागें पुढें स्वामी । मज आहें धामीं । ऐसें वाटे ॥ ११ ॥**
**जेव्हां कांहीं वाटे । चालतां मी भागें । मुरडीनी मागें। विलोकिती ॥ १३ ॥**
**बाई ! काय सांगों। स्वामींची ती दृष्टि। अमृताची वृष्टि। मज होय ॥ १४ ॥**

रामभक्त मारुतीचे लंकेतील पराक्रम पहा.

**मज म्हणे 'चाल। बैस माझे स्कंधीं । तूं दुर्गा, मी नंदी । दास तुझा।' ॥११२॥**
**रावणें वानर । मानूनियां तुच्छ । पेटविलें पुच्छ । जाळावया ॥ ११३ ॥**

**पुच्छ पेटतांचि । हनुमंत उडे । लंकेमध्यें हुडे । वाडे जाळी ॥ ११४ ॥**
**देवांनी वदनीं । घातली आंगोळी । लंकेची रांगाळी । पाहोनियां ॥ ११५ ॥**

रचनेचा हाच सोपेपणा पंतांच्या इतर स्त्रीगीतांतही आढळतो. याच सुमारास त्यांनी मदालसाचरित्र सहा अध्यायांत व तीनशेतेहतीस आर्यांत गुंफिले. कथात्मक काव्याची, आख्यानाची आता ही सफाईदार सुरुवात होती. थोर मातेचे कर्तृत्व वर्णन करण्याच्या भरात पंत याच आख्यानात

**स्तन पाजितां निजवितां हालवितां बाळकासी खेळवितां ।**
**दे बोध, जो सुदुर्लभ थोरांसि सहस्रकल्प मेळवितां ॥**

अशी एक सुरेख आर्या सहजासहजी लिहून जातात. हरिश्चंद्राख्यान, साध्वीचा महिमा, प्रल्हादविजय अशी काही लहान प्रकरणे पंतांनी याच काळात लिहिली.

पंतांची निष्ठा रामप्रभूवर मोठीच होती. याच भक्तिभावनेतून त्यांनी रामकथा एकशे आठ वेळा गुंफण्याचा प्रयत्न केला. **मंत्ररामायण** ही पंताची पहिली रामकथा आर्यावृत्तातीलच होय. ‘मंत्रयुक्त रचिलें चरित्र भावेंचि रामरायाचें,’ असल्याने हे मंत्ररामायण होय. यात श्रीराम जयराम जयजय राम हा त्रयोदक्षरी मंत्र गुंफला आहे. ‘एका मंत्रगुणीं मी आर्यां-मुक्ताचि गुंफिल्या तेरा’ या त्यांच्याच उक्तिप्रमाणे त्यांनी एका मंत्रात तेरा आर्या या प्रमाणे सारे रामायण मंत्रबद्ध केले. पंतांचे हे काव्य १८८० आर्यांचे असून १४६ मंत्रांत ते रचिले गेले आहे. शब्दचमत्कृतीचा वा बुद्धिकौशल्याचा हा नाद आपणांस काहीसा कृत्रिम, काहीसा अनावश्यक वाटला तरी त्या वेळच्या रुचीनुसार असल्याच रचनेस महत्त्व होते हे विसरून चालणार नाही. आपले हे मंत्ररामायण का मंत्रबद्ध आहे यासंबंधी एक मजेदार उपमा देऊन पंत म्हणतात,

**नृपमुद्रांकित पत्र प्रजेसि होते जसे शिरोधार्य ।**
**प्रभुचरित मंत्रचिन्हित यास्तव धरितील मस्तकीं आर्य ॥ १० ॥**

यानंतर पंतांनी **कृष्णविजय** अथवा **बृहद्दशम** नावाचा एक गंथ नव्वद अध्यायांचा व साडेतीन हजार आर्यांत लिहिला. शृंगार, वीर, करुण इत्यादी रसांची परमोत्कट अवस्था पंतांच्या अशा आख्यानकाव्यातून प्रकटलेली आढळते. अनेक कथांतून, उपकथांतून पंतांनी श्रीकृष्णचरित्र मोठया आवडीने येथे रंगविले आहे. सुभद्रेला पाहून यतिवेषधारी पार्थाची लटपट कशी उडाली ?

**यतिदर्शना सुभद्रा येउनि बैसे निजाग्रजाजवळ ।**
**न बल प्रेक्षी परि यतिहस्तींचा पाहतां गळे कवळ ॥ १२ ॥**
**घाली दुधांत सैंधव दुग्धीं जंबीरं पायसीं कथिका ।**
**मथि कामशर जया त्या राम म्हणे साधु मोक्षसत्पथिका ॥ १३ ॥**

मोरोपंतांचे नाव आज विशेष रीतीने परिचित आहे ते त्यांच्या महाभारतावरील रचनेमुळे. पंतांच्या आधी मुक्तेश्वर, विष्णुदासनामा, श्रीधर, नरहरी मोरेश्वर, शिवकल्याण, जिवाशिवा, मालुनाथ, गीपाळकवी इत्यादींनी समग्र महाभारत मराठीत आणण्याचां प्रयत्न केला असला तरी आज लोकप्रिय रचना फक्त मुक्तेश्वर, श्रीधर व मोरोपंत यांचीच आहे. मोरोपंतांचे भारत त्यांच्या काळीच लोकप्रिय होऊन कथाकीर्तनाच्या प्रसंगी त्यांच्या आर्या म्हटल्या जाऊ लागल्या. वर्णनचातुर्य, स्वभावरेखाटण, कथानकाची गुंफण, रसपरिपोष इत्यादी बाबतींतील पंतांच्या भारताची महती विशेष आहे. कोठे संक्षेप करावा, कोठे विस्तार करावा; हे पंतांनी ओळखले होते. एक लक्ष श्लोकांचा महाभारत ग्रंथ आपण संक्षेपाने मराठीत कसा आणला यासंबंधी प्रारंभीच ते म्हणतात,

**व्यासकृत महाभारत लक्ष ग्रंथ प्रसिद्ध हा भारी ।**
**आर्यावृत्तें रचितों, स्वल्पांतचि आणितों कथा सारी ॥ १ ॥**

पंतांनी आपले भारत सुमारे सतरा हजार आर्यांत साकार केले आहे. कचोपाख्यान, शर्मिष्ठादेवयानीकलह, शकुंतलाकथा, कणिकनीती, बकासुराख्यान, वसिष्ठाची कामधेनू द्रौपदीस्वयंवर हे आदिपर्वांतील प्रसंग पंतांनी फार बहारीने वर्णन केले आहेत. वनपर्वातील रामकथा, सावित्रीकथा,

नलदमयंतीकथा चटकदार व रसाळ आहेत. विराटपर्वातील कीचकवध व उत्तरगोग्रहण या दोन कथाप्रसंगांचा आपण सविस्तर परिचय करून घेणार आहोत. महाभारत, रामायण, भागवत हे तीन ग्रंथ आख्यानक कवींना अतिशय प्रिय असले तरी राष्ट्रीय चारित्र्यसंवर्धनाच्या दृष्टीने महाभारत व रामायण हे दोन ग्रंथ मोठचा आदरास पात्र झाले आहेत. कर्ण, द्रोण, भीष्म, अश्वत्थामा, दुर्योधन, श्रीकृष्ण, कुंती, द्रौपदी अशी अनेक पात्रे मानवी रागलोभांनी महाभारतात प्रकट झालेली असल्याने पुढील कथाकारांना त्यांचे साह्य होत राहिले. धर्म, तत्त्वज्ञान, राजनीती, विद्यावर्धन इत्यादींचीही विपुल चर्चा महाभारतात असल्याचे तत्त्वचर्चेची आवड असणाऱ्यांचीही सोय येथे आहे द्रौपदीवस्त्रहरण, कीचकवध, भीष्मार्जुनयुद्ध, अभिमन्युपराक्रम, कर्णशल्यसंवाद; अशा अनेक प्रसंगांवरील आख्याने चित्ताकर्षक असून प्रसंगी बोधप्रदही आहेत. ‘ जो मृदु लागे तों तों दडपी शिशु फार ऊन भातातें ’, ‘ हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं ’, ‘ प्रार्थुनि मागति पुत्रच्छात्रापासुनि भले परिभवातें ’ अशा अनेक सुभाषितवजा चरणांनी मोरोपंती भारत महाराष्ट्रातील घरोघरी गेलेले दिसून येईल.

मोरोपंतांच्या मंत्ररामायणाचा उल्लेख वर आला आहे. या काव्याशिवाय रामभक्त मोरोपंतांनी **अष्टोत्तरशत** म्हणजे १०८ **रामायणे** लिहिली असल्याचे उल्लेख वारंवार येतात. मंत्ररामायणे, निरूपणात्मक रामायणे, चित्ररामायणे, विशिष्टनामक रामायणे, विविधवृत्तांतील रामायणे, अशी या रामायणांची वर्गवारी केली जाते. परंतुरामायण, ओवीरामायण, लघुरामायण, दीर्घरामायण, मात्रारामायण, निराष्ठेरामायण, विचित्र रामायण, दामरामायण. मंत्ररामायण, बालमंत्ररामायण, मंत्रगर्भ साकी रामायण, तीर्थरामायण, ऋषिरामायण, राजरामायण, सन्नामगर्भरामायण, विष्णुसहस्रनामरामायण, श्रीगुरुरामायण, सीतारामायण, हनुमद्रामायण, प्रियरामायण, अनुष्टुभ्‌रामायण, दोहारामायण, पंचचामररामायण इत्यादी विविध रामायणांच्या नावांवरूनही पंतांच्या या रचनेची कल्पना येण्यासारखी आहे.

मंत्ररामायणाप्रमाणे मोरोपंतांची भागवतावरील रचना **मंत्रभागवत** म्हणून प्रसिद्ध आहे. 'नमो भगवते वासुदेवाय' हा मंत्र साधून सुमारे ३६०० आर्यांत सारें भागवत आणण्याचा प्रयत्न पंतांनी केला आहे. श्रीकृष्णचरित्राचे पंतकृत हे यशोगान सुरस व भक्तिरसप्रधान बनले आहे. पंतांची **भागवती प्रकरणे**ही अशीच रसाळ व अवीट आहेत. भागवत-पुराणाच्याच आधाराने त्यांनी नारदाभ्युदय, भीष्मभक्तिभाग्य, अवतारमाला, ध्रुवचरित्र, अमृतमंथन, वामनचरित्र, सुदामचरित्र, भृगुचरित्र; अशी काही प्रकरणे आर्या, साक्या, विविध श्लोक इत्यादी वृत्तांतून गुंफिली आहेत. गोपी-प्रेमोद्गार, नवदानकेली, गोपीपाडवा, मुरलीपंचक, मुरलीनवरत्नमालिका अशी काही स्वतंत्र अशी प्रकरणे भागवती कथांत शोभून दिसतील अशी त्यांनी निर्माण केलेली दिसतात. कविवर्य मोरोपंत हे संतचरित्रकार म्हणूनही प्रसिद्ध आहेत. आधी होऊन गेलेल्या महत्त्वाच्या संतश्रेष्ठांवर पंतांनी स्तुति-सुमनांच्या माळा गुंफिल्या आहेत. पंतांची **संतवर्णनात्मक** ही प्रकरणे त्यांच्या संतविषयक आदरबुध्दीचे निदर्शक होत. सन्मणिमाला, ज्ञानदेवस्तव, चांगदेवस्तव, नामदेवस्तव, कबीरस्तव, नरसीमेहतास्तव, एकनाथस्तव, नाथस्तव, रामदासस्तव, वामनपंडितस्तव, तुकारामस्तव, तुळसीदासस्तव, माधवदासस्तव, महीपतिस्तव, वामनादिकीर्तन, साधुस्तव, सत्संगस्तव, अशा अनेक नावांवरून पंतांनी केलेला संतचरित्रांचा मार्मिक अभिप्राय त्यांच्या आदरयुक्त सद्भावनांसहित ध्यानात येण्यासारखा आहे. यांशिवाय पंढरीमाहात्म्य, पांडुरंगदंडक, विठ्ठलप्रणीधी, विठ्ठलस्तोत्र, विठ्ठलस्तुती, विठ्ठलभक्तस्तुती, पुंडलीकप्रार्थना, स्मरणी इत्यादी लहानमोठी प्रकरणे लिहून पंतांनी आपला संतांविषयी व त्यांच्या दैवतांविषयीचा आदरभाव व्यक्त केला आहे. कोणाही विठ्ठलभक्तास

**वीणातालमृदंगध्वनि विठ्ठलरामकृष्ण हा घोष ।**
**तोष श्रवणीं देशी श्रीपंढरि ! हरिसि सर्वही दोष ॥**

ही आर्या वाचून परम संतोषच होईल.

पंत हे आख्यानक कवी म्हणून मोठे असले तरी त्यांची स्फुट कविताही अधिक रसाळ व परिणामकारक आहे. पांडित्य व भक्तिप्रवणता

यांचा सुरेख संगम त्यांच्या **विविध स्तोत्रांतून** झालेला दिसून येतो. अनेक देवदेवता, तीर्थस्थाने, नद्या, इत्यादींवर पंतांनी रचलेली स्तोत्रे भक्तिरसात्मक असून नित्य पाठांतरात येण्याच्या योग्यतेची आहेत. कोल्हापूरची अंबाबाई, तुळजापूरची भवानी, जेजुरीचा खंडोबा, गिरीचा व्यंकटेश, बारामतीचा सिध्देश्वर इत्यादी देवदेवतांवर त्यांची स्तोत्रे आहेतच. परंतु हरिहरस्तव, मुरलीस्तव, तुलसीस्तव, रेणुकास्तव, रामप्रार्थना, दशावतार प्रार्थना अशी काही लहान लहान प्रकरणे स्तोत्रकाव्यात सामावतील अशी अनेक आहेत. विनायकमाहात्म्य, दुर्गासहस्रकाव्य अशी काही स्तोत्रे पंतांनी लिहिलेली आढळतात. संशयरत्नमाला, आर्याकेकावली, नामार्या, नामसुधाचषक, नामरसायन, वाङ्मनःप्रार्थना, सन्मनोरथराजि, प्रश्नोत्तररत्नमाला, पतिव्रताकीर्तन, गुरुस्तुतिमुक्तांजलि; अशा अनेक प्रकारच्या स्तोत्रांची रचना करून पंतांनी भाविक मनाची जोपासना करून धर्मसंस्कृतीचा ठेवा घरोघरी जतन करण्याचे फार मोठे कार्य केले आहे.

हरिवंश, ब्राह्मणमाहात्म्य, गीतार्या, भगवद्गीतास्तुती, अहल्योद्धार अशी काही प्रकरणे पंतांनी आपल्या आयुष्याच्या अखेरीस लिहिलेली दिसतात. पंतांचे रचनाकौशल्य, त्यांची मार्मिक दृष्टी, त्यांचे प्रभुप्रेम, त्यांच्या चित्ताची भावप्रवणता इत्यादींचे दर्शन घ्यावयाचे असेल तर त्यांचे गाजलेले **केकावलि** हे अप्रतीम स्तोत्र आजही वाचावे. केका म्हणजे मयूराचे ओरडणे. दयामृतघन परमेश्वराच्या कृपेसाठी बारामतीच्या या मयूराने ज्या एकशे एकवीस ‘ केका ’ प्रगट केल्या त्या ‘ केकावली’त वाचावयास मिळतात. पृथ्वीवृत्तातील मोरोपंतांचे हे स्तोत्रकाव्य म्हणजे त्यांच्या परिणत प्रज्ञेची व भक्तिरसाने आर्द्र झालेल्या वृत्तीची एकमेव साक्षच होय. दादोबा पांडुरंग, श्रीधर विष्णू परांजपे, श्री. ना. बनहट्टी यांसारखे रसिक या स्तोत्रकाव्यावर बेहद्द खूष झालेले दिसतात. परमेश्वरास किती विविध रीतींनी आळवता येते, भक्ताच्या चित्ताची किती करुणास्पद अवस्था होते, याची अनुभूती तुकारामांनंतर उत्कटतेने कोणास घ्यावयाची असेल तर त्याने पंतांचे ‘ केकावलि ’ काव्य आजही वाचावे. भगवद्पदाचे माहात्म्य, स्वतःचे पतितत्व, शरणागती, प्रभुस्तुती, कवितासुतासमर्पण, स्वतःच्या उद्धाराविषयी उत्कंठा,

विषयवासनेचे दुर्निवारित्व, कथासुरभीचे कारुण्य, भगवन्नाममाहात्म्य, भगवंतांचे कृपालुत्व, भगवत्कथाप्रशंसा अशा अनेक विषयांचे मार्मिक दर्शन मोठ्या उत्कटत्वाने केकावलीत होते. 'सुसंगति सदा घडो, सुजन-वाक्य कानीं पडो' हे त्यांनी देवापाशी मागितलेले वरदान तर महाराष्ट्राच्या प्रत्येक घरी पोचले आहे.

कविवर्य मोरोपंत यांच्या काव्यकर्तृत्वाचा संक्षेपाने घेतलेला हा आढावा पाहून पंतांच्या कविमनाचा शोध घेण्यासारखा आहे. त्यांच्या कवित्वाचे गुणदोष कोणते हे आपण स्वतंत्रपणे पाहाणार असल्याने येथे त्यांच्या कवित्वाचे पुनः एकदा थोडक्यात दर्शन घेऊ.

## पंतांची कविता

| ग्रंथ | | पद्यसंख्या |
|---|---|---|
| १) महाभारत | | १७१७० |
| २) रामायण | सुमारे | १६००० |
| ३) हरिवंश | | ५४४४ |
| ४) कृष्णविजय ऊर्फ बृहद्दशम | | ३६६९ |
| ५) मंत्रभागवत | | ३५९२ |
| ६) ब्रह्मोत्तरखंड | | १२०० |
| | एकूण | ४७०७५ |

**स्फुट प्रकरणे**

| | | |
|---|---|---|
| १) काशीप्रकरणे | | १००० |
| २) संतप्रकरणे | | १००० |
| ३) भागवतीप्रकरणे | | १६५२ |
| ४) कुशलव्याख्यान | | ५०६ |
| ५) गीतासप्तशती | | ४०७ |
| ६) गीतार्या | | ७१८ |
| ७) संतस्तुती | | ६१२ |
| ८) विविध स्तोत्रे | | ४००० |
| | एकूण | ५७०७५ |

**अष्टोत्तरशत रामायणे**

# ३ | पंतांचे कथनकौशल्य

मोरोपंत हे जसे थोर कवी होते तसेच ते स्वतः उत्तम कथाकार, कीर्तनकारही होते. कथाकीर्तनप्रसंगी श्रोत्यांच्या आवडीची त्यांना पूर्ण कल्पना होती. काही श्रोते मार्मिक दृष्टीचे व व्युत्पन्न असल्याने त्यांना तात्त्विक गोष्टींच्या चर्चेत अथवा एखाद्या आर्येचा अनेक प्रकारांनी अर्थ लावण्यात गोडी वाटते हे मोरोपंत जाणीत होते. तथापि आपला सर्वसाधारण श्रोतृवर्ग हा कथाप्रिय आहे, त्याला कथानकात, आख्यानाच्या निरूपणात रस असल्याचेही त्यांना माहीत होते. कथानकातील उत्कंठा, संवादचातुर्य, स्वभावपरिपोष, विविध रसांची निर्मिती, समर्पक अलंकारांचा उपयोग इत्यादी विविध मार्गांनी मोरोपंतांनी आपल्या आख्यानांतून कथानकाचे अनुसंधान कायम राखले आहे. गोष्ट, कथा, आख्यान इत्यादींचा वेध सर्वसामान्य रसिक वाचकास वा श्रोत्यास किती असतो हे मोरोपंतांना चांगले माहीत होते.

याच दृष्टीने मोरोपंत मूळ महाभारतातील अनेक विषयांचा, विशेषतः तात्त्विक चर्चांचा संक्षेप करताना दिसतात. २२५० श्लोकांचे मूळचे विराटपर्व केवळ ७४० आर्यांत म्हणजे जवळजवळ एकतृतीयांश संक्षेपाने ते आणतात, हे त्यांच्या ‘ स्वल्पातचि आणितों कथा सारी ’ या धोरणास अनुसरूनच आहे. मोरोपंत हा संक्षेप करताना मूळ कथासूत्रात कोणताही बदल करीत नाहीत हे ध्यानी घेतले पाहिजे. संक्षेप करतील, पण कोणताही नवा प्रसंग पदरचा ते घालणार नाहीत हेही महत्त्वाचे आहे. फार मोठ्या विस्ताराचा, निरूपणाचा भाग मोरोपंत त्यातील चर्चेसह गाळतात वा एकदोन आर्यांत त्याचा निर्देश करून कथाभाग मात्र ते कायम ठेवतात. मूळ महाभारतात २४ व्या अध्यायापर्यंत कीचकवधाचा प्रसंग आला आहे तो सर्व कथाविषय मोरोपंत पहिल्याच अध्यायात आटोपशीरपणे मांडतात. अशा संक्षेपात त्यांनी

प्रामुख्याने उपदेशप्रधान तात्त्विक चर्चा गाळलेली दिसते. अज्ञातवासात आपण कोणती भूमिका घेऊन कोठे व कसा काळ कंठायचा? या प्रश्नावर मूळ विराटपर्वात पहिल्या तीन अध्यायांत धर्मराज, भीम, अर्जुन, नकुल, सहदेव, द्रौपदी इत्यादींचे विस्तृत संभाषण आहे. ते मोरोपंत गाळतात. त्याप्रमाणे मूळ महाभारतातील विराटपर्वात चौथा अध्याय धौम्यांचा पांडवास उपदेश कथन करणारा आहे. विवेकशील पुरुषांनी राजदरबारी कसे वागावे, यासंबंधी सविस्तर उपदेश येथे धौम्यमुनी करतात, परंतु मोरोपंत मात्र पहिल्या आर्येत 'अतिगहन राजसेवाधर्म तया कुरूकुळेश्वरा शिकवी' असा एकाच ओळीत निर्देश करून पांडव विराटनगरीकडे वळल्याचे वर्णन करतात. पाचव्या अध्यायात व्यासकृत महाभारतात शमीवृक्षावर शस्त्रे ठेवण्याचा प्रसंग आहे, तो मोरोपंत एकाच आर्येत वर्णन करतात. मूळ ठिकाणी सहाव्या अध्यायात विस्तृत असे दुर्गास्तवन आहे, धर्मराजाला दुर्गेचे दर्शन झालेले आहे, दुर्गेचा प्रसाद पांडवांना मिळालेला आहे. परंतु मोरोपंत या प्रसंगाचा निर्देशही करीत नाहीत. मूळ महाभारतात प्रत्येक पांडवांच्या राजगृहप्रवेशाला स्वतंत्र अध्याय आहे. परंतु मोरोपंत मात्र प्रत्येकी एका आर्येतच विराटगृहात प्रवेश देत आहेत. पुढील कथाभागावर लक्ष ठेवून मोरोपंतानी द्रौपदीच्या राजगृहप्रवेशासाठी मात्र नऊदहा आर्या खर्च केल्या आहेत हे त्यांच्या कथनकौशल्यास अनुसरूनच आहे. याच द्रौपदीच्या वा सैरंध्रीच्या सौंदर्यामुळे पुढे कीचकप्रकरण उद्‌भवलेले असल्या-मुळे द्रौपदी व राणी सुदेष्णा यांच्या संवादातून मोरोपंत पुढील अनर्थही सुचवून कथानकाचा विकास साधतात. राणी सुदेष्णेला 'हें वपु परभोग्य नव्हे'– 'माझे शरीर दुसऱ्याकडून भोगण्यास योग्य नव्हे, जो बळेच तसे करील तो ज्वालेला स्पर्श करणाऱ्या पतंगाप्रमाणे जळून जाईल.' (१.१७) असे भाकित द्रौपदी सांगते. हा द्रौपदीचा नगरप्रवेश अथवा राजगृहप्रवेश महाभारतात मूळचा थोडा निराळा आहे. 'द्रौपदीने आपले कृष्णवर्ण, बारीक, मृदू, लांबसडक, कुरळे आणि निर्दोष केस सावरून त्यांस गाठ दिली. सैरंध्रीच्या वेषाला शोभेल असे मलीन वस्त्र ती नेसली होती. एखाद्या वेड्या स्त्रीप्रमाणे ती त्या नगरात भटकू लागे. ही कोणी वेडी आहे असे

समजून 'तू कोण आहेस ?' अशी पृच्छा रस्त्यावर लोक करीत. त्यावर ती म्हणे, 'मी सैरंध्री आहे.' हा सर्व प्रकार राजवाड्याच्या सज्जावरून केकय राजाची कन्या, विराट राजाची पट्टराणी हिने पाहिला. तिने सैरंध्रीची चौकशी केली. येथे राणी तिच्या शरीरसौंदर्याचे फार बारकाईने वर्णन करते. दोघींच्यांत तिच्या रूपाबद्दल चर्चा होते; हा सर्व विस्तृत कथाभाग मोरोपंत फार आटोपशीर असा बनवितात. 'होवूनि मलिनवेषा जाता राजप्रियेकडे कृष्णा' (१-१०) या अर्ध्या आर्येत मोरोपंत सैरंध्रीचा राजगृहप्रवेश उभा करतात.

मूळ महाभारतात तेरावा अध्याय 'समयपालनपर्व' म्हणून आहे. अज्ञातवासात पांडव विराटनगरीत परस्परांना कशी मदत करीत, याचे येथे वर्णन असून उत्तरार्धात जीमूतवधाचा प्रसंग आहे. मूळ महाभारतात या प्रसंगाचे वर्णन विस्तृत असूनही मोरोपंत 'अज्ञातवासकाळीं त्यांची कष्टा दशा वदावि किती ?' (१.२८) असे विचारून चारपाच आर्यांत ते प्रत्येकाची अवस्था वर्णन करतात व 'एवं मासचतुष्टय ते क्रमिती त्या विराटनगरांत' (१.३३) असे सांगून चार महिन्यांचा कथाभाग चातुर्याने उरकतात. जीमूतवधाचा प्रसंगही मोठ्या कुशलतेने ते तीनचार आर्यांतच पण समर्थपणे उभा करतात. जीमूताला भीमाने कसे ठार मारले ? तर मोरोपंत सांगतात, 'फिरवुनि शतदां केला पिष्ट क्षितिवरि सलील आपटुनी' (१.३९) भीमाने त्याला शंभर वेळा फिरवून जमिनीवर आपटून ठार केले. यानंतर 'दशमास क्रमिति असे' (१.४२) म्हणून दहा महिन्यांचा काळ चार शब्दांत संपविला आहे. आणि लगेच 'कीचकनामा सेनापाल श्याल प्रसिद्ध राजाचा' (१.४३) म्हणून कीचकप्रकरणास सुरुवात केली आहे.

त्यानंतर अध्यायाच्या शेवटपर्यंत म्हणजे सुमारे दीडशे आर्यांत मोरोपंत कीचक व उपकीचक यांच्या वधाचे आख्यान मोठ्या रसाळपणे रंगवितात. द्रौपदीस पाहून कीचकाने काढलेले शृंगारिक उद्‌गार मात्र मोरोपंत गाळतात, पण प्रमुख कथाप्रसंग मात्र सोडीत नाहीत. सैरंध्रीचे कीचकाला झालेले प्रथमदर्शन, तिच्याबद्दल त्याला वाटलेली अभिलाषा, सुदेष्णेच्या साक्षीने कीचकाने केलेला अनुनय, द्रौपदीने केलेली त्याची निर्भर्त्सना, मद्य

आणण्यासाठी द्रौपदीने कीचकाकडे जाणे, तिने केलेले सूर्याचे ध्यान, गुप्तपणे संरक्षणासाठी सूर्याने दिलेला राक्षस; अशा बहुतेक सर्व प्रसंगांचे वर्णन मूळाला धरूनच मोरोपंत करतात. थोडा फरक असेल तर एवढाच की, मद्य आणण्यास जात असताना द्रौपदी श्रीकृष्णाचे ध्यान करते व सूर्य तिच्या रक्षणासाठी राक्षस पाठवितो; असे मोरोपंत सांगतात. कीचक व उपकीचक यांच्या वधाचे रोमहर्षक वर्णन करतानाही मोरोपंत असाच थोडाफार बदल करतात. द्रौपदीला लाथ मारल्यानंतर भीम संतापाने उठतो, कीचकाच्या वधास प्रवृत्त होतो. धर्म यावेळी आपल्या पायाचा आंगठा हाताने दाबून न उठण्याची खूण भीमाला करतो व म्हणतो, 'तुला लाकडे हवीत का ? तर तू बाहेरच्या वृक्षाची तोड'—हा सर्व कथाभाग मोरोपंतांनी गाळला असून युधिष्ठिराने भीमाचा आंगठा आपल्या आंगठ्याने दाबून भीमाला शांत केले एवढेच वर्णन केले आहे. भीमाला संताप आणणारे भाषण मुळात द्रौपदी चार अध्यायांत करीत असली तरी मोरोपंतांची सैरंध्री मात्र तेवढ्याच परिणामकारक रीतीने सुमारे वीस आर्यांत (१.८५–१०४) ते काम करते. मूळ महाभारतात बाविसाव्या अध्यायात कीचकवधाचा संपूर्ण प्रसंग आला आहे. मोरोपंतांनी कीचकवध फक्त दोन आर्यांत आटोपला असला तरी भीमाच्या तोंडचे वीररसयुक्त भाषण फारच प्रभावी आहे (१.१३१–३६) मुळात कीचकाच्या भावांच्या वधासाठी संपूर्ण तेविसावा व चोविसावा अध्याय आहे. मोरोपंतकृत हे वर्णन संक्षेपाचे असले तरी प्रत्ययकारी आहे.

मूळ महाभारतात अध्याय २५ ते ३४ पर्यंत दक्षिणगोग्रहणाचा कथाभाग आला असून मोरोपंतांनी तो दुसऱ्या अध्यायात ७५ आर्यांत संपविला आहे. पांडवांच्या शोधार्थ गेलेल्या हेरांनी कीचकाच्या वधाची वार्ता दुर्योधनला सांगणे, त्यावर कर्ण, द्रोण, भीष्म, कृप व त्रिगर्त यांनी व्यक्त केलेली मते, त्रिगर्ताने केलेले गोहरण, विराटाने त्रिगर्तावर केलेला हल्ला, विराटाचा पराजय, भीमाने विराटाच्या सुटकेसाठी केलेला पराक्रम इत्यादी कथाभाग बहुधा मुळाप्रमाणेच आहे. मूळ महाभारतामधील युद्ध-वर्णनाचा मात्र मोरोपंतांनी बराच संक्षेप केला आहे. 'करिते झाले दारुण रण ते दोघेहि सिंहसम राजे' (२.४४) असे एकाच ओळीत सुशर्मा व

विराट राजा यांच्या युद्धाचे वर्णन मोरोपंत करतात. भीम विराट राजाची सुटका करतो, धर्माच्या सांगण्यावरून त्रिगर्ताला जिवंत सोडण्यात येते, रणांगणावरच विराट पांडवांचा सत्कार करतो व विजयाची वार्ता नगरात कळवितो; इत्यादी कथाभाग बराचसा मुळाला धरून आहे.

उत्तरगोग्रहणाचे आख्यान मात्र मोरोपंत फारच विस्ताराने व परिणामकारक रीतीने रंगविताना दिसतात. मूळ महाभारतात हा कथाभाग अध्याय ३५ ते ६७ म्हणजे ३३ अध्यायांत आलेला आहे. मोरोपंत आपल्या विराटपर्वाच्या तीन, चार, पाच व सहा या चार अध्यायांत व एकंदर ३६५ आर्यांत ही सर्व कथा बसविण्याचा प्रयत्न करतात. या निरूपणात वा कथाकथनात मोरोपंतांनी मूळच्या तुलनेने फारसा बदल केलेला नाही. मुळात ४७ व्या अध्यायात द्रोणाचार्यांची निंदा कर्णाच्या तोंडी असून मोरोपंत मात्र ती दुर्योधनाच्या तोंडी घालतात. मूळ महाभारतातील विराटपर्वात ७०, ७१ व ७२ अध्यायांचे वैवाहिक पर्व आहे. मोरोपंत मात्र हा कथाभाग सातव्या अध्यायात फारच संक्षेपाने म्हणजे फक्त ३४ आर्यांत वर्णन करतात. पांडवांचे प्रकटीकरण, विराटाचा भ्रमनिरास, उत्तरेचा सून म्हणून अर्जुनाने केलेला स्वीकार आणि उत्तरा व अभिमन्यू यांचा विवाह इत्यादी घटनांचा परामर्श मोरोपंत सविस्तर घेत नाहीत. खरे पाहाता विवाहासारख्या प्रसंगी आख्यानक कवी रंगतात, रमतात. वधूवरांची, भरजरी वस्त्रांची, पक्वान्नांची वर्णने करताना त्यांना उल्हास वाटतो; परंतु मोरोपंत चांगले गृहस्थाश्रमी व रसिक असूनही या विवाहात रमलेले दिसत नाहीत. शेवटच्या नऊ–दहा आर्यांतच हा विवाहप्रसंग थोडक्यात उरकताना मोरोपंत दिसतात. लग्नात सोने, माणके, नाना वस्त्रे यांची उधळण झाली, नृत्यगायन झाले, सुग्रास भोजने झाली; एवढे वर्णन करून लगेच मोरोपंत म्हणतात, ‘श्रोते हो ! वर्णावें किती ? मज ‘गप्पी’ असे वदाना कीं’—या विवाहाचे वर्णन किती म्हणून करावे ? तुम्ही मला गप्पीदास म्हणाल. स्वर्गातील देवांनाही हा सोहळा पाहून आनंद झाला. (७.३५) अर्थात् या संक्षेपाची जाणीव मोरोपंतांना आहे. कारण पुढल्याच आर्येत मोरोपंत म्हणतात, ‘स्वल्प म्हणोनि न सोडी अमृताची

शक्ति सर्व चव थेंबा ' (७.३६)–अमृताचा थेंब लहान असला म्हणून काय झाले ? त्याची चव तीच राहणार !

आतापर्यंत मोरोपंतांच्या कथनकौशल्याचा थोडक्यात परिचय मूळ महाभारतामधील कथावस्तूच्या तुलनेच्या संदर्भात करून घेतला. कोठे संक्षेप करायाचा, कोठे विस्तार करायचा हे मोरोपंत मार्मिकपणे जाणतात. ज्यामुळे कथावस्तू अडून राहाणार नाही असा भाग मोरोपंत अजिबात सोडतात किंवा त्याचा फारच संक्षेप तरी करतात. वाचकाची वा श्रोत्याची उत्कंठा कायम राहावी, कथाविषयात तो रमून जावा याची मोरोपंत फार काळजी घेतात. शुष्क तात्त्विक चर्चा वा नीरस निरूपण बाजूला ठेवून कथानकाची गती जेणेकरून वाढेल तेवढेच प्रसंग मोरोपंतांनी मोठ्या नाट्यमय रीतीने वर्णन केले आहेत. चटकदारपणा व रसवत्ता हे दोन मोठे गुण मोरोपंतांच्या कथनकौशल्याचे सांगता येतील. खटकेबाज संवाद, रोमहर्षक नाट्य, युद्धाची सजीव वर्णने, रेखीव स्वभावदर्शन इत्यादी अनेक मार्गांनी मोरोपंत आपल्या कथानिवेदनात रंग भरतात. सैरंध्री-सुदेष्णेची प्रथम भेट, कीचकाने सैरंध्रीशी केलेला अतिप्रसंग, भीम-कीचकाची नाट्यमय भेट, सैरंध्रीची कीचकाच्या शवाबरोबरची यात्रा, उपकीचकांचा वध, त्रिगर्त व विराट राजा यांचे युद्ध, भीम–सुशर्म्याचे युद्ध, उत्तरगोग्रहणाच्या वेळी विराटपुत्र उत्तराची पोकळ बढाई, रणावर उडालेली त्याची गाळण, अर्जुनाने केलेले युद्ध, कौरववीरांशी अर्जुनाचा अनेकदा झालेला लढा; इत्यादी कथाप्रसंग मोरोपंतांनी अतिशय मार्मिकपणे व प्रत्ययकारी पद्धतीने वर्णन केले आहेत.

युद्धानंतरचा विजय उत्तराने मिळविला अशी विराटाची समजूत. विजयाच्या संदर्भात कंकरूप युधिष्ठिर बृहन्नडेचे कौतुक करतो, याचा राग विराटाला येतो, तो आपल्या हातातील फासा धर्माच्या कपाळावर मारतो, सैरंध्री ओघळणारे रक्त एका पात्रात धरते. एका देवदूताने आपणांस विजय प्राप्त करून दिला; इत्यादी अनेक प्रसंग कथानकाच्या दृष्टीने मोरोपंतांनी संक्षेपाने पण चटकदार पद्धतीने वर्णन केले आहेत. विजय कोणी मिळविला हे वाचकांना, श्रोत्यांना माहीत आहे, पण विराटराजा खरी परिस्थिती जाणीत

नाही. त्यामुळे कथासूत्रास विलक्षण गती मिळते. उत्कंठा वाढते. शेवटी तर धर्मराज विराट राजाच्या दरबारात मानाच्या आसनावर बसतो, विराट राजा त्याला त्याची जागा दाखवितो, पण शेवटी अर्जुन सर्व गुपित स्पष्ट करून आपण कोण हे जाहीर करतो आणि मग मात्र विराट राजास विस्मल्यासारखे होते. याच पांडवांनी आपले वारंवार रक्षण केले आणि 'म्यां ताडिला ललाटीं अक्षें, अपराध हा असामान्य' (७.१२) याचे विराटाला भारी वाईट वाटते. तो आपली कन्या उत्तरा विजयी वीर अर्जुनास देण्यासाठी तत्पर होतो. परंतु ही उत्तरा म्हणजे मुलीच्या नात्याने वागणारी असल्याने आपणांस सुनेप्रमाणे आहे. आपला पराक्रमी पुत्र अभिमन्यूस ती द्यावी, असे अर्जुन सुचवितो. या बोलण्याने सर्वांनाच संतोष होतो; हा सर्व भाग कथानकाच्या गतीस चालना देतोच, पण वाचकांच्या, श्रोत्यांच्या मनास सुखवितो. युद्धांच्या कटकटीने भरलेले विराटपर्व अभिमन्यू-उत्तरेच्या विवाहाने संपते. पांडवांचा अज्ञातवास अशा रीतीने सुखदायक पद्धतीने संपतो यांतच श्रोत्यांना, वाचकांना समाधान वाटते. वृत्तीने पुराणिक, कथाकार असणाऱ्या मोरोपंतांचे कथनकौशल्य याप्रमाणे प्रसंगांच्या निवडीत, त्यांच्या संक्षेपात, नाट्यमय चित्रीकरणात, कुशल संवादलेखनात, मार्मिक स्वभावचित्रणात आपणांस प्रतीत होते. कोठेही कथानक रेंगाळले आहे, उगाच पाल्हाळ आला आहे, तात्त्विक व शुष्क चर्चेमुळे कथानक थबकले आहे; असे झालेले दिसत नाही. मोरोपंतांची कल्पकता, त्यांच्या वृत्तीची काव्यमयता, विविध रसांची त्यांनी केलेली निर्मिती इत्यादींनी त्यांच्या कथनकौशल्याचा डौल कसा सांभाळला आहे हे आपण पुढे पाहूच.

---

# ४ | विराटपर्वातील कथाविषय

विराटपर्व हे महाभारतातील चौथे पर्व असून त्यात पांडवांच्या अज्ञातवासाची हकीकत आहे. कीचकवधामुळे हे पर्व अतिशय लोकप्रिय झाले असून महाभारताच्या वाचनाच्या वेळी मंगलाचरणाप्रमाणे आधी हे पर्व वाचून मग आदिपर्वाकडे वळावयाचे, असा एक पारंपारिक संकेत आहे. मूळ महाभारतात विराटपर्वाचे अध्याय ७२ व श्लोकसंख्या २२५० अशी आहे. वेष पालटून पांडवांचे विराटनगरीत आगमन, जीमूतवध, कीचक व उपकीचकवध, दक्षिण व उत्तरगोग्रहण व अभिमन्यु-उत्तराविवाह या पाच प्रमुख घटना विराटपर्वात आहेत. बारा वर्षांच्या वनवासानंतर एक वर्षाचा अज्ञातवास कोठे कंठावयाचा हा प्रश्न चर्चेत उत्पन्न झाल्यावर धर्मराजाने मत्स्यदेश हा दक्षिण भारतातील देश पसंत केला. तेथील विराट राजाच्या चाकरीत सर्वांनी राहावयाचे असा निश्चय झाला. जुगारूचा खेळाडू म्हणून **कंक** या नावाने धर्मराज राहिला. भीमाने **बल्लव** या नावे पाकशाळेचे प्रमुखपद स्वीकारले. **बृहन्नडा** हे नाव घेऊन अर्जुन विराटाच्या मुलीचा शिक्षक म्हणून राहिला. **ग्रंथिक** हे नाव स्वीकारून नकुल घोड्यांची निगा राखू लागला व **तंतिपाल** हे नाव धारण करून सहदेवाने विराट राजाच्या गाई राखण्याची कामगिरी पत्करिली. **सैरंध्री** या नावाने विराट राजाच्या राणीच्या केशभूषेचे काम द्रौपदी करीत राहिली. येथून पुढल्या सर्व घटना विराट नगरीमधील अज्ञातवासामध्ये घडल्या.

मूळ महाभारताचा बहुतेक सर्व कथाभाग मोरोपंतांनी आपल्या महाभारताच्या विराटपर्वात सात अध्यायांत व सातशे चाळीस आर्यांत आणलेला असल्यामुळे त्यांच्या आधाराने कथानुसंधानाचा परिचय करून घेऊ. मोरोपंतांनी पहिल्या अध्यायात कीचकवधाचा प्रसंग मोठ्या बहारीने वर्णन केला आहे. विराट राजाच्या पदरी राहाताना राजाची सेवा करण्याविष-

यीचा धर्म धौम्य मुनींनी पांडवांना निवेदन केला. त्यानंतर ते अग्निहोत्र घेऊन द्रुपदपुरास गेले व पांडवाचे इतर सेवक द्वारकेत श्रीकृष्णाच्या आश्रयाने राहू लागले. विराटनगरीत प्रवेश करण्यापूर्वी पांडवांनी आपली शस्त्रास्त्रे नगरास लागून असलेल्या स्मशानाजवळील शमीवृक्षावर ठेविली आणि वर सांगितल्याप्रमाणे निरनिराळी नावे बदलून त्यांनी विराट राजाच्या पदरी चाकरीचे काम पत्करले. परस्परांना ते गुप्तपणे भेटत. परस्परांना द्रव्यसाहृचही करीत. चार महिन्यांनंतर विराटनगरीत ब्रह्मोत्सव झाला. त्या उत्सवात जीमूत नावाच्या महाभयंकर मल्लाशी भीमाने बाहुयुद्ध केले व त्यात भीमाकडून जीमूताचा वध झाला.

यानंतर कीचकप्रकरणास सुरुवात होते. कीचक हा विराट राजाचा मेहुणा व सेनापती होता. सूतपुत्र असूनही आपल्या कर्तृत्वाने तो सेनापति-पदापर्यंत चढला व त्याने राणी सुदेष्णाशी बहिणीचे नाते जोडले. आपल्या पराक्रमावर विराट राजाचे महत्त्व असल्याची घमेंडही त्याला होती. या कीचकाच्या नजरेत एकदा सैरंध्री पडली. तिच्या सौन्दर्यावर तो मोहित झाला. बहिणीच्या परवानगीने त्याने सैरंध्रीची मनधरणीही सुरू केली. सैरंध्रीने त्याला झिडकारले. पण कीचकाने मनातील अभिलाषा सोडली नाही. मद्य आणण्याच्या निमित्ताने सैरंध्री कीचकाकडे आली असता त्याने अतिप्रसंग केला. त्याचा हात झटकून सैरंध्री पळून जाऊ लागली असताना कीचकाने तिचा पाठलाग केला. तिचा केशपाश धरून त्याने विराट राजाच्या व सभाजनांच्या देखत तिच्यावर लत्ताप्रहार केला. यावेळी सूर्याने गुप्त राक्षस पाठवून सैरंध्रीचा बचाव केला. द्रौपदीने भरसभेत विराटराजाची निर्भर्त्सना केली. तिला शांत करून धर्मराजाने तिची रवानगी सुदेष्णा राणीकडे केली. रात्री गुप्तपणे सैरंध्री भीमाला भेटली. आपल्या अपमानाची व्यथा तिने त्याच्यापाशी निवेदन केली. त्यांच्याच बेतावरून मध्यरात्रीच्या वेळी कीचकाने एकटीलाच भेटावे असे ठरले. मध्यरात्र होण्याआधीच भीम त्या ठिकाणी शय्येवर येऊन झोपला. ठरल्याप्रमाणे कीचक मध्यरात्रीच्या सुमारास नृत्यशाळेत आला. भीमालाच सैरंध्री समजून कीचक प्रणयाच्या क्रीडा करू लागला. भीम सावध झाला व त्याने कीचकाची निर्भर्त्सना

करून त्याला ठार मारले. भीमाच्या सल्ल्यावरून आपल्या गंधर्वपतींनी कीचकाला ठार मारले असे सैरंध्रीने नृत्यशाळेच्या रक्षकास सांगितले.

कीचकवधाची बातमी सर्वत्र पसरताच राजा विराट, राणी सुदेष्णा, उपकीचक इत्यादी तेथे जमा झाले. सर्वजणांना कीचकाच्या मृत्यूमुळे शोक झाला. सैरंध्री तेथे भयचकित होऊन निर्विकारपणे उभी होती. तिच्याकडे उपकीचकांचे लक्ष गेले. हीच आपल्या बंधूच्या हत्त्येस कारणीभूत आहे असे ठरवून त्यांनी तिला कीचकाच्या शवाबरोबर जाळण्याचे ठरविले. कीचकाच्या प्रेतयात्रेत तिला याच हेतूने चालविले. सैरंध्रीचा या वेळचा शोक ऐकून भीमाने अति विक्राळ अशा गंधर्वाचे रूप घेतले व तेथील प्रचंड तालवृक्ष मुळासकट उपटून तो स्मशानात आधीच येऊन बसला. प्रेतयात्रा तेथे येताच त्याने सर्व उपकीचकांवर हल्ला करून त्या सर्वांचा म्हणजे १०५ उपकीचकांचा नाश केला. या सर्व भयंकर प्रकारामुळे विराटराजा भयभीत झाला. ज्या सैरंध्रीमुळे हा सारा अनर्थ ओढवला तिलाच निरोप देण्यासाठी त्याने राणी सुदेष्णेला सुचविले. सैरंध्रीच्या सौंदर्यामुळे आणखी कोणते उत्पात होतात याचीच भीती सर्वांना होती. सुदेष्णेने सैरंध्रीला निघून जाण्याचे सांगताच तिने फक्त तेरा दिवस आणखी राहाण्याची अनुज्ञा मागितली. ती तिला मिळाली. यापुढे तिच्याकडे वाकडया नजरेने पाहाण्याचे धैर्य कोणासही झाले नाही.

मोरोपंतांच्या विराटपर्वाचा दुसरा अध्याय **दक्षिणगोग्रहण** या नावाचा आहे. कीचक व उपकीचक यांचा वध झाल्याची वार्ता पांडवांच्या शोधात असणाऱ्या दुर्योधनाच्या हेरांनी मिळवली व ती दुर्योधनाच्या कानी घातली. एवढे शौर्य करण्याचे धाडस कोणात असावे ? यासंबंधी त्यांच्यांत चर्चा सुरू झाली. दुर्योधन भीष्मद्रोणकर्णादिकांना म्हणाला, ' हेरांनी सर्व प्रकारे शोध करूनही पांडवांचा सुगावा लागला नाही. तेव्हा ते मरण पावले असावेत; का योगसामर्थ्याने त्यांनी आपले देह नष्ट केले ? अज्ञातवासाचा काळ आता फार थोडा राहिला आहे. त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न आपण केला नाही तर आपले राज्य, प्राण, प्रतिज्ञा वगैरे सर्व काही

जाईल.' यानंतर अधिक चतुर हेर पाठवून पांडवांचा शोध घ्यावा असे कर्णाने सुचविले. कदाचित मानभंगाच्या दुःखामुळे पांडव मरूनही गेले असावेत, असे दुःशासनाला वाटले. त्यावर द्रोण, भीष्म व कृप यांनी आपले मत मांडले की, 'पांडव हे नीतिमान् आहेत. शूर व पुण्यात्मे आहेत, मानभंगाच्या दुःखाने ते मरणार नाहीत. शत्रूची दृष्टी त्यांच्यावर पडू नये म्हणून तपःसिद्धीने त्यांना पदराखाली घातले असावे. त्यांचा शोध शक्य नाही. अज्ञातवासाच्या शेवटी त्यांची व तुमची रणांगणावर भेट होईल व पृथ्वी रक्ताच्या सागरात विरून जाईल.' यानंतर त्रिगर्तांचा राजा सुशर्मा म्हणाला, 'कीचकाच्या मृत्यूमुळे विराट राजा आता दुबळा झाला आहे.' त्याच्यावर हल्ला करून त्याचा पराभव करण्याची संधी आपण गमावू नये. दुर्योधनाला हा सल्ला पसंत पडला. त्याने सुशर्म्याला विराटाच्या गायींचे हरण करण्यासाठी पुढे पाठविले व आपण आपले बंधू, कर्ण, भीष्म, द्रोण इत्यादी वीरांच्या सहित मागाहून सैन्य घेऊन निघाला. सुशर्म्याने विराटाच्या गायींचे हरण केले. विराटाला ही वार्ता समजताच तो धर्म, भीम, नकुल, सहदेव यांसहित रथादी सामग्री घेऊन आपल्या सैन्यासह त्रिगर्तावर चालून गेला. विराटाचे व त्रिगर्तांचे भयानक युद्ध होऊन त्यात विराटाचा पराभव झाला. सुशर्म्याने विराटाला पकडले हे समजताच धर्मराजाच्या आज्ञेने भीम पुढे झाला व त्याने आपल्या धनुष्यबाणांच्या साह्याने सुशर्म्याशी मोठे युद्ध केले. त्याला पकडून धर्मराजासमोर उभे केले. युद्धात पकडलेल्या शत्रूवर शस्त्र न चालवता त्याला जीवदान द्यावे या दंडकानुसार धर्माच्या आज्ञेवरून भीमाने त्याला सोडून दिले. भीमादिकांच्या या पराक्रमामुळे विराट राजास मोठा आनंद झाला व त्याने विजयी वीरांचा मोठा गौरव केला. विजयाची वार्ता नगरवासीयांना कळविण्यासाठी विराटाने आपले हेर पुढे नगरात पाठवून विजयाच्या स्वागताची तयारी चालविली. विजयी राजाचे स्वागत करण्यासाठी सर्व प्रजा रात्र केव्हा संपते याची वाट पाहात बसली.

मोरोपंतांच्या विराटपर्वाचा तिसरा अध्याय '**उत्तरगोग्रहण**' या नावाचा आहे. विराटनगरीच्या दक्षिण बाजूला सुशर्म्यांचा पराभव होत असताना दुर्योधनाने मोठ्या सैन्यानिशी नगराच्या उत्तर बाजूवर हल्ला चढवला.

गवळीवाड्यातील विराटराजाच्या साठ हजार गायी त्याने हरण केल्या. गवळीवाड्याचा प्रमुख राजवाड्यात आला व त्याने विराट राजाच्या उत्तर नामक पुत्राला सर्व हकीकत सांगितली. यावेळी उत्तर स्त्रीसमाजात बसला होता. गवळ्याची तक्रार ऐकताच तो मोठ्या डौलाने म्हणाला. "हीं बातमी मला ऐकवत नाही. मी एकटा व लहान असलो तरी सर्व शत्रूंचा नाश करीन. परंतु दुर्दैवाने माझा सारथी पूर्वीच युद्धात मरण पावला. आता माझे सारथ्य कोणी करेल तर मी कौरवांचा पराभव करण्यास तयार आहे." अर्जुनालाही हे वृत्त समजले. त्याने द्रोपदीला एकांतात गाठले आणि म्हटले की, "उत्तराचे सारथ्य बृहन्नडा करेल. पूर्वी खांडववनाच्या दहनप्रसंगी अर्जुनाचे सारथ्य तिने केले होत असे तू उत्तराला कळीव." बृहन्नडा सारथ्य करण्यास तयार आहे हे समजताच उत्तर युद्धावर जाण्यास तयार झाला. उत्तरा व तिच्या मैत्रिणी यांनी राजपुत्राला निरोप दिला. ठरल्याप्रमाणे अर्जुनाने म्हणजे बृहन्नडेने रथ कौरवांच्या सैन्यांसमोर आणला. याच वेळी कौरवांची ती महासेना पाहून उत्तराचे धैर्य गळून गेले. त्याच्या शरीराला कंप सुटला. त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले, आणि बृहन्नडेने कितीही सांगितले तरी ते न ऐकता उत्तर रणांगणावरून पळत नगराकडे आला. अर्जुनही त्याच्या मागोमाग त्याला थांबविण्यासाठी धावू लागला. हे दृष्य पाहून कौरवांकडील वीर हसू लागले. बृहन्नडेचे तेज पाहून ते चकित झाले. स्त्रीवेषधारी हा पुरुष असावा, कदाचित अर्जुनही असावा. असे त्यांना वाटले. कदाचित सुशर्म्याने विराटाला ठार मारले असावे, त्याला स्मशानात न पोचवताच उत्तर रणांगणावर आला असावा असेही काहींना वाटले. उत्तर पळून जात असतानाच अर्जुनाने त्याला पकडले व म्हटले, "रणांगणावरून पळ काढणे शूराला शोभत नाही. शत्रूला पाठ दाखवून आपण विराटनगरीत गेलो तर स्त्रिया आपला उपहास करतील," आता उत्तराने सारथ्य करावे आणि अर्जुनाने युद्ध करावे असे ठरल्यावर उत्तर रणभूमीकडे वळाला तत्पूर्वी अर्जुनाने शमी वृक्षावर ठेवलेली आपली शस्त्रे उत्तराला काढण्यास सांगितले. याच वेळी आपण खरे कोण आहोत याचीही कल्पना अर्जुनाने उत्तराला दिली. त्यामुळे उत्तराला बरे वाटले. अर्जुनाने आपला बृहन्नडेचा वेष टाकून वीरोचित असा पोषाख धारण केला.

अस्त्राचे चिंतन करून आपले गांडीव धनुष्य सज्ज करून तो युद्धास तयार झाला. उत्तराने सारथ्य केले. उत्तराने अर्जुनाला विचारले, " तू तर एकटा आहेस. कौरव सैन्य अफाट आहे. तुझा निभाव कसा लागणार"? यावर अर्जुनानें आपल्या मागील युद्धनैपुण्याची उदाहरणे देऊन उत्तराची शंका दूर केली व त्याने कौरवांच्या सैन्यास तोंड देण्यास सुरुवात केली.

पंतकृत विराटपर्वाचा चौथा अध्यायही **'उत्तरगोग्रहण'** याच नावाने प्रसिद्ध आहे. ठरल्याप्रमाणे युद्धापूर्वी अर्जुनाने आपल्या रथाचे स्मरण केले. त्याबरोबर कपिध्वजांकित असा त्याचा रथ पृथ्वीवर अवतीर्ण झाला. रथावर अर्जुन उत्तरासह आरूढ झाला. कौरवसैन्यावर चालून जात असताना अर्जुनाने आपला देवदत्त नावाचा शंख फुंकला. त्यायोगे कौरवसैन्यात चलबिचल माजली. द्रोणाने अर्जुनाला ओळखले. आता याच्यापुढे आपले काय चालणार? अशीही शंका त्यांना आली. त्यांनी तसे दुर्योधनाला बोलून दाखविले. अज्ञातवासाचा पण पुरा न करता अर्जुन मुदतीपूर्वीच प्रकट झाला, तेव्हा पांडवांना पुन्हा वनवास व अज्ञातवास घडावा असे दुर्योधनाने सांगितले. कर्णादि वीरांस त्याने युद्धासाठी उत्तेजन दिले. द्रोणाचार्यादि गुरू पांडवांच्या बाजूचे आहेत त्यांचा सल्ला मानू नये. त्यांनी फक्त धर्मशास्त्र सांगावे, अर्जुनाची स्तुती करून कौरववीरांचे अंतःकरण दुःखित करावे, अशा शब्दांत दुर्योधनाने द्रोणादिकांची निंदा केली. कर्णानेही दुर्योधनाला या बाबतीत साथ दिली. कृप व अश्वत्थामा यांनी मात्र दुर्योधनाला व कर्णाला अर्जुनाच्या पराक्रमाची आठवण करून दिली. गुरूंची निंदा करून कोणासही जय मिळत नाही असेही त्यांनी सांगितले. या वादाच्या प्रसंगी भीष्म मध्ये पडले व अशा आणिबाणीच्या प्रसंगी मतभेद नसावा, असे त्यांनी सुचविले. यावर दुर्योधनानेही आपली चूक कबूल केली. याचवेळी द्रोणाने भीष्माचार्यांना प्रश्न विचारला, " पांडवांचा अज्ञातवास संपण्यासाठी अजून किती दिवसांचा अवधी आहे?" त्यावर भीष्माने सांगितले की ' चांद्रमान कालपद्धतीप्रमाणे पांडवांचा अज्ञातवास संपून पाच महिने बारा दिवस झाले आहेत. पांडवांनी आपली प्रतिज्ञा पूर्ण केली आहे. आता अर्जुन प्रकट झाला आहेच. पांडवांना यानंतर राज्य देऊन शांतता राखावी. परंतु दुर्योधनास हा विचार मानवला

नाही. त्याने युद्धास प्रारंभ केला. भीष्माने यावेळी सांगितले की, एक चतुर्थांश सेना घेऊन दुर्योधनाने स्वतःच्या नगरास जावे, एक चतुर्थांश सेनेने गाई स्वनगरास न्याव्यात आणि उरलेल्या निम्म्या सैन्याने अर्जुनाशी युद्ध करावे. भीष्माची ही योजना पसंत पडून दुर्योधन एक चतुर्थांश सेना घेऊन परत गेला. भीष्माने युद्धासाठी सैन्याची रचना केली. युद्धाला प्रारंभ करण्यापूर्वी गुरूला नमन करण्यासाठी म्हणून अर्जुनाने द्रोणाचार्यांच्या पायांशी दोन बाण टाकले. कोणत्या वीरांनी गोग्रहण केले हे पाहण्यासाठी अर्जुनाने आपला रथ कौरवसेनेपाशी नेला, तेव्हा त्याला भीष्म-द्रोण इत्यादी वीर दिसले, परंतु दुर्योधन मात्र दिसला नाही. दुर्योधन ज्या दिशेने गेला तिकडे अर्जुनाने आपला रथ वळविला. कृपाचार्यांस हे समजताच इतर वीरांसहित ते दुर्योधनाच्या संरक्षणासाठी धावले. दुर्योधनाचा पाठलाग अर्जुन करीत होता. त्याच्या शंखाच्या, धनुष्याच्या दोरीच्या, रथचक्राच्या, ध्वजावरील मारुतीच्या विविध नादांनी पृथ्वीही कंपित झाली. या प्रचंड आवाजामुळे गाई बुजल्या व उधळल्या. कौरवसेनेच्या ताब्यातून त्या निसटल्या. दुर्योधनाचे रक्षण करण्यासाठी कर्ण पुढे आल्यावर त्याचे व अर्जुनाचे मोठे युद्ध झाले. या युद्धात अर्जुनापुढे काही चालेनासे होऊन कर्णाने रणातून पळ काढला.

पंतकृत विराटपर्वाचा पाचवा अध्यायही **उत्तरगोग्रहण** याच नावाने ओळखला जातो. कर्ण पळून गेल्यानंतर कौरवांचे सैन्य काही काळ बिथरले. कौरवसैन्याला अर्जुनाने नकोसे करून सोडले. कृप, द्रोण, अश्वत्थामा, कर्ण व भीष्म यांच्याशी अर्जुनाने जोरदार युद्ध केले. द्रोणांचाही अर्जुनाने पराभव केला. आपल्या पित्याच्या साह्यार्थ अश्वत्थामा धावून गेला. त्यांचेही घनघोर युद्ध झाले.अश्वत्थाम्याचा पराभव होत आहेसे पाहून पुनः एकदा कर्ण लढण्यासाठी सिद्ध झाला. एका तीक्ष्ण बाणाने अर्जुनाने कर्णास मूर्च्छित केले. भीष्मांचाही पराभव अर्जुनाने केला. दुःशासनादी वीरांना अर्जुनाने पळवून लावले. एवढ्यात कर्ण, कृप व द्रोण हे तिघेही अर्जुनावर चालून आले. या तिघांवर अर्जुनाने इन्द्रास्त्र सोडून त्यांना पळवून लाविले. यानंतर भीष्म व अर्जुनाचे पुनः एकदा घनघोर युद्ध झाले. भीष्माचे धनुष्य अर्जुनाने तोडले.

त्यांच्यावर दहा उग्र बाण सोडून अर्जुनाने त्यांना मूर्च्छित केले. सहाव्या अध्यायात **उत्तरगोग्रहणाचे** आख्यान पुढे चालू झाले आहे. सर्व वीरांचा पराभव झाल्यावर स्वतः दुर्योधन आपल्या सैन्यानिशी अर्जुनावर चालून गेला. अर्जुनाने बाणांचा वर्षाव करून दुर्योधनाला वेढून टाकले. दुर्योधनाच्या मदतीला विकर्ण आला तेव्हा त्याचा हत्तीच अर्जुनाने मारून टाकला. दुर्योधनाच्या उरात बाण टाकून अर्जुनाने त्याला पुनः एकदा रणातून पळवून लाविले. दुर्योधन अर्जुनाशी पुनः युद्ध करण्यासाठी सज्ज झाला. त्याच्या रक्षणासाठी भीष्म, कर्ण, अश्वत्थामा, कृप, द्रोण इत्यादी वीर सिद्ध झाले. सर्वांनी एकदमच अर्जुनावर बाणांचा भडिमार केला. अर्जुनाने या कौरववीरांवर संमोहास्त्र सोडले. त्यामुळे भीष्माखेरीज सर्व वीर मूर्च्छित झाले. अर्जुनाने उत्तराकरवी कौरवांची वस्त्रे काढून घेतली व आपला रथ माघारी वळविला. शुद्धीवर असलेल्या भीष्माने अर्जुनावर बाणांचा वर्षाव केला. तेव्हा क्षुरप्र बाण सोडून अर्जुनाने भीष्माच्या घोड्यांचे व त्याच्या सारथ्याचे प्राण घेतले. अर्जुनास विजय मिळाला. दुर्योधनादी वीर शुद्धीवर आले तेव्हा अर्जुन आपल्या हातून निसटला याचे दुःख त्यांना फार झाले. संमोहावस्थेत आपण असताना अर्जुनाने आपणांस ठार केले नाही, यात त्याचा मोठेपणा आहे असे भीष्माने त्यांना पटविल्यावर निरुत्साह होऊन कौरवांचे सैन्य हस्तिनापुराकडे पराभूत होऊन चालू लागले.

अर्जुनही विराटनगरीकडे परतला. हा विजय आपण मिळविला. अर्जुनाचे नाव प्रकट करू नये; असे अर्जुनाने उत्तराला बजावले. उत्तराने हे कबूल केले. आपल्या विजयाची वार्ता त्याने विराट राजाला कळविली. शमीवृक्षावर अर्जुनाने आपली आयुधे पुनः ठेवली व कपिध्वजासहित आपला रथ परत स्वर्गलोकी रवाना केला. आणि पूर्वीचा बृहन्नडेचा वेष करून अर्जुन उत्तरासह विराट नगराकडे निघाला. एवढ्या मोठ्या कौरवसेनेबरोबर सुकुमार उत्तराची काय वाट लागणार! या चिंतेत विराट राजा होताच. त्याचे समाधान कंकाने केले. जोपर्यंत बृहन्नडा बरोबर आहे तोपर्यंत कौरवसैन्यास विजय मिळणार नाही, अशी खात्री विराट राजाची त्याने पटविली. उत्तराचे दूत येताच विजयी वार्ता ऐकून विराटास आनंद

झाला. ध्वजपताका लावून सर्व नगर शृंगारण्याची त्याने आज्ञा दिली. या आनंदाच्या प्रसंगी द्यूतक्रीडा करावी म्हणून त्याने कंकादी द्यूतकरांना बोलाविले. क्रीडा चालू असताना विराट राजा उत्तराच्या पराक्रमाची प्रशंसा करीत होता. बृहन्नडा होती म्हणून उत्तराचा निभाव लागला असे धर्म पुनः पुनः म्हणत राहिल्यावर विराट राजास त्याचा राग आला. रागाच्या भरात त्याने फासा कंकाच्या कपाळावर मारला. त्याबरोबर धर्माच्या कपाळातून रक्त येऊ लागले. धर्मराजाने ते आपल्या ओंजळीत धरले. त्याच्याच आज्ञेवरून सैरंध्रीने ते एका पात्रात धरले. रक्त धरणीवर पडले असते तर पृथ्वीचे भस्म झाले असते अशी कल्पना. एवढ्यात उत्तर येऊन पोचला. 'कंकाला कोणी मारले ?' अशी चौकशी उत्तराने केली. सारा प्रकार समजताच उत्तराने राजाला कंकाची क्षमा मागायला लावली. अर्जुनाचा उल्लेख न करता एका देवपुत्राच्या साह्याने आपणांस विजय मिळाला असे उत्तराने सांगितले. एकदोन दिवसांत हा देवपुत्र आपणांस भेटेल असेही तो म्हणाला. दोनतीन दिवसांत पांडव प्रकट होणार होतेच.

मोरोपंतांच्या विराटपर्वाचा अखेरचा सातवा अध्याय **वैवाहिक** पर्व नावाने प्रसिद्ध असून उत्तरा–अभिमन्यू-विवाहाचा प्रसंग यात वर्णन केला आहे. तीन दिवसांनी ठरल्याप्रमाणे श्रीकृष्णाचे चिंतन करून आपला नेहमीचा वेष धारण करून धर्म बंधूंसहित विराटाच्या राजसभेत येऊन बसला. धर्मराज सिंहासनावर बसत आहे असे पाहून विराट म्हणाला, 'तू साधा द्यूतकार ! तू सिंहासनावर बसतोस ?' त्यावर अर्जुनाने सर्वांची खरी ओळख विराटराजास करून दिली. विराटाने आपल्या हातून घडलेल्या अपराधांची क्षमा मागितली, आणि आपली कन्या उत्तरा हिचा स्वीकार अर्जुनाने पत्नी म्हणून करावा, अशी सूचना विराटाने केली. कन्येप्रमाणे वागणाऱ्या उत्तरेचा स्वीकार करण्यास अर्जुन तयार होईना. मात्र अभिमन्यूशी उत्तराचा विवाह व्हावा अशी त्याची सूचना सर्वांना मान्य झाली. विवाहाची आमंत्रणे सर्वांना गेली. अर्जुनपुत्र अभिमन्यू व उत्तरा यांचा विवाह मोठ्या थाटाने साजरा झाला. भोजनाचा, नृत्याचा, संगीताचा थाट उडाला.

## ५ विराटपर्वातील स्वभावचित्रण

कोणत्याही कथेला वा आख्यानाला रंग भरतो तो त्यातील विविध पात्रांच्या स्वभाववैशिष्टयांमुळे. मानवी रागलोभांतून संघर्ष निर्माण होतात आणि अशा संघर्षांतून कथावस्तूची निर्मिती होते. कथेला गती मिळते. महाभारत हे तर अशा मानवी नमुन्यांचे एक आगरच आहे. सत्वशील धर्मराजापासून मत्सरी दुर्योधनापर्यंत अनेक व्यक्तींचे नमुने महाभारतात आहेत. त्यांचे राग, लोभ, मद-मत्सरादी विकार यांनी सर्व महाभारतात संघर्ष निर्माण झाला आहे. अत्यंत प्रभावी महत्त्वाकांक्षा, आक्रमक मत्सर, पराकोटीची उदारता, अमर्याद सहिष्णुता इत्यादी अनेक चांगल्यावाईट मानवी गुणांचे परमोत्कट असे दर्शन महाभारतात घडते. द्रौपदी, भीम, अर्जुन, युधिष्ठिर, दुर्योधन, कर्ण, कुंती, द्रोणाचार्य, भीष्माचार्य, अश्वत्थामा इत्यादी व्यक्ती त्या त्या गुणाची वा अवगुणाची प्रतीके बनल्या आहेत. मानवी मनाचे जे अनंत बरेवाईट विकार असतील त्यांचे सामग्र्याने दर्शन महाभारतात घडते. कोणी आपत्तीत धैर्य टिकवून धरतो, कोणी सूडाने पेटून राहातो, कोणी मत्सराने जळतो, कोणी आपत्प्रसंगी सत्व जपण्याची पराकाष्ठा करतो. या सर्व व्यक्तींच्या परस्परसंबंधांतून कथानक फुलते, उमलते.

मानवी मनाच्या विविध व्यापारांचा खजिना म्हणजे महाभारत असल्याने अनेक प्राकृत कवींनी भारतीय कथा आधारासाठी घेऊन काव्यनिर्मिती केलेली आहे. आख्यानकवींचे लक्ष तात्त्विक चर्चेपेक्षा कथानकाच्या परिपोषाकडे असते. त्यांना कथानकासाठी प्रभावी व मनस्वी असे मानवी नमुने हवे असतात. हे मानवी नमुने पारंपारिक पद्धतीने दैवीकरणाकडे वा आसुरीकरणाकडे झुकले तर ते त्यांना अधिक पसंत असतात. मानवी रागलोभांचे अतिशयोक्तीने वर्णन केले तरच ते सर्वसामान्य वाचकास वा श्रोत्यास पटते याची चांगली जाणीव त्यांना असते. म्हणूनच धर्मराज, दुर्योधन,

कर्ण, अश्वत्थामा इत्यादी व्यक्ती एकेक प्रभावी गुणाचे अथवा अवगुणाचे प्रतीक बनविण्याची किमया प्राकृत कवींच्या हातूनही घडली आहे. या दृष्टीने महाभारतामधील विराटपर्वातील व्यक्तिरेखांचे शब्दांकन मोरोपंत कसे करतात हे पाहावयाचे आहे. प्रथमच ध्यानात येते की, विराट राजा, उत्तर राजपुत्र, उत्तरा राजकन्या, कीचक इत्यादी काही व्यक्ती सोडून दिल्या तर द्रौपदी, भीम, युधिष्ठिर, दुर्योधन, कृप, द्रोण, भीष्म, कर्ण, अर्जुन इत्यादींची ओळख आधीच्या पर्वांतून आपणांस झालेली आहे. आदी, सभा, वन या आधीच्या पर्वांतून आपणांस या व्यक्तींची ओळख झालेली असली तरी विराटपर्वातील त्यांच्या दर्शनाने आणखी काही पैलू मोरोपंत साकार करीत असताना दिसतात.

मोरोपंतांच्या विराटपर्वाच्या पहिल्याच अध्यायात धर्म, भीम, अर्जुन, नकुल, सहदेव, द्रौपदी, राणी सुदेष्णा, कीचक, विराट राजा इत्यादींचे दर्शन होते. ' नामें कंक द्विज मी, धर्माश्रित, अक्षकेलिदक्ष ' (१.६) अशा शब्दांत **धर्मराज** स्वतःच आपली ओळख विराटराजास करून देतो. धर्मराज कंक बनला. युधिष्ठिर अथवा धर्मराज खोटे कसे बोलणार ? सत्यनिष्ठा हा तर त्याचा बाणा. म्हणून त्याने आपणांसहित सर्व बंधूंची नावे सत्यास बाध येणार नाही अशी धारण करण्याचे ठरविले. ' कंक ' शब्दाचा अर्थ यम असाही असल्याने यम अथवा यमाचा पुत्र या अर्थाचे युधिष्ठिराचे हे नाव सत्यास सोडून नाही. कंक म्हणजे छद्मी, ढोंगी ब्राह्मण. याही अर्थाने विराटराजाच्या पदरी हा धर्मराज कंक म्हणून शोभतो. त्याचे द्यूतक्रीडा-पटुत्वही प्रसिद्ध आहे. राजदरबारात आश्रिताप्रमाणे वागण्याची सवय त्याला कोठून असणार ? पण धौम्य मुनींच्या उपदेशानुसार प्राप्त परि-स्थितीत वागण्याचे त्याने ठरविलेले दिसते. आपला बलाढ्य बंधू भीम, त्याला पाकगृहात आचारी म्हणून राहण्याची पाळी यावी याचे धर्मराजास फार वाईट वाटलेले दिसते. मोरोपंतांनी धर्माच्या मनोव्यवथेचे मोठे हळु-वारपणे वर्णन करताना म्हटले आहे, ' हळहळुनि म्हणे धर्म, ' स्वपदा हरिपादपल्लवा ! लाहो ' (१.९) ही अशी अवस्था पाहण्यापेक्षा आपण वैकुंठामधील हरिचरणांत विलीन व्हावे असे त्याला वाटणे स्वाभाविक आहे.

द्रौपदीसहित सर्वजण वेष व नावे पालटून विराटाच्या राजदरबारात सेवक म्हणून राहिले. धर्मराजास या घटनेचे दुःख वारंवार होते. परंतु प्रतिज्ञे-प्रमाणे अज्ञातवास कंठावयाचा होता. द्यूतात मिळलेला पैसा तो आपल्या भावांना गुप्तपणे देत असे. हा धर्मराज या संकटप्रसंगीही धैर्याने राहातो. आपली नीतिपरायणता, क्षमाशील वृत्ती, सत्यप्रीती तो सोडीत नाही. कीचकाच्या अपराधाचा राग धर्मराजास येतो. द्रौपदीने किती म्हणून विटंबना सहन करावी ? पण धर्माची वृत्ती क्षमाशील, पुनः तो प्रतिकूल परिस्थितीत अडकलेला. राजासमक्ष कीचकाने सैरंध्रीस लाथ मारली तरी धर्मराज स्वस्थ आहे ! कसा ? तर मोरोपंत सांगतात, नागांना अस्तिकाची शपथ असल्यामुळे जसे शांत बसावे लागले त्याप्रमाणे धर्मराजाला राग आवरावा लागला. धर्मराज हा सहिष्णू खरा, शांतवृत्तीचा खरा; पण त्याच्याही मानवी भावना उचंबळून येतात, पण तो त्यांना त्वरित आवरतो. धर्मराजाने शांतपणे भीमाच्या अंगठ्याला दाबून धरून त्यालाही शांत केले. कारण अज्ञातवासाची प्रतिज्ञा पाळावयाची होती ! आणि द्रौपदीचे म्हणजे सैरंध्रीचे सांत्वन करावयाचे होते. तो तिला म्हणतो 'तुझे गंधर्वपती समर्थ आहेत. देशकालाचे मर्म जाणणारे आहेत.' (१.७८)

संकटप्रसंगी काही सूचना देणे, सर्वांचा राग आवरणे, प्रसंग कसातरी निभावून नेणे; इतकीच कामे धर्मराजाची दिसतात. विराटराजाच्या गाई त्रिगर्तानी पकडल्या तेव्हा धर्मास फार वाईट वाटले. मृत्युमुखात चाललेल्या विराटराजाचे रक्षण भीमाने करावे म्हणून धर्मराज सुचवितो (२.४८-४९) त्याप्रमाणे भीमाने सुशर्म्यास पकडले. त्याला त्याच्या केसांनी धरून भीमाने धर्मराजासमोर आणले. धर्मराजाने आपल्या स्वभावानुसार भीमाला सांगितले, 'हा राजा आपणांस शरण आला आहे. त्याला प्राणदान दे.' भीम व धर्मराज यांनी संकटाचा नाश केला. विराट राजा धर्मावर प्रसन्न झाला. राज्यही द्यायला विराट तयार झाला. पण सत्वशील धर्मराज म्हणाला, 'आम्हांस सर्व काही मिळाले. राजाची सेवा करणे हाच आमचा धर्म, आम्ही स्वामित्व स्वीकारणे योग्य नाही.' (२.७१) हा धर्मराज पुढे आपणांस सहाव्या अध्यायात भेटतो. उत्तराने यश मिळविले अशी सर्वांची

समजूत असताना धर्मराज बृहन्नडेची म्हणजे अर्जुनाची स्तुती करून विराट राजाचा रोष ओढवून घेतो. विजयासाठी द्यूत खेळताना जणु तो स्वानुभवाचे बोल विराट राजाला ऐकवितो; ' राजा, बुद्धी सावध ठेवून खेळ, कारण व्यसन हे कधी कधी माणसाला संकटाच्या फेऱ्यात घालते...धर्मराज, नळ यांना द्यूतामुळेच वनवास भोगावा लागला. या जुगारापायी यश, पैसा, कीर्ती, स्त्री इत्यादींचा त्याग करण्याचा प्रसंग येतो. ' (६.८०–८२) खेळ सुरू असताना धर्म बृहन्नडेची स्तुती करून विराटाला जणु चिडवितोच; राजा संतापून फासे धर्मराजाच्या कपाळावर मारतो. त्याच्या कपाळातून रक्त वाहते. द्रौपदी ते एका पात्रात साठविते. हा सर्व प्रसंग अर्जुनाने पाहू नये, तो कदाचित प्रलय करून विराटाला मारील अशी धास्ती धर्मराजाला वाटते. उत्तराने जेव्हा बापास समजाविले तेव्हा राजाने धर्मराजाची क्षमा मागितली. सातव्या अध्यायात हा धर्मराज श्रीकृष्णाच्या चरणकमलांचे स्तवन करून मत्स्यराजाच्या सिंहासनावरच बसतो. पुनः विराट रागावतो. पण अर्जुनाकडून सर्व उलगडा होतो तेव्हा त्याला पुनः पश्चात्ताप होतो. धर्मराजानेच उत्तरेचा व अभिमन्यूचा विवाह व्हावा असे सुचविले. सर्व आप्तांना एकत्र जमविले. धर्मराजानेही पुष्कळ दानधर्म केला.

युद्धिष्ठिरानंतर मोरोपंतांच्या विराटपर्वात आपणांस भेटतात ते भीम व अर्जुन. **भीमाचे** स्वभावचित्रण प्रामुख्याने कीचकवधाच्या पहिल्याच अध्यायात प्रकटपणे जाणवते. हा भीम विराटराजाच्या स्वयंपाकगृहात बल्लव या नावाने आचारी म्हणून राहिला. ' पौरोगव बल्लव ' असे याचे येथील नाव. पौरोगव या शब्दाचा अर्थ पुरोगाचा म्हणजे वायूचा पुत्र असा असल्याने येथे असत्य बोलण्याचा दोष नाही. वल्लव म्हणजे स्वयंपाक करणारा सूपकार. बलवान अशा भीमाला स्वयंपाकगृहात आचारी म्हणून राहाण्याची पाळी आली. या बल्लवाच्या पराक्रमाचे पहिलेच दर्शन घडते ते ब्रह्मोत्सवात मल्लविद्येच्या वेळी. अथवा जीमूतयुद्धाच्या वेळी. भीम भीतभीतच आखाड्यात उतरतो. कारण आपल्या पराक्रमामुळे कोणी आपणास ओळखील की काय, ही भीती त्याला वाटतेच. भीमाने जीमूताला शंभर वेळा फिरवून जमिनीवर आपटून ठार केले. (१.३९) राजस्त्रियांचे मनो-

रंजन व्हावे म्हणून भीमाला क्रूर श्वापदांशीही युद्ध करावे लागले. भीम खऱ्या अर्थाने संतापतो, रागाने लाल होतो ते सैरंध्रीची कीचकाने केलेली विटंबना पाहून. धर्मराजाने अंगठा दाबून भीमास शांत केले; नाहीतर कीचक तेथल्या तेथेच त्याने संपविला असता. द्रौपदीला यावेळी पाकशाळेतील भीमाचीच आठवण झाली. उपरोधाने बोलून तिने भीमास डिवचले. भीम करुणेने व प्रेमाने पाझरला व त्याने आपल्या पीडित पत्नीस विचारिले,

**दयिते ! कां आलीस ? प्रमदे ! हा आर्द्र कां पदर ? ज्याये !**
**भ्यालीस भीरू ! भय कां ? भेटे त्यालाचि कांप, दर ज्या गे (१.८९)**

'दयिते तू का आलीस ? का भ्यालीस ? तुझा पदर भिजलेला कसा ?...मांडीवरून न उतरता काय झाले ते सांग ना ! ' यावर द्रौपदीने आपणांवर आलेल्या संकटाची सर्व हकीकत भीमास सांगितली. त्याचा राग तिने डिवचला. तेव्हा भीम तिला म्हणाला, 'उगी न रडे । अज्ञातवास नसताच, तरि अरिचें तैंचि मुरडितों नरडें' (१.१०७)–अगे, मी धर्माच्या आज्ञेने भ्यालो, दुर्योधनाच्या गदेला नाही.' आणि नंतर भीमाने तिला कपट कारस्थान सुचविले. तो स्वतःच मध्यरात्री शयनावर झोपून राहिला. समय येताच त्याने कीचकाचा गळा दाबून त्यास बुक्क्यांचा मार देण्यास सुरुवात केली. कीचकास त्याने आपटून ठार केले. स्मशानात कीचकाच्या बंधूंनाही त्याने ठार मारले. सैरंध्रीस संकटमुक्त केले. आपण आपले कर्तव्य केल्याचे समाधान व्यक्त करताना तो म्हणतो, 'केले कलत्ररक्षण पतिनें, तरी काय हो ! नवल यश तें' (१.१८१) भीम हा धर्मराजाच्या आज्ञेत आहे. सुशर्म्याला पकडून आणल्यानंतर धर्माच्या आज्ञेने तो त्यास सोडून देतो. धर्मावर त्याची श्रद्धा व द्रौपदीवर निःसीम प्रेम आहे.

विराटनगरातील वास्तव्यात लक्षात राहाणारे आणखी एक व्यक्तिमत्व म्हणजे **अर्जुनाचे** होय. धनुर्विद्येचे महापराक्रम करणारा अर्जुन हा बृहन्नडा या नावाने राजस्त्रियांना गायन, वादन, नर्तन इत्यादी कला शिकविण्यासाठी स्त्रीवेषाने राहिला. बृहन्नडा–ला म्हणजे नारायणसखा. हे नाम धारण करण्यात अर्जुनाकडे असत्य बोलण्याचा दोष येत नाही. बृहन्नडा म्हणजे मोठा, खरा नर. याही दृष्टीने त्याचे नाव सार्थ आहे. अर्जुनाचा पराक्रम

उत्तरगोग्रहणाच्या वेळी विशेषत्वाने ध्यानात येतो. दुर्योधनाने उत्तरेकडून हल्ला चढविल्यावर विराटपुत्र उत्तर सामना देण्यासाठी निघाल्यावर द्रौपदीच्या परवानगीने अर्जुन त्याचे सारथ्य करायला सिद्ध होतो. पराक्रमाची संधी येताच अर्जुनाच्या मुखावर 'उठल्या उत्साहाच्या त्या शांत-श्रीमदुदधिवरी लहरी' (३.२३) समुद्राच्या प्रमाणे धीरगंभीर असलेल्या अर्जुनाच्या मुखावर आनंदाच्या उर्मी उमटल्या. केवळ गंमत म्हणून ही बृहन्नडा उत्तरास म्हणते, 'अभिनय, गायन, नृत्य यांचीच सवय मला. रणावर सारथ्य मी कसे करू?' पण उत्तराच्या आग्रहासाठी अर्जुन सारथ्य करण्यास तयार झाला. कवच अंगावर धारण करताना अर्जुनाने दाखविलेले अज्ञान पाहून उत्तरादी कन्या हसल्या. परदास्यात असल्यामुळे अर्जुनाला असे सारथ्य करण्याचा प्रसंग आला. बृहन्नडेने रथ कौरवसेनेसमोर आणला. सैन्य नीट न्याहळून घेण्याबद्दल उत्तरास सांगितले. उत्तर घाबरून गेला. त्याला रणांगणावर उचित असा उपदेश अर्जुनाने केला. परंतु उपयोग झाला नाही. भीतीने उत्तर रणांगणावरून पळत सुटला. त्याच्या मागे त्याला धीर देत अर्जुन धावत राहिला. वेषावरून क्लीबासारखा वाटणारा हा सारथी अर्जुन तर नव्हे? अशी शंका कौरवांनाही आली. अर्जुनाने उत्तराबरोबर शमी वृक्षावरील शस्त्रे काढली. आपल्याला साह्य करावे म्हणून अर्जुनाने त्या शस्त्रांची प्रार्थना केली. शंभर सोन्याचे ठिपके असणारे गांडीव धनुष्य त्याने सज्ज केले. आपणच वीर अर्जुन असल्याची कबुली या वेळी अर्जुनाने उत्तरास दिली. आपली फाल्गुन, जिष्णू, किरीटी अशी दहा नावेही त्याने सांगितली. आता अर्जुन वीर योद्धा व उत्तर सारथी बनला. आपल्या गांडीव धनुष्याच्या टणत्काराने अर्जुनाने सर्व पृथ्वीस कंपायमान करून सोडले. त्याचा कपिध्वजांकित रथही आकाशातून पृथ्वीवर आला. त्याने आपला देवदत्त नावाचा शंख जोराने फुंकला. प्रत्यक्ष शंकराचाही पराभव करणारा अर्जुन समोर दिसताच कौरवसैन्यात खळबळ उडाली. अर्जुनाने नमन म्हणून गुरुवर्य द्रोणाचार्यांच्या पायांशी दोन बाण सोडले. अर्जुनाचे हे कृत्य पाहून द्रोणाचार्यही विरघळले व त्यांनी अर्जुनाविषयी उद्गार काढले, 'जाले बहु, होतील बहु, आहेतहि बहु, परंतु यासम हा (४.७५)–

महादेवा, या अर्जुनासच यश मिळू दे.' त्यानंतर अर्जुन दुर्योधनासच गाठण्याचा प्रयत्न करतो. 'सोडा गोधन, नाहीं तरि वधिन तुम्हांसि' (४.८४) अशी जाणीव तो देतो. आपणांस शंकर प्रसन्न आहेत अशी खात्री अर्जुनास वाटत असते. आपल्या बाणांच्या वर्षावाने सारे कौरवसैन्यच अर्जुनाने झाकून टाकले. अर्जुनाने कर्णाबरोबरही असाच भीषण झगडा केला. द्रोणाचार्य, अश्वत्थामा, कर्ण, भीष्म इत्यादींशीही अर्जुनाने अशीच निकराची युद्धे केली. कौरववीर संमोहावस्थेत असताना त्यांना मारण्याची धीरोदात्त वृत्तीही प्रसंगी अर्जुन दाखवितो. दुर्योधनाचाही नक्षा अर्जुनाने उतरविला.

अर्जुनाच्याच सांगण्यावरून उत्तराने विजयवार्ता नगराकडे कळविली. अर्जुनाने आपली आयुधे परत शमीवृक्षावर ठेवून दिली. या पराक्रमी अर्जुनाचे वर्णन करताना मोरोपंतांनी म्हटले आहे, 'शत्रूचे बाण वर्मस्थानी बसल्यामुळे रक्ताने न्हालेल्या आपल्या शरीरास अर्जुनाने परत स्त्रीवेषाने झाकून टाकले. त्याने परत उत्तराच्या रथाचे सारथ्य पत्करले' (६.६०) शेवटी विराट राजास खरा वृत्तांत कळतो. विजय मिळविला तो बृहन्नडा-रूप अर्जुनाने, उत्तराने नव्हे. हे समजल्यावर विराटराजास अतिशय आनंद झाला. त्याने आपली कन्या उत्तरा अर्जुनास देण्याचा मानस व्यक्त केला. धर्मराजाने अर्जुनाकडे पाहिले, आणि थोरल्या बंधूंचा मनोगत ओळखून अर्जुनाने मोठे औचित्यपूर्ण उत्तर दिले, 'तुझी कन्या वर्षभर माझ्या मुली-प्रमाणे होती. माझ्या पराक्रमी पुत्राची वधू ती शोभेल'. हे त्याचे बोलणे मोरोपंत म्हणतात त्याप्रमाणे श्रीकृष्णाच्या वेणुनादाहून शोभून दिसले.

मोरोपंतांच्या विराटपर्वात पुरुषपात्रांपैकी आणखी दोन महत्त्वाची पात्रे म्हणजे दुर्योधन व कीचक होय. विराटपर्वाच्या कथेत अर्थात्‌च दुर्यो-धनापेक्षा **कीचकाच्या** व्यक्तिचित्रणास महत्त्वाचे स्थान आहे. पहिल्याच अध्यायात 'कीचकनामा सेनापाल श्याल प्रसिद्ध राजाचा' (४३) अशी ओळख कीचकाची मोरोपंत करून देतात. विराट राजाचा हा सेनापती राणी सुदेष्णेचा मानलेला भाऊ होता. द्रौपदीचे पातिव्रत्य भंग करण्याचा दुष्ट हेतू त्याने मनात धरला. आपल्या भगिनीस निर्लज्जपणे तो म्हणाला, 'पूर्वीं आढळली या न हे मला भवनीं। वाटे जन्मदरिद्रचा झाला बहुकोटि

हेमलाभ वनीं ' (१.४४) या महालात मला ही पूर्वी कशी दिसली नाही ? हा सुवर्णाचा ठेवा येथे असताना मी हा असा जन्मापासूनच कर्मदरिद्री कसा ? या नराधम कीचकाने आपल्या भगिनीची उडत उडत अनुज्ञा घेतली आणि तो द्रौपदीच्या मागे लागला. सैरंध्रीच्या नादी आपला पती लागण्यापेक्षा भाऊ लागलेला बरा असा धूर्त विचार राणीचा होता. मद्य आणण्यासाठी आलेल्या सैरंध्रीस कीचक म्हणतो, ' सर्वस्व अर्पितों तुज, देवि ! करीं पूर्ण काम, हो दारा (१.६२)–तू माझी पत्नी हो. मी तुला सर्वस्व देईन. माझी इच्छा तू पूर्ण कर, ' एवढे बोलून कीचकाने सैरंध्रीचा हात धरला. द्रौपदीने तो झिडकारला, तेव्हा कीचक एखाद्या प्रचंड वृक्षाप्रमाणे कोसळला. पण तो मद्य पिऊन बेभान झाला होता, तो पुनः उठला, त्याने सैरंध्रीची वेणी पकडली व प्रत्यक्ष राजासमोर त्याने तिला लत्ताप्रहार केला. त्यानंतर भीमाने कारस्थान केले. सैरंध्रीच्या शयनावर तोच मध्यरात्री झोपण्याचे सोंग घेऊन निजला. मदांध कीचक कामातुर होऊन आला. आणि तिला म्हणाला, ' सुमुखि ! मज भज, तुजसीं म्यां चुकोनि कळि केला '(१.११६) या कीचकाच्या वल्गना पाहा काय आहेत त्या ! तो म्हणतो, ' सुंदरि ! विराट राजा नावाचा जाण, साच मत्स्यप हा '(१.११७)–सुंदरी, मीच या देशाचा खरा स्वामी आहे. मी शृंगाररसतरंगणीत डुंबण्यासाठी तळमळतो आहे. कीचक तिला प्रेमाने म्हणू लागला, ' प्रिये, तुझ्यासाठी मी सर्वस्वाचा नजराणा घेऊन आलो आहे. येथे दिवा असता तर त्याच्या प्रकाशात तुझे सौंदर्य मला दिसले असते. ' (१.१२९–३०) कीचकाला अशाच या कामातुर अवस्थेत भीमाने ठार केले.

कौरवप्रमुख **दुर्योधन** ही एक मत्सरी व दुष्टवृत्तीची व्यक्ती विराटपर्वाच्या उत्तरार्धात चमकते. पांडवांचा वनवास संपला, अज्ञातवासही संपेल आणि आपणांस त्यांचे राज्य त्यांना द्यावे लागेल याची चिंता दुर्योधनास आहे. आपले हेर वेगवेगळ्या दिशांना पाठवून पांडवांचा अज्ञातवास विफल करण्यास तो उत्सुक आहे. नाना तर्क, संशय यांनी दुर्योधन नेहमीच व्यथित आहे. कीचकास कोणी मारले ? पांडव पृथ्वीवर असतील का ? इत्यादी प्रश्नांची चर्चा दुर्योधन कर्ण, भीष्म, द्रोण इत्यादींच्या बरोबर कर-

ताना दिसतो. दुर्योधनाने या प्रसंगी कुटिल डाव रचण्यास प्रारंभ केला. विराटराजावर हल्ला करण्यासाठी दक्षिणेकडून तो सुशर्म्याला पाठवितो व आपण स्वतः उत्तरेकडून हल्ला करून विराटाचा पराभव करण्याचे ठरवितो. विराटराजावर त्याने हल्ला केला तेव्हा त्याला अर्जुनाप्रमाणे स्त्रीवेषधारी व्यक्ती (बृहन्नडा) दिसते. त्याला अतिशय आनंद होतो. आता पांडवांचा अज्ञातवास पुरा होण्यापूर्वीच अर्जुन प्रकट झाला. पुनः त्याला म्हणजे पांडवांना वनवास व अज्ञातवास भोगावा लागेल अशी आनंदाची उर्मी दुर्योधनाच्या मनात निर्माण झाली. आणि हा जर अर्जुन नसेल तर विजय आपलाच आहे, अशीही त्याने मनाची समजूत करून घेतली. परंतु भीष्माने त्याची कानउघाडणी केली. चांद्रमासाप्रमाणे पांडवांचा अज्ञातवास पूर्ण झाला आहे असे ते म्हणाले. द्रोणादिकांनीही दुर्योधनाची समजूत काढण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याने द्रोणांची निंदा करण्यास मागेपुढे पाहिले नाही. तो वेळप्रसंगी त्यांची क्षमाही मागतो. अर्जुनाशी निकराने युद्ध करण्यात, पराभव होत असताही परत युद्धास सामोरे जाण्यात दुर्योधनाचे शौर्य विशेष दिसते. पराभव पत्करण्यात त्याचा बाणेदारपणा दिसतो.

थोडीफार विनोदी वाटणारी व रणांगणावर भीतीने वावरणारी एक व्यक्ती म्हणजे विराटपुत्र **उत्तर** होय. मोरोपंतांनी त्याची स्वभावरेखा अतिशय मार्मिक व स्पष्टपणे रेखाटली आहे. त्याची वढाई, बायकांत प्रकट होणारे त्याचे शौर्य, प्रत्यक्ष रणांगणावर होणारी त्याची भयग्रस्त अवस्था, त्याचे पलायन यांचे मोठे हृद्य पण सहानुभूतिपूर्ण चित्र मोरोपंत रंगवितात. आपणांस कोणीतरी चांगला सारथी हवा; म्हणजे आपण पराक्रम दाखवू, असे उत्तर म्हणताना दिसतो. परंतु प्रत्यक्ष रणांगणावर काय घडले ? कौरवसैन्यास पाहाताच उत्तर गडबडून गेला. मोरोपंत मार्मिकपणे त्याची दयनीय अवस्था पाहून म्हणतात, ‘ स्वपरबळाबळ नेणुनि बालिश बहु बायकांत बडबडला ’ (३.३९) उत्तराची वढाई फक्त बायकांतच. तो बृहन्नडेला म्हणाला, ‘ कौरवांचे हे सैन्य मला प्रलयकाळाच्या समुद्राप्रमाणे वाटते, माझ्या मनात भीती निर्माण झाली आहे. रथ परत नगराकडे ने’ (३.४०) उत्तराच्या अंगास यावेळी घाम सुटला. अर्जुनाने त्याची फार समजूत काढली.

पण तो रणांगणावरून पळू लागला, अर्जुनाने त्याच्या मनास धीर दिला. प्रत्यक्ष लढण्याचे काम स्वतःकडे घेऊन त्याने उत्तरास फक्त सारथ्य करण्यास सांगितले. ते त्याने निमूटपणे केले, पण त्याचा भित्रा स्वभाव काही कमी झाला नाही, अर्जुनाशी त्याची खरी ओळख झाल्यावर त्याचा पराक्रम पाहून तो त्याचा भक्त बनला. आपला विजय हा एका देवदूताच्या साह्याने हाती आला असेही त्याने वडिलांना भासविले. मोरोपंतांचा उत्तर अशा रीतीने भित्रा असला तरी अप्रामाणिक नव्हता.

विराटपर्वात स्त्रीपात्रे म्हणजे द्रौपदी, राणी सुदेष्णा व उत्तरा. पैकी पहिल्याच अध्यायात द्रौपदीचे व सुदेष्णेचे दर्शन आपणांस होते. अज्ञातवासात सैरंध्री म्हणून काळ कंठणाऱ्या **द्रौपदीवर** विराटनगरीत एक मोठीच आपत्ती आली. सैरंध्री म्हणजे राजभार्या. राणी सुदेष्णेची वेणीफणी करून तिचे दास्यत्व पत्करण्याचे काम महाराज्ञी द्रौपदीस करावे लागले. या द्रौपदीचे सौंदर्य जेथे तेथे आड आले. दासीच्या वेषातील ही सैरंध्री वेडगळ वाटली तरी तिने सर्वांचे चित्त वेधून घेतले. मुद्दाम मलिनवेष धारण करूनच प्रथम द्रौपदी राणीकडे गेली. राणीस तिच्या रूपसौंदर्याचे आश्चर्य वाटले, 'अंबिका दुर्गेच्या कृपेने असे रूप पाहायला मिळते, कोणता डोळस तुला ठेवून घेणार नाही ?' (१.१२) पण याच वेळी राणी सुदेष्णेच्या मनात स्त्रीस्वभावास अनुसरून नाना प्रकारच्या शंका आल्या. 'काय करावे म्यां तरि, जरि सुंदरि ! अनुसरेल पति तूंतें ?' (१.१४) आपलाच पती हिच्यावर भाळला तर काय करायचे ? अशी शंका तिने बोलून दाखविल्यावर द्रौपदी म्हणाली, 'मी पाच गंधर्वांची पत्नी आहे. माझे शरीर इतरांना भोगण्यास योग्य नाही. जो मला स्पर्श करील तो जळून नाहीसा होईल. काही काळपर्यंत मला हे सैरंध्रीपद सांभाळावयाचे आहे.' (१.१५–१७)

त्यानंतर सैरंध्री राणीची दासी म्हणून काम पाहू लागली. तिच्याच अमृतमय वर्षावाने चोरटेपणाने का होईना पण चार महिने पांडवांचे सुखात गेले. पण पुढल्या संकटांची चाहूल तिला लागलीच. राजस्त्रियांच्या मनोरंजनासाठी भीमास क्रूर पशूंशी झुंज खेळावी लागली हे पाहून द्रौपदी म्हणाली, 'कृष्णा, यापेक्षा मला तू मरण का देत नाहीस ?' (१.४१) पुढे लागलीच

तिच्यावर कीचकाची दुष्ट दृष्टी पडली. ती कीचकाला प्रथमच फटकारून बोलते, ' कीचका, तुझा नाश होईल. मी प्रत्यक्ष नागीण आहे. माझे पती शंकराप्रमाणे उग्र आहेत. मला स्पर्श करशील तर फुकट मरशील.' (१.४९ ५०) याच सैरंध्रीच्या मोहात आपला पती सापडण्यापेक्षा मानलेला भाऊ कीचक सापडलेला बरा, असा धूर्त विचार राणी सुदेष्णेने केला व द्रौपदीस मद्य आणण्यासाठी कीचकाकडे पाठविले. कोणा तरी दुसऱ्या दासीची योजना करावी अशी सैरंध्रीची विनंतीही राणीने मान्य केली नाही. मग काय करता ? परदास्यत्वापेक्षा नरकवास बरा, असे समजून सैरंध्री कीचकाकडे गेली. जाताना तिने श्रीकृष्णाचा धावा केला. सूर्यमंडळातून तिने मदतीसाठी एक राक्षस मिळविला. सैरंध्रीला पाहाताच कीचक हुराळून गेला. त्याने आपला नीच हेतू तिच्यासमोर प्रकट केला. पण ती एवढेच म्हणत होती, ' सुदेष्णेकरितां पात्रीं भरूनि आसव दे.' (१.६३) कीचकाने तिचा बळजबरीने हात धरला तेव्हा तिने त्याला झिडकारून टाकले. पण कीचक मदोन्मत्त व कामातुर बनला होता. त्याने तिची वेणी धरून तिच्यावर लत्ताप्रहार केला.

द्रौपदीच्या अंगाची लाहीलाही झाली. पराक्रमी पाच पती असताना एवढी विटंबना या साध्वीने काय म्हणून सोसावी ? पुन: सभापर्वाप्रमाणेच तिचा आक्रोश सुरू झाला. ' राजाची धर्मनीती संपली काय ? बलात्कार होत असताना राजा गप्प कसा ? प्रेमाने माझे रक्षण करणारे माझे गंधर्व पती आहेत कोठे ?' (१.७२–७३) शेवटी रात्री द्रौपदीने भीमाची चोरून भेट घेतली. तिने भीमाचा राग जागा केला. तो म्हणाली, ' स्वयंपाकगृह हेच तुमचे आश्रयस्थान का ? ..... तुम्ही जिवंत आहात का मेला आहात ?' (१.८४–८७) द्रौपदीने अश्रुपूर्ण डोळ्यांनी कीचकाने केलेली विटंबना सांगितली. ' तुम्ही हे सारे कसे सहन करता ? हंसांनी काकवृत्ती का धारण केली आहे ? मला लाथ मारणारा तो दुष्ट कीचक जिवंत राहतो कसा ? पत्नी अशी संकटात असताना पती तरी जिवंत कसा राहतो ? विवाहाच्या वेळी केलेली प्रतिज्ञा तुम्ही कशी विसरलात ? ' अशा शब्दांत द्रौपदीने भीमाचा उत्साह जागा केला. गंध उगाळून हातास पडलेले घट्टे तिने

भीमास दाखविले. शेवटी भीमाच्या कारस्थानात ती सामिल होते. कीचकाचा वध होतो. आता तरी या द्रौपदीचे संकट दूर व्हावे ? पण नाही. याच सैरंध्रीमुळे सर्व अनर्थ घडला म्हणून उपकीचकांनी तिला कीचकाच्या प्रेताबरोबर जाळण्याचे ठरविले. मग द्रौपदी अधिकच शोकाकुल होऊन म्हणाली, ' गंधर्वपुत्रांनो, तुम्ही कीचकाला न मारता मला मारिले असते तर फार बरे झाले असते.' (१.१७८) भीमाने या उपकीचकांचाही वध केल्यानंतर सैरंध्रीला जरा हायसे वाटले. द्रौपदीकडे वाईट नजरेने पहाण्याचे बंद झाले. पण यातून आणखी एक नवे संकट उभे राहिले. ही सैरंध्री आपणांकडे नकोच असा आग्रह राजाने सुदेष्णेकडे धरिला. कसे तरी करून द्रौपदीने तेरा दिवसांची मुदत मिळविली. अशा रीतीने द्रौपदीवर एकसारख्या आपत्तीच कोसळत होत्या. महाराज्ञी असून परक्या राजाच्या पदरी दासी म्हणून राहायचे, आपली ओळख पटवू द्यायची नाही, पाचही पतींना सांभाळायचे, अशी मोठी खडतर तपस्या या सैरंध्रीस करावी लागली. आपल्यावर येणाऱ्या विपत्तीची तिला राहून राहून आठवण येते. सहाव्या अध्यायात धर्मराज द्यूतकर्मात व्यग्र होतो. द्यूतपट सैरंध्रीसच आणावा लागतो, तेव्हा ती मनात म्हणते, ' मेल्या अक्षकरांचें समूळ तळपट होत ' (६.७८) संकटातही ही सैरंध्री सावध आहे. आपल्या पतींना सावरणारी आहे. विराटाने फासा मारून धर्माला जखम केली तेव्हा गळणारे रक्त हिनेच पात्रात वरचेवर धरले. ते जमिनीवर पडते तेव्हा सारी पृथ्वी नष्ट झाली असती हे तिने हेरले होते. विराटनगरात शेवटी उत्तरा–अभिमन्यूच्या विवाहातच द्रौपदीला काय सुख लाभले असेल तेवढेच.

# ६ | पंतांची संवादकुशलता

कथानकाला गती व सजीवता येते ती रेखीव स्वभावचित्रणामुळे. स्वभावचित्रण रेखीव व सजीव बनते ते संवादकुशलतेने. संथ असलेले कथा-निरूपण संवादांमुळे गतिमान होते. संवादांत पात्रांच्या स्वभाववैशिष्टयांची चमक ध्यानात येते. श्रेष्ठ कथाकार अथवा आख्यानक कवी या संवादांचे महत्त्व ओळखून चतुराईने महत्त्वाच्या व्यक्तींचे स्वभावविशेष त्यांच्यांतील संवादांच्या द्वारे प्रकट करीत असतो. विविध भावनांचा व विकारांचा आविष्कारही संवादांमधून योग्य रीतीने होतो. मोरोपंतांच्या 'विराटपर्वात' अशी संवादकुशलता जागजागी प्रकट झालेली दिसते. प्रसंग, पात्राचा स्वभाव-विशेष व कथानकाचा ओघ पाहून मोरोपंत संवादाची योजना करताना दिसतात. निरूपणाची भाषा वेगळी व दोन व्यक्तींच्या संवादाची भाषा वेगळी म्हणजे चटकदार, सोपी, नेहमीच्या बोलण्यातील असावी हेही मोरो-पंतांनी ध्यानी घेतले आहे. संवादावरून बोलणारी व्यक्ती स्त्री की पुरुष? याचाही बोध व्हावा, बोलणाऱ्याच्या मनातील राग–लोभ प्रकट व्हावेत अशा खुबीने मोरोपंत संवादरचना सहजासहजी करतात.

पहिल्या अध्यायात मलीनवस्त्रा द्रौपदीस पाहून सुदेष्णा विचारते,

'बाई! कवण तूं? असी दशा कां गे'. त्यावर द्रौपदी म्हणते,

'कृष्णाश्रित-भुजिष्या सैरंध्री मी' त्यानंतर राणी म्हणाली,

'पहाया रूप असें, ईश्वरीस नवसावें। कोण सचक्षु म्हणेल स्वगृहीं तुज सुंदरीस न वसावें?'

द्रौपदी व सुदेष्णा यांच्यांतील मोरोपंतकृत हा संवाद फार मार्मिक व दोघींच्या स्वभावांची वैशिष्टये समजावून देणारा आहे. सत्याचे परिपालन, पतींवरील निष्ठा, दास्यभावाची खंती, काही थोडीशी अगतिका इत्यादी भाव सैरंध्रीच्या बोलण्यातून व्यक्त होत आहेत. आणि राणीस सैरंध्रीच्या

सौंदर्याचा लोभ तर आहेच, पण आपला पतीच या लोभात सापडेल की काय, याचीही सूक्ष्म चिंता तिला आहे! कारण ती म्हणतेच आहे, 'काय करावें म्यां तरि, जरि सुंदरि! अनुसरेल पति तूतें?' (१.१४) याच अध्यायात सैरंध्री व कीचक यांचाही संवाद असाच चटकदार, मार्मिक व दोघांची स्वभाववैशिष्टये प्रकट करणारा आहे. द्रौपदी कीचकास म्हणते,

**कृष्णा म्हणे, 'अहाहा! बुडती, तरि भजति नीच कामातें।**
**सावध हो, गा! वध हो न, व्याळी जाण कीचका! मातें ॥ ४९ ॥**
**परदारा मी, मत्पति गंधर्व, प्रबळ उग्र शिवशील।**
**मागें सरसिल, तरसिल; मरसिल जरि मज बळेंचि शिवशील ॥५०॥**

या पुढला सर्व संवाद कथानकास गती देतोच, पण सारे कथानक सजीव करण्याचे सामर्थ्य त्यात आहे. 'रंभाचि सुदति। तूं या नळकूबर-मंदिरासी आलीस', 'सर्वस्व अर्पितों तुज, देवि! करीं पूर्ण काम, हो दारा' इत्यादी कीचकाची वचने त्याच्या आतुर व कामांध वृत्तीवर प्रकाश पाडतात. पुढे अपमानित द्रौपदी व हताश बनलेला भीम यांचाही संवाद असाच उल्लेखनीय आहे. दोघांच्याही मनोव्यथा सुंदर रीतीने मोरोपंत व्यक्त करताना दिसतात. द्रौपदी भीमाला म्हणते,

'आश्रय तुज काय हें महानस? हा!...मेला किंवा तुम्ही अहां सासु? मी काय? भली निद्रा सुखदात्री...निजला काय मृतापरि? जागे व्हा सिंहसे उठा, राहो निद्रा, कीर्ति वरा', यावर भीम खडबडून जागा होऊन म्हणतो, 'दयिते! कां आलीस? प्रमदे! हा आर्द्र कां पदर? ज्याये! भ्यालीस भीरु! भय कां?... झालें काय? वद सुदति! सुमुखी! सति! रडों नकोचि थांब, सये'

अशा प्रकारच्या संवादांनी आख्यान रंगते, चटकदार होते, सजीव बनते. वाचकांना वा श्रोत्यांना मानवी वाटते. प्रसंग, संभाषण समोर घडत आहे असाच त्यांना अनुभव येतो. या दृष्टीने भीम व सैरंध्री यांचा सर्व संवाद मोरोपंतांनी अतिशय स्वाभाविक व मार्मिकपणे रंगविला आहे. दुसऱ्या अध्यायात पांडवांच्या अज्ञातवासासंबंधीची चर्चा संवादात्मकच आहे. दुर्योधन, कर्ण, दुःशासन, द्रोण, भीष्म, कृप इत्यादींनी पांडवांसंबंधी केलेली चर्चा

प्रत्येकाचा स्वभाव दर्शविणारी आहे. सुशर्म्याच्या पराभवानंतर भीम व धर्मराज यांच्यातील संवाद याच अध्यायात पाहा. 'हा याचक, तूं देता काय जीवदानातें–हा याचक आहे. याला प्राणासहित सोड' हें धर्मराजच सांगू शकतो. तिसऱ्या अध्यायातील उत्तर–बृहन्नडा यांच्यांतील वेगवेगळे संवाद पाहाण्यासारखे आहेत. भित्रा उत्तर अर्जुनास गयावया करून म्हणत आहे,

'नको, गे! पायां पडतों बृहन्नडे! सोड' (३.७४)

त्यावर पार्थ म्हणतो, 'गा! राजसुता! योग्य तूं न कांपाला।

मृदुलत्व म्लानत्व स्वीकारूनि, जाहलासि कां पाला? (३.७७)

याच अध्यायात द्रोणाचार्य, कर्ण, दुर्योधन यांचेही संवाद थोडक्यात आले आहेत. चौथ्या अध्यायातील द्रोण–दुर्योधन यांच्यांतील संवादातून दोघांचेही वृत्तिविशेष प्रकट झाले आहे. द्रोणाच्या मनात पांडवांविषयी सहानुभूती आहे, आणि याचाच राग येऊन दुर्योधन म्हणाला, 'गुरुजीस काय पुसतां? ....यांनी फक्त धर्मशास्त्रच शिकवावे. (४.१३)....या द्रोणांना दुसऱ्यांचे हृदय-कमळ कटू शब्दांनी कसे भेदावे एवढेच समजते. केवळ त्यांनी चिलखत धारण केले म्हणून ते वीर. यज्ञाच्या वा भोजनाच्या प्रसंगीच त्यांना मान द्यावा. रणांगणावर त्यांना स्थान नाही.' (४.१५–१६) याच अध्यायातील अर्जुन–दुर्योधन, अर्जुन–कर्ण इत्यादी संवाद मोरोपंतांनी थोडक्यात पण सरस वठविले आहेत. पुढल्या पाचव्या अध्यायातील कर्ण व अर्जुन यांचाही संवाद एकमेकांची वर्मे काढणारा आहे. सहाव्या अध्यायातील अर्जुन व दुर्योधन यांचा संवादही लक्षणीय आहे. याच अध्यायात विराट व धर्मराजा यांचा द्यूतक्रीडाप्रसंग आहे. यावेळी विराट व धर्म यांच्यांतील संवाद पाहा.

'ऐकिलेंसि कंका! तें कुरु जिंकिलें कुमारें,
वय तरि अद्यापि उचित अंकातें' त्यावर धर्मराजा म्हणतो,
'हे कौरव किति? सूत बहन्नडा कुमारा ज्या।'
यावर विराट रागावून म्हणतो,
'रे! कंका! शंका सोडूनि बोलसी भलतें।
क्लीबासि मत्सुताधिक म्हणसी, हें वचन मन्मनीं सलतें' (६.८५)

याच संतापातून विराटाने कंकावर फासे फेकून त्याला जखमी केले. विराटपुत्र उत्तरास हे सहन झाले नाही. त्याने विचारले, 'ऐसा केला अन्याय हा महा कोणी ?' त्यावर भूप म्हणे, 'पुत्रा ! म्यां केला स्वकरें चि दंड या कंका ' कारण असे की 'हा करी प्रसंशा षंढाची नच धरी मनी शंका ' त्यावर उत्तराने म्हटले, 'अहाहा ! केला अन्याय हा, धरा पाय,' त्यानंतर विराटराजाही नरमून म्हणाला, 'बा कंका ! चुकलों, महायशा ! पावें ' (६.९९–१०२) येथून पुढचा उत्तर व विराटराजा यांच्यांतील संवाद कथानकाला गती देताना दिसतो. देवपुत्राच्या मदतीने विजय मिळाला, असे म्हणताच विराट म्हणतो, 'तद्दर्शन तुज घडलें, तें मलाचि कां नाहीं ?' (६.११६) त्यावर उत्तर म्हणतो, 'उद्यां कीं परवा भेटेल तो असें वाटे' (६.११९) अशा प्रकारच्या सहजसुलभ संवादांनी कथानक विस्तारते, पात्रांचे स्वभाव प्रगट होतात. सातव्या अध्यायात पुनः विराट राजा व धर्मराजा यांच्यांत खटका उडाला आहे. विराटाच्या आसनावर जाऊन बसणाऱ्या धर्मास विराट म्हणतो,

'सभासदा ! कंका ! भद्रासनीं बसाया आजि तुज कशी न वाटली शंका ? '

त्यावर मग अर्जुनाने सर्व खुलासा केला. तो म्हणाला,

'विराट राजा, इंद्राच्या अर्ध्या आसनावर बसण्याची याची योग्यता आहे. हा सम्राट पांडव आहे. '

'हा पांडव तर याचे चौघे बंधू कोठे आहेत ? द्रौपदी कोठे आहे ?' अर्जुनाने सर्वांची ओळख करून दिल्यानंतर विराटराजा वरमतो. आपल्या कन्येचा स्वीकार करावा म्हणून तो विनवणी करीत असताना धर्म, अर्जुन व विराटराजा यांचाही संवाद वाचण्यासारखा आहे.

2003
23352
निबंध
२८।७।२।७

# ७ | विराटपर्वातील रसाविष्कार

कोणत्याही काव्यात विशेषत: आख्यानक काव्यात रसपरिपोषाला विशेष महत्त्व असते. प्राचीन काव्यसमीक्षकांनी तर रस हा काव्याचा आत्माच मानला आहे. मानवी मनाच्या गाभाऱ्यातील शृंगार, वीर, करुण, हास्य, भयानक इत्यादी भावनांचा वा विकारांचा उद्रेक कथात्मक काव्यात रसपदपदवीला पोचतो. रसिक वाचकाच्या वा श्रोत्याच्या चित्तवृत्ती काव्यगत पात्रांच्या भावनाविकारांबरोबर उचंबळून येतात व त्याला एक प्रकारचा अलौकिक आनंद वाटतो. विराटपर्वात कीचकवध व गोग्रहणप्रसंग या दोन प्रसंगी वीररसाचे दर्शन मोरोपंतांनी यथार्थपणे घडविले आहे. इतर रसांना वा भावनांना या पर्वात फारसा अवसर नाही. भित्र्या उत्तराच्या उसन्या ऐटीमुळे थोडाफार विनोद निर्माण झाला असला तरी तो काही हास्यरसाच्या पदवीपर्यंत पोचत नाही. भीम-द्रौपदी अथवा भीम-कीचक यांच्या संभाषणांतून शृंगाराचा थोडाफार शिडकावा दिसतो, पण तोही आस्वाद्य होण्याइतका प्रभावी नाही. खरे पाहाता मोरोपंतांच्या खास आवडीचा वीररस मात्र या काव्यात उत्कटत्वाने जाणवतो. मोरोपंतांचा काळही या त्यांच्या आवडीस जबाबदार असावा. प्राचीन मराठी कवी समकालीन अशा राजकीय वा सामाजिक घटनांकडे फारसे लक्ष देत नाहीत असा एक आक्षेप वारंवार घेतला जातो. हा आक्षेप खरा असला तरी रामाची उपासना करणाऱ्या मोरोपंतांचे लक्ष देशकालपरिस्थितीकडे बिलकूल नव्हते असे नाही. त्यांच्या कवित्वाचे एक समीक्षक ल. रा. पांगारकर एके ठिकाणी म्हणतात,

'मोरोपंत आपला भारत ग्रंथ बारामतीस बसून लिहीत होते तेव्हा सारा महाराष्ट्र वीरपुरुषांच्या पराक्रमकथांनी दणाणून गेला होता. पानपतचा घनघोर संग्राम भारतीयुद्धासारखाच लोकोत्तर होऊन गेला. पेशवे, होळकर, शिंदे, विंचूरकर, पटवर्धन इत्यादी घराण्यांतून एकामागून एक वीर निर्माण

होत होते. भारतीयुद्ध होत असताना व्यास विदुलेची कथा कुंतीच्या तोंडात घालीत होते. इकडे महाराष्ट्रातही पानपतच्या युद्धप्रसंगाच्या सुमारास तीच विदुलेची कथा पंत मराठी भाषेत सांगत होते.' (मोरोपंत : चरित्र आणि काव्यविवेचन, पृष्ठ २७५) अशा पार्श्वभूमीवर मोरोपंत काहीशा अलिप्त भूमिकेवरून काव्यातून वीररसाचा परिपोष करीत होते. राम, रावण, हनुमान, दुर्योधन, कर्ण, द्रोणाचार्य, भीष्माचार्य, भीम, अर्जुन इत्यादी पात्रांच्या भोवती त्यांनी गुंफलेल्या कथा वीररसात्मकच असायच्या. मूर्तिमंत वीररस उभा करण्याची कला पंतांना अवगत होती. भक्ती, वत्सल, हास्य, शृंगार इत्यादी रसांची काही थोडी उदाहरणे पंतकाव्यात सापडतात, पण पंत रंगतात ते वीररसात. 'अत्युद्भुत रणरस हा नसता तरि रसिक सर्व कां भुलता ?' म्हणजे भक्तिरसादी रसपान करणारे सुद्धा या रणरसाला भुलतात, असे पंतांनीच म्हटले आहे. 'वीररसा बहु भुलले सेवित होते तदन्य सुरसा जे' (भीष्म. ९) अथवा 'ज्याच्या वीररसाहुनि रसिकांसी गमे रसांतर क्षुद्र' (हरिवंश ४८) असे उद्गार मोरोपंत वारंवार काढतात. पंतांनी हा रणरस प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिला नसेल परंतु त्यांचे प्रतिभाचक्षूच एवढे बलवान् की त्यांनी रणावरचा सर्व बारकावा व युद्धाचे सर्व डावपेच अवगत केले होते असे वाटते.

विराटपर्वाच्या पहिल्याच अध्यायात जीमूतवध व कीचकवध असे दोन मोठे उत्साहवर्धक प्रसंग आले आहेत. ब्रह्मोत्सवाच्या निमित्ताने विराट-नगरात निरनिराळ्या मल्लांचे बाहुयुद्ध होते. मल्लांचा मूर्तिमंत काळच असा जो जीमूत तो मोठ्या गर्वाने आखाड्यात उतरला. भीमाने त्याचे आव्हान स्वीकारले व तो दंड थोपटून आला. त्याच्या बाहुरूपी वज्राघाता-नेच जीमूत रडू लागला. मोरोपंत जीमूतवधाच्या प्रसंगी फार रमताना दिसत नाहीत. एकाच आर्येत या मल्लयुद्धाचा निर्णय करताना त्यांनी म्हटले आहे,

**फिरवुनि शतदां केला पिष्ट क्षितिवरि सलील आपटुनी ।**
**तें प्राशिलें नियुद्धामृत नयनमुखें करूनि आ पटुंनीं ॥ (१.३९)**

कीचकाच्या पराभवाच्या प्रसंगीही मोरोपंत प्रत्यक्ष हाणामारीपेक्षा राग, त्वेष, चीड, संताप, उत्साह इत्यादी विकारांच्या परिपोषावर अधिक जोर देताना दिसतात. मध्यरात्री द्रौपदी समजून तो दुष्ट कीचक मंचकावर बसून प्रेमाचे चाळे करू लागला. भीमानेही त्याला उपरोधाने काही उत्तरे दिली. बोलण्याच्या भरात असतानाच सामर्थ्याचा सागर असलेल्या भीमाने कीचकाचा गळा पकडून त्याला बुकलण्यास सुरुवात केली. भीम तोंडाने वाक्-प्रहार करीतच होता. शेवटी भीमाने कीचकास आपटून ठार मारले. तेव्हा विराटनगरात थरकाप झालाच, पण धरणीधर शेषाचा फणाही कंपायमान झाला. कीचकाच्या बंधूंनाही भीमाने अशाच प्रकारे ठार मारले. या दोनही प्रसंगी मोरोपंत फारसा विस्तार न करता संक्षेपानेच वीररसाचा आविष्कार करतात.

परंतु प्रत्यक्ष रणमैदानावर मात्र त्यांनी मूर्तिमंत रणरस उभा केला आहे. दुसऱ्या अध्यायात सुशर्मा गोग्रहण करण्याचा प्रयत्न करतो. काठीच्या प्रहाराने दुखावलेला सर्प जसा चवताळून हल्ला करतो तसा हल्ला करून सुशर्म्याने विराटाच्या गाईंचे हरण केले. विराटराजा व सुशर्मा यांच्या युद्धाचे फारसे वर्णन मोरोपंत करीत नाहीत. ' करिते जाले दारुण रण ते दोघेहि सिंहसम राजे ' (२.४४) एवढेच सांगून भीमाने सुशर्म्याला कसे पकडले याचा तपशील मात्र मोरोपंत देतात. खड्ग, तरवार, विविध आयुधे, तीक्ष्ण शर यांनी समृद्ध असलेल्या सुशर्म्याला केसाने धरून भीमाने धर्मराजापाशी आणले. सुशर्मा विरून गेला. कसा ? तर ' उदकीं केवळ विरे जसें डिखळ ' (२.५७) शंकरापुढे मदन जसा भस्म व्हावा, यज्ञात बळी जाणाऱ्या पशूची जशी अवस्था व्हावी, तशी सुशर्म्याची स्थिती झाल्याचे मोरोपंत सांगतात. (२.५९) तिसऱ्या अध्यायात दुर्योधनाने विराटनगरावर स्वारी केली असल्याने खऱ्या उत्साहास, शौर्यास प्रारंभ झाला आहे. साठ हजार गाईंना लुबाडण्यात आले. गवळ्याने तक्रार केली. विराटपुत्र उत्तर रणावर जाण्यास सिद्ध झाला तरी मनातून तो भ्यालाच होता. अर्जुन त्याचा सारथी झाला, आणि प्रत्यक्ष रणांगणावर उत्तराने कौरवसेना पाहिली. त्याचा धीर खचला. तो पळून जाऊ लागला. अर्जुन त्याच्यात

उत्साह निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. शेवटी उत्तराने सारथ्य करावे आणि अर्जुनाने युद्ध करावे असे ठरते. शमी वृक्षावरची शस्त्रे खाली येतात. प्रत्येकाच्या आयुधाचे वर्णन होते. भात्यांची, बाणांची, खड्गांची वर्णने होतात. येथून पुढल्या तीन अध्यायांत कुरुसैन्याच्या पराभवाचीच हकीगत असल्यामुळे व कौरववीरांबरोबर अर्जुनाचे युद्ध झालेले असल्यामुळे मोरोपंतांच्या लेखणीस स्फुरण चढलेले दिसते.

अर्जुनाच्या देवदत्त शंखाच्या आवाजानेच सर्वजण भयभीत झाले. प्रत्यक्ष शंकराचा प्रलयकाळच येणार असे सर्वांना वाटले. शंखाच्या आवाजाने कडाडणारी वीज देखील घाबरली. अर्जुनाच्या शंखवादनामुळे कौरवांकडील गजदळ भयभयीत होऊन गेले. या अर्जुनाला आता कोण जिंकणार ? असा प्रश्न कौरवसेनेत निर्माण झाला. कौरवसेनेने आपली रचना बदलली. मध्ये द्रोणाचार्य, पुढे कर्ण, दोन्ही बाजूंस अश्वत्थामा व कृपाचार्य, अशी रचना पाहून द्रोणाचार्यांना नमन करण्याच्या उद्देशाने अर्जुनाने प्रथम दोन बाण त्यांच्या पायांजवळ सोडले. या रचनेत मुख्य योद्धा दुर्योधन नाही हे हेरून अर्जुनाने त्याचाच पाठलाग करायचा असे ठरविले. दुर्योधनाला गाठून अर्जुनाने म्हटले, 'सोडा गोधन, नाहीं तरि वधिन तुम्हांसि '(४.८४) आपल्या बाणांच्या वर्षावाने अर्जुनाने कौरवांचे सैन्य झाकून टाकले. दुर्योधनाच्या ताब्यातील गाई याच वेळी समाधानाने चौफेर उधळल्या. तरी अर्जुनाने दुर्योधनावर चाल केली तेव्हा त्याच्या साहृयासाठी भीष्म व कर्ण हेही धाऊन आले. कर्णावरही अर्जुन बाणांचा वर्षाव करू लागला. कर्णाच्या मोठ्या बाणांचा अर्जुनाने चुरा करून टाकला. या कर्ण व अर्जुन यांच्या युद्धाचे आणखी किती वर्णन करावे ? ' तें किति वर्णावें म्यां ? ' (४.९७) यानंतर कर्ण पळून गेला. अशीच युद्धे अर्जुनाने कृपाशी, द्रोणाशी, दुर्योधनाशी केली असल्याची वर्णने मोरोपंत पाचव्या अध्यायात करतात. अर्जुनाच्या शरसंधानापुढे द्रोणाचार्यही पराभूत झाले. यानंतर द्रोणपुत्र अश्वत्थामा व अर्जुन यांचे युद्ध झाले आहे. या दोघांच्या युद्धप्रसंगी फार मोठे योद्धे मृत्यूमुखी पडले. देवदानवांनी व घोडे, हत्ती, मनुष्य यांनी याप्रसंगी 'हाय हाय !' असे उद्गार काढले. एकदा तर अश्वत्थाम्याच्या बाणाने अर्जुनाच्या धनुष्याची

दोरी तुटली. परंतु क्षणात अर्जुनाने आपल्या धनुष्यास दुसरी दोरी लाविली व 'दारुण हा क्षात्रधर्म न भला' असे देवादिकांना म्हणावयास लावले. (५.३५)

अशा निकराच्या प्रसंगी अश्वत्थाम्याच्या भात्यातले बाण संपले. याचवेळी कर्ण अर्जुनावर धावून आला. कर्ण व अर्जुन यांचे मोठया निकराचे युद्ध चालू झाले. दोघांनीही एकमेकांची उणीदुणी काढली. अर्जुनाच्या एका बाणाने कर्णाचा उरोभंग झाला. सूर्यास्ताच्या समयास कर्ण हतबल झाला. अर्जुनाने भीष्मांचाही पराभव केला. सिंहाप्रमाणे पराक्रम असणाऱ्या अर्जुनाच्या बाणांनी गजाप्रमाणे उन्मत्त झालेल्या कौरवसेनेस लोळवून टाकले. रणांगणावर रक्ताच्या नद्या वाहू लागल्या. कर्ण, कृप, द्रोण या तिघांनी मिळून पुनः अर्जुनावर हल्ला केला. परंतु अर्जुनाच्या ठिकाणी यावेळी महापर्वताचे धैर्य एकवटलेले होते. भीष्म व अर्जुन यांचे शरयुद्ध मोरोपंतांनी मोठ्या तन्मयतेने वर्णन केले आहे. दोघांचे युद्ध पाहून देवांनी आकाशातून पुष्पवृष्टी केली. अर्जुनाच्या तीक्ष्ण बाणांनी भीष्माचार्यांना जेव्हा मूर्च्छा आली तेव्हा सर्वांनी 'हाय हाय, शिव शिव, राम राम' असे उद्गार काढले (५.९१) शेवटच्या सहाव्या अध्यायात मोरोपंत अर्जुन-दुर्योधन या जोडीच्या युद्धाचे प्रत्यकारी वर्णन करून वीररसाचा नमुना उभा करतात. हत्ती जसा वेलीत वेढला जातो तसा दुर्योधन अर्जुनाच्या बाणांनी वेढला गेला. (६.४) दुर्योधन पराभूत होऊन परतत असताना अर्जुनाने त्याला पुनः युद्धास प्रवृत्त केले. अर्जुनाच्या छद्मी बोलण्याने दुर्योधन चवताळून उठला व अर्जुनावर धावून गेला. त्याच्या मदतीस अश्वत्थामा, कृप व द्रोणाचार्य होतेच. अर्जुनाने मोठ्या चापल्याने सर्वांच्या बाणांचे निवारण केले. आणि आपल्या संमोहनास्त्राने सर्वांना मूर्च्छित केले. उत्तराकडून अर्जुनाने भीष्माखेरीज सर्वांची वस्त्रे काढून घेतली. दुर्योधनाचा मुकुट त्याने धुळीस मिळविला. अर्जुनाने विजयाच्या भरात देवदत्त शंख वाजविला तेव्हा त्या ध्वनीने रणांगणावरील घोडे भयभीत होऊन गेले. असंख्य वीरांचा संहार झाल्यानंतर उत्तर व अर्जुन विजयाच्या उत्साहात विराटनगराकडे निघाले. अशा रीतीने युद्धापूर्वीचा उत्साह व प्रत्यक्ष रणावरील युद्ध यांच्या वर्णनातून मोरोपंत मूर्तिमंत वीररस निर्माण करतात.

विराटपर्वात प्राधान्य आहे ते मुख्यतः वीररसाला. वीर व शृंगार वृत्तीच्या बरोबर कोठे कोठे कारुण्याची छटाही दिसते. सम्राटपद शोभविणरे पांडव विराटाच्या दरबारात दास म्हणून राहातात आणि तेही पुनः गुप्त नावांनी व वेषांनी, हाच मुळी मोठा कारुण्यपूर्ण प्रसंग आहे. आपल्या पतींना क्षुद्र कामे करावी लागतात म्हणून हळहळणाऱ्या द्रौपदीचे करुणापूर्ण चित्र मोरोपंत थोडक्यात रंगवितात. आपला पती भीम राजस्त्रियांच्या करमणुकी-साठी हिंस्र पशूंशी झुंज खेळतो आहे असे पाहून द्रौपदी उद्गारते 'सख्या! हरि! देसि न मज तूं उदार कां मरण?' (१·४१) कीचकाने द्रौपदीची विटंबना केली. तिच्या केसांना हात घालणारा आणखी एक अधम निघाला. आपली अपमानाची व्यथा द्रौपदीने भीतभीत भीमाजवळ करुणापूर्ण वाणीने सांगितली. राग, त्वेष, चीड, इत्यादी भावना तिच्या मनात होत्या, पण परदास्यात असलेली ही सम्राज्ञी या प्रसंगी कारुण्याने पूर्ण न्हाऊन निघालेली दिसते. कीचकाचा वध झाला तरी द्रौपदीवरील संकट संपले नाही. कीचकाच्या शवाबरोबरच तिला जाळण्यासाठी तिचीही यात्रा निघाली! 'स्वर्गी दोघे करूत सुरतातें' (१·१५६) म्हणून कीचकबंधूंनी तिलाच कीचकाच्या तिरडीवर बांधले! आणखी करुणाजनक असे दृश्य या महाराज्ञी-च्या बाबतीत कोणते असणार? पुनः संरक्षणासाठी गंधर्वपतींचा ती धावा करते. भीमाने जेव्हा अनुकीचकांनाही ठार केले तेव्हा द्रौपदीचे संकट संपले. द्रौपदीकडे वाकडया नजरेने पाहण्याचे सामर्थ्य आता कोणात उरले नव्हते. द्रौपदीचा पहिल्या अध्यायातील करुणापूर्ण शोक मोरोपंतानी संक्षेपाने पण उत्कटतेने वर्णन केलेला आहे.

# ८ | पंतांचे कल्पनावैभव - अलंकार

मोरोपंतांच्या आख्यानकवितेमधील सर्व कथा प्रामुख्याने रामायण, महाभारत, भागवत इत्यादींच्या आधाराने असल्याने स्वतंत्र कथानिर्मितीस लागणारी कल्पनाशक्ती मोरोपंतांच्या काव्यात शोधणे बरोबर होणार नाही. अनेक थोर महाकवींची काव्ये खऱ्या अर्थाने स्वतंत्र नसतात. कोठला ना कोठला तरी आधार त्यांच्या कल्पनाशक्तीस लागतोच. कोठल्या तरी अस्पष्ट अशा आधाराने कवी हाती आलेल्या कथावस्तूची नवनिर्मिती करीत असतो. कथेची पुनः मांडणी करताना ती कथा आधारित असली तर अर्थातच कवीच्या कल्पकतेस मर्यादा पडतात. कथेचा संक्षेप केव्हा व कसा करावयाचा, चर्चा कोणती गाळावयाची, पात्रांच्या तोंडी भाषा कोणती वापरावयाची, कथानिवेदनास वृत्त, भाषा, अलंकार इत्यादींचे साह्य कोणत्या प्रकारे घ्यायचे, रसपारिपोषाच्या बाबतीत कोणते धोरण ठेवावयाचे; इत्यादी बाबतींत कवीची कल्पनाशक्ती मदत करीत असते. नवे नवे उन्मेष म्हणजे सौंदर्यस्थाने मुळात असलेली किती ठेवावयाची व नव्याने किती निर्माण करावयाची, हे त्या कवीच्या प्रतिभाशक्तीवर अवलंबून असते. अपूर्व वस्तूची निर्मिती करणे आणि नव्या नव्या सौंदर्यस्थानांचा शोध घेणे हे थोर कवीचे काम असले तरी मोरोपंतांसारख्या आख्यानक वा पंडित कवीच्या बाबतीत मात्र या कार्याचे स्वरूप तसे मर्यादित अर्थानेच पाहाणे अगत्याचे असते.

मोरोपंतांनी मूळ कथावस्तूचा संक्षेप कसा केला हे आपण मागे विस्ताराने पाहिले आहे. आता मोरोपंतांच्या महाभारतातील, विशेषतः विराटपर्वातील कल्पनावैभवाचे थोडक्यात विवेचन करू. व्यक्तिचित्रण, भावनांचा परिपोष, कथानकाची गतिमानता इत्यादीसाठी मोरोपंत रम्य अशा कल्पनांचे साह्य घेताना दिसतात. अशा रम्य कल्पनांवर आधारलेल्या

विपुल अशा अलंकारांचा निर्देश करण्यापूर्वी पंतकृत रचनेचे स्वरूप आणखी थोड्या बारकाईने पाहाण्यासारखे आहे. मंत्रभागवत, मंत्ररामायण इत्यादींचा मागे निर्देश झाला आहेच. त्या काव्यांतून पंतांनी आपल्या कल्पनेच्या बळावर निरनिराळ्या मंत्रांची योजना केली असल्याचे आपण पाहिले आहे. मंत्रांची योजना म्हणजे मंत्राची पहिली, दुसरी, तिसरी अक्षरे ध्यानात ठेवून सर्व आर्यांची रचना करणे हे ओघाने आलेच. यात थोडी कृत्रिमता आलीच, पण अशा मंत्रमय रचनेस स्थूल अशा का होईना कल्पनाशक्तीचे साह्य लागतेच. पंतांच्या आर्याभारताचेच उदाहरण घेऊ. भारत पर्वे अठरा.पंतांनी अठरा अक्षरांचा एक मंत्र तयार केला. 'श्रीपांडवसहायो भगवानरविंदाक्षो जयति ' हा तो मंत्र. प्रत्येक पर्वाचे पहिले अक्षर वरील मंत्रातील असल्याने चौथ्या विराटपर्वाची सुरुवात पंतांनी ' वत्सल ताताधिक ' अशाच शब्दांनी करणे स्वाभाविक होते. पंतांची ही मंत्रनिष्ठता थोडी कृत्रिम वाटली तरी तीत त्यांच्या स्थूल कल्पनाशक्तीचे वा बुद्धिचातुर्याचे दर्शन होण्यासारखे आहे.

आपल्या काव्यात मार्मिकता यावी, रसिक वाचकास वा श्रोत्यास आल्हाद वाटावा म्हणून पंतांनी विविध प्रकारच्या अलंकारांची योजना केलेली आहे. काव्याची शोभा वाढविणारे गुणधर्म म्हणजे अलंकार असे स्थूलमानाने म्हटले तरी अलंकारांच्या मुळाशी असलेला साम्यविरोध हे कल्पनाशक्तीने जाणावयाचे असतात. उपमा, उत्प्रेक्षा कवीस सुचतात त्या त्याच्या उज्ज्वल कल्पनाशक्तीने. मोरोपंतांचे हे कल्पनावैभव विराटपर्वातही प्रत्ययास येते. या कल्पनाशक्तीचा अगदी स्थूल व कृत्रिम वाटणारा भाग म्हणजे शाब्दिक रचनाचमत्कृतीचा होय. ही शाब्दिक कसरत मोरोपंत अनेकदा करीत असले तरी अनेकदा तीमधील सहजता म्हणून आल्हादकारकता प्रत्ययास येते. **यमक व अनुप्रास** हे शब्दालंकाराचे दोन प्रमुख प्रकार आहेत. भिन्न अर्थाने तीच अक्षरे चरणांच्या शेवटी आली असता यमक होते. मोरोपंती काव्याचे यमक हे एक खास वैशिष्टच म्हणून सांगता येईल. आदियमक, मध्ययमक, अश्वधाटी यमक, असे प्रकार त्यांच्या आर्याभारतात सापडतात. दामयमक, पुष्पयमक, अंत्ययमक अशीही उदाहरणे

विपुल आहेत. विराटपर्वात मोरोपंत प्रामुख्याने चारचार, पाचपाच अक्षरांची अंत्ययमके सहजपणे जुळविताना दिसतात. ‘अग्निहोत्रास–अग्नि हो त्रास, धाडून–झाडून, होय शमी– हो ! यश मी, लहानसा माजी–महानसामाजीं, बल्लवाला हो–पल्लवा ! लाहो !, ईश्वरीस नवसावे–सुंदरीस न वसावें ?, असो, नमन– असोन मन, विवेक मळा–शिवे कमळा, हात लाविल या–मातला विलया, जाणता राया–जाण ताराया, चोरसखा–गोरस खा, चिराटन-गरांत–विराटनगरांत, भीम रणा–भी मरणा, मल्ल तो चिरडे–गल्ल, तोचि रडे, सदार विश्वास–सदा रविश्वास, सुराम ती–सुरा मती, काम हो दारा–कां महोदारा ?, भीम निजे–भी मनि जे, कीचका, मातें–नीच कामातें, पौरवा घाला–पौर वाघाला, नीरदन दीन–नीरद नदीन, प्रकटला हो–प्रकट लाहो; अशी शेकडो अंत्ययमके मोरोपंत अर्थहानी होऊ न देता सहजासहजी साधताना दिसतात. एखादे दहा अक्षरांचेही यमक साधून जातात. उदा०–

**शोभा सोडुनि होता शुद्ध वसंतीं करीरसा पार्थ ।**
**मग मंत्रातें व्हाया उद्धव संतीं करी रसापार्थ ।। ( ६।१२३ )**

अशी शब्दरचना वा यामकनिर्मिती साधताना कित्येक वेळा पंत कृत्रिमता, ग्राम्यता, जटिलता, अर्थाची ओढाताण इत्यादी दोषही पत्करतात. अशा वेळी पंतांना काळ जीमूत–काळ जी मूत, दया लुगडया–दयाळु गडया, तरि काय गा ! ढवा लाहे–नरकाय गाढवा लागे, हे बृहन्नडे राहो–कदर्युचा न डेरा हो, अन्यथा न करीं–अन्य थान करी. अशी शब्दांची कसरत करावी लागते. पंत हे भाषाप्रभू असले तरी आणि अनेक सुंदर व अर्थगर्भ यमकांचे निर्माते असले तरी अशी कृत्रिमता विरस करते, ‘गाजत वाजत, साजत, आज तया जतन करुनि आणा हो,’ (६·७५) या अश्वधाटी यमकात अनु-प्रासाचीही छटा दिसते. पंतांच्या यमकाच्या हव्यासाचे एक परमावधीचेही उदाहरण दिले जाते. खालील आर्येत ओळीतील सर्वच अक्षरे भिन्नार्थानि समान आली आहेत.

**अनळसमीहित साधी राया ! वीरा महीवरा ! कामा !**
**अनळस मी हि तसा धीरा ! यावा रामही वर कामा !!**

अशा यमकांचा अर्थ लावण्यातही त्या काळी लोकांना उत्साह व आनंद वाटत असावा. शब्दचमत्कृतीचा आणखी एक प्रकार म्हणजे **अनुप्रासाचा**. चरणात तेच ते अक्षर भिन्नार्थाने येत राहिले की अनुप्रास होतो व कानांना सुख होते. त्याच त्या वर्णाची आवृत्ती झाली की म्हणताना एक प्रकारची नादमधुरता अनुभवास येऊन ऐकणारास व म्हणणारास आनंद वाटतो. विराटपर्वातील अनुप्रासांची काही उदाहरण पाहा–

१) **हांसे तो भटतल्लज, भल्लज पीडा न तल्ललाटांत**; (६·३)

२) **करि कृष्णसख कुपतिची कुदशा केवळ, तथापि कुरुसेना** (६.४८)

३) **ऐसा बहुतचि बोले, तो बालिश बोल बायकांमाजी ॥** (३·११)

४) **स्वपर बळाबळ नेणुनि बालिश बहु बायकांत बडबडला ॥** (३·३९)

५) **मागें सरसिल, तरसिल, मरसिल, जरि मज बळेंचि शिवशील ॥** (१·५०)

शब्दचमत्कृतीचा आणखी एक प्रकार म्हणजे **श्लेषाचा** होय. एकाच शब्दाचा दुहेरी अर्थ प्रतीत झाला की मनास एक प्रकारचा वेगळा आनंद वाटतो. वरील दुसऱ्या ओळीत 'कुपति' म्हणजे वाईट पती व पृथ्वीपती असे दोन अर्थ प्रतीत होतात. आणखी एका ओळीत 'आर्यांत' म्हणजे सज्जन लोकात व आर्या वृत्तात असे दोन अर्थ होतात.

**कीचक नीच कलुषनिधि, त्याची आर्यांत गोष्टि न वदावी,** (१.४५)

आणखी एके ठिकाणी भ्रमर व मद्यपी या दोन अर्थांनी पंत मधुप हा शब्द वापरताना दिसतात.

**कीं मधुचुंबिता त्या पतिता त्यांच्या पडो नये दृष्टि।** (५.८५)

पंतांची ही शब्दांची कसरत आज आपणांस निरर्थक व कृत्रिम वाटत असली तरी त्यांच्या काव्याचा एक सर्वोत्तम विशेष म्हणून तो त्या काळीच मान्यतेस पावला होता. 'व्याकरण बिघडू न देता किंवा अर्थाची हानी न होता लांब लांब यमके साधण्याची व प्रासांची साखळीच्या साखळी जुळविण्याची जी या कवीची अपूर्व करामत दृष्टीस पडते, ती समयविशेषी अर्थ खुलविण्यास

किंवा निदान नुसता मनास चमत्कार वाटविण्यास फार उपयोगी पडते ' हा मालाकार चिपळूणकरांचा अभिप्राय अतिशय बोलका आहे. विविधज्ञानविस्तारातील लेखात रामभाऊ गुंजीकरही म्हणतात, ' यमकांकरिता किंवा प्रासानुप्रासांकरिता अर्थाची हानी न होईल अशी यमकरचना, प्रासरचना मोरोपंतांनी मात्र आपल्या ग्रंथात साधली आहे. पंतांनी या शब्दालंकारांनी आपल्या सुतेस कोशागारातील भरगच्ची लांबरुंद पातळे नेसविली आहेत. '

शब्दचमत्कृतीपेक्षा अर्थचमत्कृतीवर आधारलेले अलंकार विशेष रमणीय असतात. ही अर्थचमत्कृती विशेषतः साम्यावर व विरोधावर आधारलेली असते. उपमा, उत्प्रेक्षा, दृष्टान्त, रूपक इत्यादी अर्थालंकार साम्यावर आधारलेले असतात. वर्ण्य वस्तूची बरोबर कल्पना यावी म्हणून कवी उपमेयाशी तुलना करण्यासाठी कोणते उपमान शोधतो, यावर वाचकास होणारा संतोष अवलंबून असतो. हे उपमान जितके समर्पक, मार्मिक व अर्थवाही तितक्या प्रमाणात अधिक संतोष वाचकास होतो. त्याला प्रतिपाद्य मुद्यांचा अर्थ अधिक समजतोच, पण तुलनेमुळे मनास विशेष प्रकारचा आल्हाद होतो. मोरोपंतांचा भर सादृश्यमूलक अशा उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, दृष्टान्त इत्यादी अलंकारांवर विशेष आहे. उपमा व दृष्टान्त देण्यात मोरोपंत अवर्णनीय कल्पनाशक्ती दाखवितात. खल कीचक सैरंध्रीला कसा गाठतो ? तर ' जेंवि पतंग दीपकळिकेला ' (१.११६) कीचकाला खोटा संकेत करताना द्रौपदीच्या अंगास कंप कसा सुटला ? तर ' परि कांपली सतीची तनु, जैसी मंदमारुतें कदली ' (१.११९) कीचक कसा कोसळला ? तर पंत म्हणतात, ' कर आसुडितांचि पडे धडधड वात्याजवे जसा विटपी ' (१,६५) ,राणीवशात जाऊन द्रौपदी कशी रडू लागली ? तर ' फोडी जैसी व्याघ्रविमुक्त कुळभ्रष्ट धेनु हंबरडे' (१.७९) केसाने धरून भीमाने सुशर्म्यास धर्मापाशी आणले तेव्हा त्याची कशी अवस्था झाली ? तर 'झाला सुमृदु विराला उदकीं केवळ विरे जसें डिखळ '(२.५७) अशा शेकडो **उपमा** पंतांनी विराटपर्वातही वापरलेल्या दिसतात.

उपमेप्रमाणेच **उत्प्रेक्षाही** साम्यावर आधारलेली असते. उत्प्रेक्षेमुळे कवीच्या कल्पकतेची चमक ध्यानात येऊन रसाचा परिपोष चांगला होतो.

सैरंध्री ही इतके दिवस वाड्यात असूनही आपणांस पूर्वी कशी दिसली नाही ? याचे नवल वाटून कीचक म्हणतो, या वस्तूचा लाभ म्हणजे जणू काय जन्मापासून दरिद्री आहे त्याला पुष्कळ सुवर्णाची प्राप्ती झाली आहे (१·४४) सूर्याने पाठविलेल्या दूताने कीचकास कसे दूर उडवून दिले ? तर जणु गरुड पक्षी माजलेल्या कालसर्पास भिरकावून देतो त्याप्रमाणे (१·६०) द्रौपदीमुळे नृत्यशाळेत काळोख कसा पसरला होता; तर ' जाणों सुयशोर्थ तमोगुण धाडी तेथे अंधकाराती ' (१·१२४) भीमाला यश मिळावे म्हणून शंकराने जणुकाय तमोगुणच नृत्यशाळेत पाठविला होता. अशा अनेक उत्प्रेक्षा मोरोपंतांच्या काव्याची शोभा वाढवताना दिसतात. अशा प्रकारे रूपक, दृष्टान्त, व्यतिरेक इत्यादी अलंकारांची उदाहरणे या विराटपर्वात भरपूर दिसतील. **दृष्टान्त** तर मोरोपंत इतका समर्पक व हृद्य देतात की, वर्ण्य विषय मनात ठसतोच, पण त्यामुळे पंतांच्या निरूपणास शोभा येते. सुदेष्णा राणीच्या मनातील विकल्प दूर करताना सैरंध्री म्हणते ' बाई स्वप्नातही माझ्या मनात विवेकमळ स्पर्श करणार नाही. ' गगन-मणिकरींच्या तम केव्हा तरि काय हो ! शिवे कमळा?- सूर्याच्या हातातील कमळाला अंधार कधी तरी स्पर्श करील काय ? (१.१६) भीमाने उपकीचकांची दशा कशी करून सोडली ? ' पक्षिपतिपुढें ठाकावें काय काद्रवेयशतें ?' (१·१६५) गरुडापुढे सर्पाची पिले कशी टिकाव धरणार ? असे अनेक अर्थालंकार विराटपर्वात मोरोपंतानी योजिले आहेत. त्यांचे संक्षेपाने दर्शन असे–

**प्रतिवस्तूपमा–** १–१४, १–१६, १–१६०, २–५४ ३–९
**व्यतिरेक–** १–१४२, १–५३, २–३०, २–३२, २–३६, २–५१,
**निदर्शना–** १–५३, ४–३३.
**अप्रस्तुतप्रशंसा–** १–१११, २–७५, ४–४
**परिसंख्या–** १–१८१, ५–४६

अर्थालंकारांत विशेष महत्त्वाचा अलंकार म्हणजे **अर्थान्तरन्यास** हा होय. या अलंकारात मनोहर असे एखादे सुभाषित सार्वकालिक सत्य सांगून जाते. अशा सुभाषितांमुळे काव्याची शोभा तर वाढतेच, पण वर्ण्यविषयातील

सत्य मनावर चटकन बिंबते. विराटपर्वात अशी सुभाषिते वा अर्थान्तरन्यासाची अनेक उदाहरणे आहेत. त्यांतील महत्त्वाची अशी–

१) **फारचि बरी निरयगति परवशता शतगुणें करी जाच (१·५६)**
२) **न करील कां पित्याची दुर्गतिची मावली सुरा माती ? (१·५९)**
३) **भीतां द्वंद्वांसि कसे हरिजन भवसिंधुनायका तरते ? (१·१७१)**
४) **देतो सकुटुंबा ही पापरता नरकपात कीनाश (२·२)**
५) **व्यसनीं जरि गडबडते साधु, तरि तयांसि सुज्ञ कां गाते ? (२·१४)**
६) **जोंवरि नसे कवळिला, तोंवरि मंडूक वापितो भुजगा (२.६१)**
७) **सच्चरित अप्रगल्भ हि हृदयहर जसें स्वधीनतोकवच (३.३०)**
८) **टाकिती न बाह्यरंगें फळ नीरस म्हणुनि निपुण पणसाचें (३.४९)**
९) **सिंधूंत तरेल कसी जी केली केलिहेतु नाव सरीं ? (४.१६)**
१०) **अरिच्याहि सद्‌गुणानें प्रेमें वाखाणितात सुज्ञानी (४.४६)**
११) **जन कासया विते सुत, कसिते न करावया भजन कास ? (५.२२)**
१२) **बहु कर्म करी पंडित, कथनावसरीं हि थोडकेंच वदे. (५.४७)**
१३) **अनृतहि हित, साधूच्या रक्षी प्रेमा, तसेंचि हेमा जें (६.५४)**
१४) **'न वय प्रमाण तेजस्विजनीं' म्हणती कवी न तें लटकें (६.७१)**
१५) **मिळतां सुवर्णमुद्रा अर्थी इच्छील काय होनातें ? (७.२७)**

अशा रीतीने पंतांच्या प्रतिभेस कल्पकतेची जोड असून ती विविध अलंकारांनी नटलेली आहे. गरुड, सिंह, हत्तीण, कोल्हा, गाढव, घोडे, हत्ती, वानर, भ्रमर, सर्प, कावळा, उंदीर, हंसी, पंचानन इत्यादी प्राणिसृष्टी पंतांच्या उपमानाच्या कल्पनासृष्टीत सामावलेली दिसेल. भोपळा, हरभरा, तोंडले, मांडे, तुती, मध, अमृत, कानवले, खीर इत्यादी खाद्य–पेय पदार्थांचेही निर्देश त्यांच्या उपमानसृष्टीत येतात. वृक्ष, दीप, पर्वत, पृथ्वी, नदी, पर्णकुटी, मेरुपर्वत, बाण, रथ, कमलपुष्प, शंख, वावटळ, समुद्र, परीस, माणके, सुवर्ण, धोत्र्याचे फूल अशी प्रतिमानसृष्टी मोरोपंतांच्या काव्यात वावरताना दिसते. पंतांच्या कल्पकतेची झेप त्यांच्या उपमानांच्या विविधतेमुळे पटण्यासारखी आहे. ज्ञानेश्वरांच्या खालोखाल उपमा दृष्टान्तांचे हे वैभव

मोरोपंतांच्या काव्यात दिसून येते. इंदूरच्या बाळकृष्ण मल्हार हंसांनी यथार्थपणे म्हटले आहे की, ' कवितेचा आत्मा जो रस तो ज्या मायेच्या आश्रयाने राहातो ती चमत्कारिक कल्पनाही मोरोपंतांच्या काव्यात सर्वत्र भरलेली आहे. कोणत्याही विषयाचे वर्णन करताना प्रत्येक गोष्टीचे स्वरूप दृष्टान्तादी अलंकारांनी उत्कर्षेकरून दाखविण्याचा प्रत्येक पद्यात मोरोपंतांनी यत्न केलेला आढळतो. त्यांच्या बहुत करून सर्व आर्यांची उत्तरार्धे अलंकारमय किंवा चमत्कारिक कल्पनामय असतात. कितीएक ठिकाणी त्यांच्या कल्पना इतक्या उज्ज्वल व उदात्त आढळतात की, त्या कामात ते नामांकित संस्कृत कवींशी स्पर्धा करीत आहेत की काय असा भास होतो '.

# ९ | पंतांचे भाषाविशेष

मोरोपंतांच्या भाषाविशेषांकडे अथवा भाषाशैलीकडे लक्ष देण्यापूर्वी त्यांच्या काळाचा संदर्भ ध्यानात घेणे अगत्याचे आहे. त्यांचा काळ म्हणजे ऐन पेशवाईचा, मराठी साम्राज्याचा दरारा संपत आला तरी प्रभाव मात्र टिकून होता. स्वराज्यकाळातील स्वास्थ्य वरिष्ठ वर्गाला तरी भरपूर लाभले होते. ख्यालीखुषाली, चैनवाजी, विलासप्रियता, रंगेलपणा इत्यादींचे दर्शन पेशवाईच्या अखेरीस शाहिरी काव्यातून होण्यासारखे आहे. मराठी कविताही स्वाभाविकपणे विलासाकडे, पांडित्याकडे, विद्वत्तेकडे झुकल्यास नवल नाही. वरिष्ठ अशा ब्राह्मणी राज्याची सत्ता विकसित झाल्यानंतर पौराणिक अशा धर्माची व परंपरेची चलती झाली असल्यास नवल नाही. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास यांच्या तोडीचा एकही संत पुढील दोन शतकांत दिसला नाही तरी वामनपंडित, मोरोपंत यांची लोकप्रियता विशिष्ट वर्गापुरती का होईना, पण कमी नव्हती. रघुनाथपंडित, विठ्ठल, नागेश, सामराज इत्यादींचे श्लोक कीर्तनप्रसंगी म्हटले जात. वारकरी कीर्तनापेक्षा हरिदासी कीर्तनाची प्रथा वाढली. वेदान्तचर्चा, आत्मनिरूपण आणि त्याला अनुसरून सुरस कथा अथवा आख्यान लोकांना पसंत पडू लागले. श्रोते आणि वाचकही विशिष्ट वर्गातील असल्यामुळे त्यांच्या रुचिनुसार काव्यरचना होऊ लागली. याच वृत्तीमधून संस्कृत वृत्ते, संस्कृत अलंकार, संस्कृत शब्दरचना इत्यादींची चलती झाली. श्रीधर व महीपती यांचा अपवाद सोडला तर या काळची बहुतेक सर्व कविता संस्कृतच्या छायेखाली वाढली, पोसली गेली.

याच पार्श्वभूमीवर पंतांच्या काव्याकडे व भाषाविशेषांकडे पाहावे. पंतांची भाषा आज अनेक ठिकाणी दुर्बोध वाटते, क्लिष्ट वाटते, समासप्रचुर वाटते, या बाबीचा काळाच्या संदर्भात विचार व्हावा. संस्कृत विद्येचा

व्यासंग वाढल्यामुळे श्रोते व वाचक यांना पंतांची भाषा त्या काळी दुर्बोध वाटत नसावी. पंत चांगले व्युत्पन्न होते. पाध्येबंधूंच्याजवळ त्यांनी धर्मशास्त्र, पुराणे, वेदान्त, व्याकरण इत्यादींचा अभ्यास केला होता. स्वतः पंतांनी संस्कृतमध्येही रचना केलेली आढळते. पंतांच्या विद्याव्यासंगाचा भरपूर पुरावा ल. रा. पांगारकर यांनी आपल्या मोरोपंतचरित्रात दिला आहेच, पण पंतांच्या काव्यरचनेच्या व भाषाविशेषांच्या परिचयावरूनही त्याची प्रचीती येते. विराटपर्वातिही त्यांनी दिलेले कथासंदर्भ या दृष्टीने पाहाण्यासारखे आहेत. उर्वशीशापकथा, जनमेजय-आस्तिकथा, हिरण्यकशिपूवध, अहल्या, शंकर-मदनकथा, खांडवनदहन, कार्तिकस्वामी, पूतनावध, परशुराम-भीष्मयुद्ध, शिखंडी, बाणासुरयुद्ध, पाशुपत अस्त्रकथा इत्यादी कथांच्या वा प्रसंगांच्या संदर्भावरून पंतांची व्युत्पन्नता पटतेच, परंतु त्यांची भाषासरणी अधिक बोलकी आहे. ती प्रौढ, भारदस्त, व्याकरणशुद्ध व समासप्रचुर आहे. समासप्राचुर्य हे पंतांच्या संस्कृतनिष्ठतेचे द्योतक आहे.

मोरोपंतांची समासरचना किती दीर्घ असावी ? अक्षकेलिदक्ष, निजवस्त्र-रत्नधनदाने, सुकृतजयदयादि, वस्त्रान्नराशिहुनि, शरभधृतमृगेश्वरमुक्तिभ, प्रविकासोन्मुखाब्जसर, खलबलदलनदक्षबल; अशी समासरचना आज थोडी अवघड वाटते. विशिष्ट वर्गालाच तिचा उलगडा होईल. अशा समासरचनाप्रधान काव्यातून प्रसाद हा गुण लोप पावतो हेही खरे आहे. समासरचनेचा हा हव्यास पंतांनी किती पराकोटीला नेला होता हे विराटपर्वातिही दिसून येते.' दशमुखमुखमळजळनिधिखळपतिपंक्तीत' (१·४८) अथवा 'सुरदत्तधनुर्गुणरथनेमिध्वजवासिभूतनादांनीं' (४·८६) अशा रचनांनी वाचक त्रस्त होतील याची चिंता मोरोपंत करीत नाहीत. बौद्धिक करामतीच्या या हव्यासापायी काव्याची हानी होते हेही मोरोपंतांच्या ध्यानी नसावे. अशी समासरचना ही त्या काळाची मागणी असली तरी पंतांनी आपले बौद्धिक सामर्थ्यही पणास लावलेले दिसते. काव्यनिर्मितीच्या वेळी पंत सोपे संस्कृत वापरतातच, पण काही दुर्बोध व प्रचारात नसलेले शब्दही वापरण्याची करामत त्यांनी केली आहे. यमक, अनुप्रास यांसाठी अशा अपरिचित संस्कृत शब्दांची योजना पंतांनी केली असावी. विराट-

पर्वातील असे काही अपरिचित संस्कृत शब्द पाहा. अभ्रमु (हत्तीण)–६·६५, करज (नख) १.१०९, नभोग (सूर्य) १·११३, पळवे (पाचोळा)–१·१६७, नार्कर्षि (नारद)–३·७६, निःस्व (दरिद्री)–४·६, अनपार्थ (सफळ)–४·२३, नदीन (समुद्र)–२·३१, आज्यजिर (रणांगण)–३·३६, महोपल (मोठा दगड)–३·५७, पृतना (सेना)–३·६८ अशा अनेक शब्दांच्या अर्थासाठी संस्कृत शब्दकोश धुंडाळावा लागेल. अर्थनिश्चितीकरिता कदाचित संदर्भही पाहावा लागेल. अर्थ एकदाचा लागला तरी मनाचे समाधान न होता पंतांची कृत्रिमता मात्र ध्यानात येते. पंतांच्या भाषेची क्लिष्टता व दुर्बोधता या त्यांच्या हव्यासापायी निर्माण झाली आहे. यमकाच्या वा अनुप्रासाच्या नादात पंत अनेकदा घोटाळ्याची रचना करतात, अनेकदा अनावश्यक शब्द मध्येच घुसडतात व त्यामुळे अर्थाची मात्र हानी होते.

पंतांच्या अशा वृत्तीमुळे भाषा तर कृत्रिम बनतेच, पण अर्थाची ओढाताण औचित्यहानीपर्यंत होते. ‘ अन्य थान करीं ’ ( ३·४८ ) अथवा ‘ तोंड लेंक वित्या ’ ( ३·५१ ) अशा ग्राम्य व अशिष्ट शब्दांचा वापर त्यांना यमकासाठी करावा लागला हे उघड आहे. मूत, (१ ३४) हगती, मुतती ( ६·५० ) अशासारखे शब्द पंतांच्या काळात तरी काव्यात वापरण्याइतके शिष्टसंमत नसावेत. पंतांचा दृष्टान्तही काही वेळा कसा औचित्यहीन होतो पाहा. कामचुकार हेरांना पांडव कसे दिसले नाहीत ? हे सांगताना पंत कर्णाच्या मुखाने म्हणतात, ‘ न दिसति म्हणवुनि केवळ काय नसति गुर्जरीस कुच ? ’ ( २·१२ ) आणखी एका ठिकाणी, उर्वशीशी संग करण्याची इच्छा एखादा हिजडा स्वप्नात तरी करील काय ? ( १·१३३ ) असा प्रश्न केला आहे. पुढे तिसऱ्या अध्यायात अर्जुन उत्तराला समजावून सांगतो की, ‘ मी, शत्रुसैन्यावर झडप घालीन, कशी ? तर तरुणीप्रति जसा स्मरे तरुण ’ (३.११४) मदनाने जशी तरुणीवर झडप घालावी तशी !

पंतांच्या काव्यातील हे दोष त्यांच्या भाषासरणीमुळे निर्माण झाले आहेत. कधी कधी पंत आर्येचे बाह्यरूप सजविण्याच्या नादात अर्थाची मोडतोड झालेली सहन करतात. असे जरी असले तरी पंतांची भाषा अशुद्ध नाही, व्याकरणाच्या नियमांशी विसंगत नाही. आजच्या विभक्तिप्रत्ययां-

पैकी तृतीयाचे ' एं ' व ' हीं, ' व चतुर्थीचा ' ते ' व सप्तमीचे ' ईं ' व ' आं, असे काही प्रचारात नसलेले प्रत्यय मोरोपंत वापरतात. संस्कृतच्या पद्धती-नुसार पतिता जीवा, उग्रें, कोपें अशा उदाहरणात पंत विशेष्याची विभक्ती विशेषणाला लावताना दिसतात. वरी-पर्यंत, परि, परिस-पेक्षा, स्तवसाठी, कीं, कां अशी काही शब्दयोगी अव्यये पंतांच्या भाषेत आढळतात. करिजेल, भणिजेते, गणिजेल इत्यादी कर्मणीरूपे पंत वापरतात. गुरू, कवी, नदि, भाउ अशा शब्दांच्या वापरात पंत संस्कृत ऱ्हस्वदीर्घाकडे लक्ष देत नाहीत. आर्यावृत्ताच्या मात्राबंधनाचा हा परिणाम असावा. ज–झ, ऊ–वु, हि–ही, चि–ची, श–स, ळ–ल, ज–ज्य यांची अदलाबदलही आढळते. चलबद्दल चाल, माझ्याबद्दल माज्या, भाउ ऐवजी भावू अशाही शब्दांचा वापर पंत करतात. विष्णुला, नीजला, राजयाच्या इत्यादी शब्दांतील बदल वृत्ताच्या सोयीसाठी असल्यामुळे कवीला तेवढे स्वातंत्र्य द्यावयास हवे.

# १० | मुक्तेश्वर व मोरोपंत

मागे आपण पाहिले आहेच की, मराठीत महाभारतावर रचना करणारे तीन प्रमुख कवी प्राचीन परंपरेत होउन गेले. मुक्तेश्वर, श्रीधर व महीपती हे ते तीन कवी होत. श्रीधराने 'पांडवप्रताप' नावाचा ओवीबद्ध ग्रंथ लिहून कौरवपांडवांची कथा मराठीत आणली. मुक्तेश्वरचे महाभारत ओवीबद्धच असून तो एकनाथांचा नातू असल्याने काव्यहेतू त्याच्या मनात स्पष्ट असावा. सर्वसामान्य लोकांसाठी आपण महाभारतकथा मराठीत आणीत आहोत याचे भान मुक्तेश्वर व श्रीधर यांना होते. मुक्तेश्वर व मोरोपंत यांची तुलना त्यांच्या महाभारतरचनेवरून करण्याची पद्धत आहे. मुक्तेश्वरी भारत मोरोपंतांच्याप्रमाणे विस्ताराने नाही, सर्व पर्वेही उपलब्ध नाहीत. परंतु काव्याच्या दृष्टीने मुक्तेश्वराच्या भारतरचनेला फारच लोकप्रियता मिळालेली दिसते. त्याची लोकप्रियता त्या काळातही रसिकांना जाणवली होती. 'मुक्तेश्वरा मुक्तदशा। दिधली तुवां हृषीकेशा। पुरवून त्याची आशा। भारती टीका वदविली' (८) असा उल्लेख देवदासाने आपल्या 'संतमालिका' स्तोत्रात केला आहे. खऱ्या कवित्वाचा साक्षात्कार रसिक मनास आजही मुक्तेश्वराच्या महाभारतात दिसतो. मुक्तेश्वराने केलेली सृष्टिसौन्दर्याची वर्णने तर केवळ अप्रतीम आहेत. सहजसुन्दर भाषाशैली, प्रासादिक वाणी, यथार्थपणे झालेला रसपरिपोष, इत्यादी काव्य-गुणांनी मुक्तेश्वराची कविता नटलेली आहे. मोरोपंतांची क्लिष्टता व दुर्बोधता मुक्तेश्वरात फार करून नाही. म्हणूनच इतिहासाचार्य राजवाडे यांनी आपल्या 'मराठी छंद' या पुस्तिकेत लिहिले आहे, 'इतर अनेक कवींनी ओवी छंदात भारते रचिली आहेत, परंतु मुक्तेश्वराची धीर गंभीर रचना त्यांना साधलेली नाही. दोष ओवीबंधाचा नसून कर्त्याच्या प्रतिभा-

भावाचा आहे. ऐतिह्य प्रतिभा, नैतिह्य विषय व ऐतिह्य छंद या त्रयीची जेव्हा सांगड घडावी तेव्हा ऐतिह्य काव्य निर्माण होते. मुक्तेश्वराच्या भारताने जो ऐतिह्य ठसा वाचकाच्या मनावर उठविला जातो तो मोरोपंतांच्या भारतानेही उठत नाही. मोरोपंतापेक्षा मुक्तेश्वर कविप्रतिभेच्या दृष्टीने जो मोठा भासतो त्याचे मुख्य कारण हे आहे. महान् युद्धाची घनगर्जना व लहानशा चकमकीतील शस्त्रांचा खणखणाट, ह्यांतले जे अंतर तेच मुक्तेश्वराच्या ओवीत व मोरोपंतांच्या आर्येत भासमान होते.'

मुक्तेश्वर व मोरोपंत यांच्या भारतासंबंधी तुलनात्मक विचार करताना एक गोष्ट प्रामुख्याने ध्यानात घ्यावयास हवी की, मोरोपंतांचे सर्व भारत आज आपणांसमोर उपलब्ध आहे, तर मुक्तेश्वराचा अनुवाद फक्त पाच पर्वांपर्यंतच आपणांस वाचावयास मिळतो. मुक्तेश्वराचे विराटपर्व ९९१ ओव्यांचे तर मोरोपंतांनी ते ७४० आर्यांत आणले आहे. मोरोपंतांनी मूळ महाभारताचा कथाभाग मराठीत आणताना कसा व कोठे संक्षेप केला हे आपण मागे पाहिले आहे. मोरोपंत मूळ महाभारताच्या कथेचे सूत्र कोठेच सोडीत नाहीत, फार तर तात्त्विक चर्चेचा संक्षेप करतात. परंतु मुक्तेश्वर मात्र मूळ कथानकात नवा मजकूर घालण्याचे स्वातंत्र्य घेताना दिसतात. मूळ महाभारतात नसलेले प्रसंगही मुक्तेश्वर निर्माण करतात. कीचकवधाच्या प्रसंगी द्रौपदीने कंकाची केलेली कानउघडाणी, कीचकवधानंतर सुदेष्णने केलेला कीचकासाठी शोक, बृहन्नडेने उत्तरेला सैरंध्रीबद्दल सुदेष्णेकडे घातलेली मध्यस्ती, सैरंध्रीची उत्तरेने केलेली रदबदली, युधिष्ठिराची विराटाजवळची कृतज्ञता, उत्तरा–अभिमन्यूच्या विवाहाचे विस्तृतवर्णन; अशा काही प्रसंगांची स्वतंत्र निर्मिती मुक्तेश्वरांनी केलेली आहे मुक्तेश्वरकृत जीमूत-भीमयुद्ध ब्रह्मोत्सवातील नसून विराटराजाच्या घरी निघालेल्या मंगलकार्यातील आहे ! या प्रकरणीची हकीकतही पुष्कळशी भिन्न अशी मुक्तेश्वराने दिली आहे. मल्लविद्येचा अभिमान विराट राजास असल्यामुळे पुष्कळ मल्ल विराट राजाकडे आले. परंतु बल्लव सर्वांत श्रेष्ठ ठरत असे. या बल्लवाची खोड मोडण्यासाठी दुर्योधनाने जीमूत नावाचा

एक मल्ल पाठविला. त्याच्या पायात पांडवांच्या प्रतिमा त्यांच्या नावांसह होत्या ! जीमूत-भीम यांचे युद्धही मुक्तेश्वर विस्ताराने वर्णन करतात. उलट मोरोपंतांनी मात्र हा प्रसंग मागे सांगितल्याप्रमाणे एकाच आर्येत उरकला आहे.

मुक्तेश्वरांच्या विराटपर्वातील कीचक–अनुकीचकवधाची हकीकत चार अध्यायांतून आली आहे तर मोरोपंतांनी या सर्व कथाभागास एकच अध्याय दिला आहे. अनेक प्रसंगी मुक्तेश्वर पाल्हाळ लावतात, तर मोरोपंत संक्षेपाने उरकतात. उत्तरगोग्रहण मात्र मोरोपंतांनी विस्ताराने म्हणजे तीन-चार अध्यायांत वर्णन केले आहे, तर मुक्तेश्वर हा सर्व कथाभाग एकाच अध्यायात आणतात. पांडवांचे प्रकटीकरण व उत्तरा–अभिमन्यूविवाह यांसाठी मुक्तेश्वरांनी प्रत्येकी वेगळा अध्याय लिहिला असला तरी मोरोपंत या हकीकती एकाच अध्यायात सांगतात. उत्तरगोग्रहणातील वीररसाकडे मोरोपंतांचे अधिक लक्ष दिसते, तर कीचक–अनुकीचकवध, उत्तरा–अभिमन्यूविवाह यांसारख्या घटनांत मुक्तेश्वर अधिक काळ रमताना दिसतात. पाल्हाळाने वर्णने करणे, विशेषतः बाहुयुद्धांची मुक्तेश्वरांना अधिक प्रिय आहे. धौम्यऋषींनी पांडवांना केलेला उपदेश मोरोपंतांनी गाळला, पण मुक्तेश्वराने हा सेवकधर्म विस्तारून सांगितला आहे. रमतगमत जाताना मुक्तेश्वर निसर्गाचे वर्णन करतील, विवाहाच्या सोहाळ्याचा तपशील देतील, समकालीन राजकीय व सामाजिक चालीरीतींचा निर्देश करतील. त्यामुळे त्यांच्या कथानकाचा ओघ खुंटून राहातो. परंतु मोरोपंतांना कथासूत्र कायम ठेवावयाचे असल्याने ते अशा प्रकारच्या पाल्हाळात कोठेच रमत नाहीत. शृंगाररसवर्णनात मुक्तेश्वर वाहून जातात, मर्यादा सोडताना दिसतात. पंतांचा या बाबतीतील संयम उल्लेखनीय आहे. दोघांची भाषा संस्कृतप्रचुर असली तरी मुक्तेश्वराची अधिक प्रसादपूर्ण आहे. मुक्तेश्वरांची कल्पनाशक्ती मोरोपंतांपेक्षा प्रसंगी अधिक सतेज भासते. त्यांची काव्यवृत्ती अधिक विलोभनीय वाटते. मोरोपंतांच्या विराटपर्वाचे नमुने आपणांस माहीत आहेत. आता येथे तुलनेसाठी मुक्तेश्वरकृत नमुने थोडक्यात पाहू.

(१) भीम व कीचक यांच्या झोंबीचे मुक्तेश्वरकृत वर्णन–

हस्त धरूनी हासडिला । तंव कीचक झोंबिये मिसळला ।
दोघां संग्राम माजला । अत्यद्‌भुत ते काळीं ।। १४० ।।
अंतरें पाहे पांचाळी । तंव दोघे मिसळले केशकवळीं ।
मुष्टी मारितां वक्षःस्थळीं । धरातळीं थरकंपू ।। १४१ ।।
घाय घालिती परस्परें । दणाणती दिगंतरें ।
महाप्रसादांची शिखरें । खचोनी पडती धडधडा ।। १४२ ।।
लोक म्हणती, ' महामारी । कोठोनी पातली इये नगरीं ?' ।
कोण्ही न निघती बाहेरी । भयें अंतरीं दडाले ।। १४३ ।।
उडोनी हृदयीं मारिली लात । वक्षःस्थळीं मुष्ठिघात ।
पृष्ठीं ताडितां निघात । दणदणाट माजला ।। १४४ ।।
कोपर, हुमणिया, चपेट । ताडितां अस्थि होती कूट ।
कीचक म्हणे ' भरीन घोंट । मित्रावरुणासरिखा ' ।। १४५ ।।
भीम म्हणे, ' नृसिंहे तवकें । असुर विदारिला नखें ।
तैसें अंग एकूनएकें । छिन्नभिन्न करूनी टाकीन ' ।। १४६ ।।
शत्रु नवनागसहस्रबळीं । भीमें कवळितां कंठनाळीं ।
बळें ताडूनी बाहुबळीं । हस्त उखळोनी टाकिला ।। १४७ ।।
भिडतां नक्र आणि गजेंद्र । शरभपक्षी आणि मृगेंद्र ।
वृत्रासुर आणि देवेंद्र । मुळवैरी झुंजतां ।। १४८ ।।
महामाया महिषासुर । शंकर आणि अंधकासुर ।
हनुमंत आणि अखयाकुमर । अशोकवनीं ज्यापरी ।। १४९ ।।
पूर्वी सुग्रीव आणि वाळी । झुजिन्नले किष्किंधातळीं ।
तैसे कीचक आणि भीमबळी । युद्धकंदना मिसळले ।। १५० ।।
भीम म्हणे; आंगवणें । देऊनि, शेखीं जासी प्राणें ।
जैसीं व्याधाप्रती हरणें । शिंगें पुढां झाडिती ' ।। १५१ ।।
मागें सरोनी धांवती पुढें । हृदयीं धडका मारिती गाढे ।
एकमेकां इडेपाडे । महापर्वत पैं जैसे ।। १५२ ।।

यानंतर भीम जगजेठी । वर्मस्थळीं सहस्र मुष्टी ।
बळें ताडितां भूतटीं । मूर्च्छा दाटोनी पडियेला ॥ १५३ ॥
पुढती उचलोनियां शिरीं । भोवंडोनी टाकिला पृथ्वीवरी ।
सव्य पाय देवोनी उरीं । हस्त दोन्ही उपटिले ॥ १५४ ॥
अंगुष्ट रोवोनी नाभिस्थानीं । छेदोनी सांडिले चरण दोनी ।
शिर पिळोनियां धरणीं । भिन्न करूनी टाकिलें ॥ १५५ ॥
जैसा किरात शस्त्रघातें । चारी पाद, ग्रीवा, हातें ।
छेदोनिया कूर्मातें । भिन्न करी भक्षावया ॥ १५६ ॥
तैसे निवटोनी अस्थिजाळ । शिर केलें गोळांगुळ ।
सोडिले रक्ताचे खळाळ । नदीलोटासारिखे ॥ १५७ ॥

(२) सुदेष्णेजवळील सैरन्ध्रीला पाहून कीचकाची कृती—

अयोग्य स्थळीं कल्पलतिका । वृंदारकीनिकट कर्दाळका ।
देखोनी म्हैसा मारी थडका । माजोनिया ज्यापरी ॥ ४ ॥
अमृतवल्ली फळली फळीं । वनांत वाढली निराळी ।
पांथिक क्षुधेचिया काळीं । काष्टिका ताडिती निर्धारें ॥ ५ ॥
तेवीं सुंदर सगुण वनिता । आप्ता वेगळी परगृहीं वसतां ।
कामिकमेळ भोंवे भोंवता । हें आश्चर्य तंव नव्हे ॥ ६ ॥

(३) सुशर्म्याचे पांडवांशी युद्ध झाल्याचे वर्णन—

सुशर्मा वाहोनिया चाप । बाण सोडी अति अमूप ।
सहदेव खंडी जैसे सर्प । गरुडमुखें तडतडां ॥ ११० ॥
सुशर्म्याचे शरसंधान । जेवीं वांकुडी घाली घन ।
पांडवबाण प्रळयपवन । उडवोनी सांडी क्षणार्धें ॥ १११ ॥
कोटि पापांचे विशाळ द्रुम । कुठार विष्णुसहस्रनाम ।
तैसा तो पांडवोत्तम । शत्रुशस्त्रें विखंडी ॥ ११२ ॥
दरिद्रकाळींच्या कोटी आपदा । नासूनी सांडी धनसंपदा ।
तेवीं शत्रूची शरबाधा । माद्रीसुतें खंडिली ॥ ११३ ॥

निशाकाळींचीं उडुगणें । नाशिती येतां सूर्यकिरणें ।
तेवीं पांडूचिया नंदनें । शत्रुबाणातें खंडिलें ।। ११४ ।।

अप्रीतिकाळींचे कुशब्दू । नाशिती स्नेहाचे सुशब्दू ।
सुशर्म्याचीं शस्त्रें विविधू । नकुळानुजें छेदिलीं ।। ११५ ।।

स्मशान भूतांचिया कोटी । रात्रीं भासुर भासता दृष्टी ।
नृसिंहमंत्र जपतां ओठीं । जेवीं पळती दशदिशा ।। ११६ ।।

नानाविध भूताकृती । नाहींच करितीं ब्रह्मसंयुतीं ।
तेवीं शत्रुशरांचिया पंक्ती । शून्य केल्या सहदेवें ।। ११७ ।।

मुक्तेश्वर व मोरोपंत दोघेही आपापल्या परीने श्रेष्ठ कवी असले तरी प्रतिभेच्या सामर्थ्याच्या दृष्टीने जाणकार रसिक मुक्तेश्वरांना महत्त्व देतात. पण मुक्तेश्वर व मोरोपंत यांच्या पाच पर्वांचाच तुलनात्मक अभ्यास करून डॉ. नांदापूरकर आपल्या ' मुक्तमयूरांची भारते ' या ग्रंथात मोरोपंतांचा अनुवाद सरस असल्याचा निष्कर्ष काढतात. आजगावकरांनी मात्र मुक्तेश्वरी विराटपर्व श्रेष्ठ ठरविले आहे. पांगारकरांचा कौल कवित्वाच्या बाबतीत मुक्तेश्वरांच्या बाजूने आहे. मुक्तेश्वर व मोरोपंत यांच्या कवित्वासंबंधी दोन समीक्षकांचे अभिप्राय महत्त्वाचे असल्याने खाली दिले आहेत.

बाळकृष्ण अनंत भिडे आपल्या 'मुक्तेश्वरा'वरील निबंधात म्हणतात, ' मुक्तेश्वर व मोरोपंत हे दोघेही महाकवी होत. दोघेही सारखेच भगवद्भक्त, ईशसंकीर्तनलोलुप व कर्मनिष्ठ होते. दोघांचीही बुद्धी विशाल, निरीक्षण तिखट, विवेचकशक्ती सूक्ष्म, प्रतिभा उजळ, मनोवृत्ती सत्त्वस्थ परंतु जाज्वल्य, आणि कल्पना उदात्त. दोघांनाही संस्कृतप्राकृत वाङ्मयाचा बराच परिचय असून, दोघांनाही शब्दार्थालंकारांची, प्रौढ ऐटदार रचनेची, आणि भरघोस शब्दांची मोठी हौस, परंतु मुक्तेश्वरांच्या स्वैर व स्वच्छंदी वाणीला छंदोबंधने असह्य झालेली भासतात, तर मोरोपंतांची वाणी एखाद्या योगिनीप्रमाणे यमनियमांचे वेढे अधिकाधिक घट्ट

करण्यातच सुख मानिते, असे दिसते. मुक्तेश्वरांत बऱ्याच ठिकाणी अव्यव-स्थितपणा व प्रमाणशीरपणाचा अभाव हे आढळतात, तर मोरोपंतात बहुशः बातबेत व बांधेसूदपणा हे चमकतात. मुक्तेश्वरांचे काव्य म्हणजे शारदेचे एक भव्य गहन वन आहे, तर मोरोपंतांचे काव्य म्हणजे तिचे क्रीडोपवन आहे. एकामध्ये चंदन, वट, आम्र, निंब, इत्यादी गगनचुंबी विशाल वृक्षांच्या मध्येच लव्हाळ्यांची राने, खाजकुइलींची जुंबाडे, काटेरी झुडुपे, शुष्क पानांचा पसारा व सर्पादिकांना आश्रय देणारी जाळी आहेत, परंतु त्यातच वाळ्यांची गर्दी, मालती, मोगरी इत्यादिकांचे निसर्गकुंज, नव्या कुसुमांचा पेर, हीही आढळतात. अर्थात्, या गोंधळातही एक प्रकारची भव्यता, दिव्यत्व व चमत्कार ही आहेत, पण त्याबरोबरच कधीकधी एक-प्रकारे उद्वेग व रसभंग उत्पन्न होतात, हेही विसरता कामा नये. आता, दुसऱ्याकडे पहावे तो सर्वच थाट निराळा! काव्योद्यानातील रस्ते अगदी आखलेले! वृक्षलतांची मांडणी अगदी शिस्तवार! पुष्पांचा घमघमाट, ताटव्यांचा थाटमाट, पुष्पकरणींचे घाट, सुगंधोदकांचे पाट, पक्ष्यांचा किल-किलाट, हे सर्वच विलक्षण! आणि एवढे करूनही निसर्गसौंदर्याची छाया कायमच्या कायम! अशा प्रकारे निसर्गभिन्नास्पद गुणांची एकत्र सांगड घालणारा कारागीर अलौकिक सामर्थ्याचा नव्हे काय? मुक्तेश्वर भलीबुरी कल्पना जशी उद्भवेल तशी ठेऊन देणार, तर तिच्या ठिकाणी सुबकपणा आणून तिची योग्य मांडणी करावयाची हा मोरोपंती बाणा; एक व्याकरणनियमांना प्रसंगी धाब्यावर बसविणार, तर दुसरा त्यांची योग्य संभावना करून आतला हेतू यथास्थित साधणार; एक अक्षरगणमात्रा-दिकांच्या कोंदणांत शब्दरत्नांना प्रसंगी हालअपेष्टा करूनही कोंबणार, तर दुसरा कुशलपणाने विवेकाच्या चिमटयात योग्य रत्ने धरून, अनुरूप कोंदणातच ठेवून देणार; एक प्रचंड मल्लाप्रमाणे भुजदंड ठोकून प्रसंगी एकदम अंगबळानेच झुंजू पाहणार, तर दुसरा कसलेल्या पेहेलवानाप्रमाणे आपल्या अंगबळाला पाचापेचांची जोड देणार; एक सर्व बंधने तोडून आपल्या सामर्थ्याची प्रतीती देणार, तर दुसरा बंधने कायम ठेवून, किंबहुना वाढवूनही, कसरतीने आपले सामर्थ्य दाखवून वाचकास भुलविणार, एक

केवळ उंच भरारी किंवा लांब सराळी मारणार, तर दुसरा तसे करिताना सर्व प्रकारचे गतिविभ्रम दाखविणार ! '

मुक्तेश्वर व मोरोपंत यांच्या काव्याचा रसिकतेने व मार्मिकतेने अभ्यास करणाऱ्या ल. रा. पांगारकरांनी केलेली मुक्तेश्वर-मोरोपंत यांची तुलना तर सर्वप्रसिद्ध आहे. तिचा सारांश असा–

'मुक्तेश्वरांचे भागवत उपलब्ध नाही, रामायण अगदी किरकोळातले आहे, पण त्याच्या भारताची जी पाचच पर्वे उपलब्ध झाली आहेत, त्यांवरून पाहता कवित्वाच्या दृष्टीने मुक्तेश्वरांची बरोबरी कोणताही मराठी कवी करू शकणार नाही असे मला वाटते. मुक्तेश्वरांच्या वाणीत लोकोत्तर प्रसाद, दिव्य ओजस्विता व सृष्टिसौंदर्यवर्णनाची अनुपम शोभा दृष्टीस पडतात. मुक्तेश्वराने प्रबळ मनोवृत्तींच्या प्रचंड प्रवाहाबरोबर भारती आख्यानांची महानदी 'खळखळाट वाहविली'. पंतांनी दुतर्फा मनोहर घाट बांधून व जागोजाग उपवनांचे रम्य देखावे निर्माण करून त्या महानदीचा ओघ दोन्ही पात्रांमधून अचूक सोडून दिला आहे ! मुक्तेश्वरांची कविता एखाद्या खेडवळ पण कुलीन देशस्थ ब्राह्मणाच्या मुलीसारखी साधीभोळी, काळीसावळी, पण ठसठसीत, मोकळ्या मनाची व सशक्त अशी आहे; व मोरोपंतांची कविता ही सुस्वरूप, टापटिपीची व सुगरण अशा नगरवासी कऱ्हाडचाच्या मुलीसारखी आहे ! दोन्ही संपन्न, शुची व ईश्वरपरायण आहेत. पहिली वाटेल त्याला भुलविते, दुसरीला भुलणारा सुविद्य, रसज्ञ, नागरिकच पाहिजे. पहिलीच्या अंगावरची वस्त्रे उंची आहेत, पण ती कशीतरी घातली आहेत, दुसरीच्या वस्त्राभरणांत नीटनेटकेपणा विशेष आहे. पहिली आपल्या काळ्या पाणीदार डोळ्यांनी व सहज विलासांनी मोहील, दुसरी आपल्या नानाविध चेष्टांनी जिंकील. पहिलीची धिटाई व दुसरीची मर्यादशीलता, पहिलीचे अकृत्रिम हास्य व दुसरीचे मंदस्मित, पहिलीचे सहजप्रेक्षण व दुसरीचे कटाक्षक्षेप, पहिलीचा दांडगेपणा व दुसरीचा संभावितपणा–दोन्ही आपापल्या परीने मनमोहकच आहेत ! ! तथापि मुक्तेश्वरी भारती व मोरोपंती भारती यांचा विचार करिता

'दूरीकृता खलु गुणैरुद्यानलता वनलताभिः' या दुष्यन्ताच्या उक्तीचे स्मरण होते! असो. मोरोपंत स्वतः फार मार्मिक होते. त्यांना मुक्तेश्वरांची कविता पाहून फारच समाधान झाले. 'मुक्तेश्वराच्या कवितेच्या तोलाची कविता आपणास उत्पन्न करता येणार नाही असे वाटून मराठी कवि हतगर्व झाले,' असे त्यांनी म्हटले आहे–

मुक्तेश्वरकृत भारत आवडतें विठ्ठलासि, कीं पर्व।
सर्व श्रवणें हरितें आशा कविच्या, अशेषही गर्व !।।

मुक्तेश्वरांची कविता वाचणारे व त्याची स्तुति करणारे 'बंदी (भाट) लक्षावधि' आहेत असे सांगताना पंत म्हणतात–

श्री मुक्तेश्वर कविवर, त्यातें कोण न शुभेच्छु वंदील ?
बंदी लक्ष जयाचे, ज्याचें यश भव्य जेंवि मंदील ।।'

# ११ | आख्यानपरंपरेत मोरोपंत

मराठी आख्यानपरंपरेचा विकास कसा झाला हे आपण पहिल्याच प्रकरणात पाहिले. महानुभावांच्या उदयापासूनच ही आख्यानपरंपरा मराठीत सुरू झालेली दिसते. भास्करभट्ट बोरीकर, नरेन्द्र, दामोदरभट्ट, एकनाथ, मुक्तेश्वर, वामनपंडित, विठ्ठल, नागेश, रघुनाथपंडित, श्रीधर, महीपती, मोरोपंत अशी ही प्रमुख नावे गेल्या सहासात शतकांत आख्यानक कवींची म्हणून दिसतात. रामायण, महाभारत व भागवत इत्यादी प्राचीन संस्कृत कथाग्रंथांच्या आधारे या आख्यानक कवितेचा विस्तार झाला असल्याचे आपण पाहिले आहेच. आता या आख्यानकाव्याचे काही विशेष पाहून या परंपरेतील मोरोपंतांचे स्थान कोणते ते त्यांच्या गुणदोषांसह पाहू.

(१) आख्यानकाव्यात प्रामुख्याने गोष्टीचा, कथेचा भाग असल्याने याला कोणी कथाकाव्य असेही म्हणतात. आख्याने लिहिणारे मुख्यतः वृत्तीने पंडित असल्याने पंडिती अथवा पंत काव्य असाही निर्देश आख्यानकाव्याचा केला जातो. आख्यानक काव्य अथवा कविता असेही नामकरण या काव्याचे झाले आहे. या प्रकारची कविता लिहिणारे कवी जसे पंडित, विद्वान होते, त्याहून ते वृत्तीने कवी होते. कलावंत होते. म्हणून त्यांनी लिहिलेल्या या काव्यास कलाकाव्य अथवा विदग्ध काव्य असेही कोणी म्हणतात. पंडित म्हणजे पंत म्हणून पंतकाव्य या नावानेही या प्रकाराचा उल्लेख केला जातो.

(२) आख्यानकाव्याचा हेतूही बऱ्याच अंशांनी निराळा असतो. अध्यात्म, भक्तिप्रेम, तत्त्वचर्चा, आत्मसाक्षात्कार, वैराग्यनिरूपण इत्यादी हेतू संतकाव्याचे दिसून येतात. परंतु आख्यानकवितेत मात्र या तत्त्वनिरूपणापेक्षा देवादिकांच्या वा संतमहंतांच्या चरित्रकथा रंगवून, नटवून सांगाव्यात, हा एक उद्देश दिसतो. राम, कृष्ण, कौरवपांडव इत्यादींच्या

भावगम्य व रसाळ कथा बहुजनांसाठी सांगाव्यात, हाच हेतू आख्यानकवितेचा आहे. ' प्रेमळ भक्त जे अव्युत्पन्न त्यानें श्रवण करवाया '(हरिवरदा : ३५.१३) आपण कृष्णकथा सांगतो असे कृष्णदयार्णव म्हणतात. हे कथाकार लौकिक हेतू मनात धरीत असले तरी परमार्थविचार त्यांना अपेक्षित नव्हता असे नाही. ' वाटे चरित्र त्यांचें आपण कांहीं तरावया गावें ' असे मोरोपंत म्हणतात. देवादिकांच्या कथा गाऊन, वाचून, ऐकून आपण त्यांच्या समान व्हावे. भवसागर तरून जावे, या मानवी जन्माचे सार्थक करावे हाही आणखी एक उद्देश होताच. ' संतपूजनें देव। तुष्ट तसे वासुदेव ' या वृत्तीमुळे संतकथांनाही महत्त्व आले. ' बरवीं संतचरित्रें हो। पावन परम पवित्रें हो ' हा उद्धव चिद्‌घनाचा दंडक महत्त्वाचा मानावा लागेल.

(३) ही आख्यानकाव्ये अथवा कलाकाव्ये मुख्यत: दोन प्रकारची आहेत. पहिल्या प्रकारात रामायण, महाभारत, भागवत इत्यादी ग्रंथांच्या आधारे प्रदीर्घ कथानक घेऊन महाकाव्य वा खंडकाव्याच्या धर्तीवर मोठी रचना करणारे कवी येतात. या कवींनी सर्ग, अध्याय, प्रकरण इत्यादी विभागांत आपले प्रदीर्घ आख्यान निर्माण केलेले असते. नरेन्द्राचे 'रुक्मिणी-स्वयंवर, ' भास्करभट्टाचे, ' शिशुपालवध,' एकनाथांचे ' भावार्थरामायण ', त्यांचे ' भागवत ', त्यांचेच ' रुक्मिणीस्वयंवर ', मुक्तेश्वरांचे ' भारत ', श्रीधराचे ' हरिविजय ', ' रामविजय ' ' पांडवप्रताप ' इत्यादी ग्रंथ, महीपतीबोवांचे भक्तविजय, संतलीलामृत, भक्तलीलामृत, संतविजय इत्यादी ग्रंथ, रघुनाथपंडित, नागेश, विठ्ठल, इत्यादींची दीर्घ अशी स्वयंवर-काव्ये, आणि मोरोपंतांची रामायण, महाभारत व भागवत यांवरील दीर्घ काव्ये; इत्यादींचा समावेश या पहिल्या प्रकारात प्रदीर्घ कथाकाव्ये म्हणून होतो. दुसऱ्या प्रकारात लहान लहान प्रसंगांवरील स्फुट काव्ये येतात. या कथाकाव्य प्रसंगांनाही आधार वरील प्राचीन संस्कृत ग्रंथांचाच आहे. वनसुधा, नामसुधा, राधाविलास, मृत्तिकाभक्षण, अहल्योद्धार, भरतभाव, गजेंद्रमोक्ष, गोरसहरण, सीतास्वयंवर, सेतुबंध, नवरसचरित्र, गणिकोद्धार, सुलोचनागहिवर, वामनचरित्र, ध्रुवचरित्र, अंबरीषाख्यान इत्यादी शेकडो लहानमोठ्या पौराणिक प्रसंगांवर मराठी कवींनी लघुकाव्ये लिहिली आहेत.

(४) या आख्यानकाव्याचा आधार वरील संस्कृत कथात्मक ग्रंथ असले तरी मराठी आख्यानांचे रूप साकारताना संस्कृत विदग्ध काव्येही त्या कवींच्या डोळ्यासमोर असावीत. संस्कृत साहित्यशास्त्र, संस्कृत पंच-महाकाव्ये, हनुमन्नाटकासारखी नाटके इत्यादींचा अभ्यास या आख्यानक कवींचा होता. कालिदास, माघ, भारवी, श्रीहर्ष इत्यादी कवींच्या कलाकृतींत दिसणारे पांडित्य, कला, संस्कृती, नागरपणा मराठी आख्यानक कवींतही आढळतो. संतकाव्याचे वाचक व श्रोते थोडे निराळे व या पंडिती आख्यानक कवितेचे रसिक निराळे, असा भेद संस्कृतनिष्ठेमुळे पडला. श्रीधर, महीपती यांचा अपवाद सोडला तर बहुतेक सर्व पंडित कवींची आख्याने पांडित्याकडे झुकलेली आहेत. संस्कृत साहित्यातील रसाविष्कार, विविध अलंकार, शृंगाराची अतिरिक्त हौस, इत्यादी बाबी मराठी आख्यान-काव्यातही दिसू लागल्या. मराठी आख्यानकविता संस्कृतनिष्ठ बनून तिने आपला एक स्वतंत्र असा रसिक वर्गही निर्माण केलेला दिसतो.

(५) प्राचीन मराठी संतकाव्य प्रामुख्याने ओवी व अभंग या वृत्तांतून आहे. परंतु आख्यानकाव्य मात्र पुनः श्रीधर–महिपतींचा अपवाद वगळून संस्कृत वृत्तांतून साकारले आहे. पृथ्वी, शार्दूलविक्रीडित, शिखरिणी, मंदाक्रांता, भुजंगप्रयात, मालिनी, इत्यादी संस्कृत वृत्तांचा वापर आख्यान-कवी करताना दिसतात. चूर्णिका, सवाई, दिंडी, घनाक्षरी इत्यादी छंदांचाही वापर झालेला दिसतो. भिन्न भिन्न रसांतील प्रसंग भिन्न भिन्न वृत्तांतच उठावदार होतात, असा त्यांचा अनुभव होता. कथाकीर्तनप्रसंगी या आख्यानांचा उपयोग होत असल्याने नाना वृत्तांत विविध चाली देऊन कथा रंगविण्यासही ही वृत्ते उपयोगी पडली. द्वादशदलकमलबंध, मालाबंध, अश्वबंध इत्यादी नावांची चित्रकाव्यरचनाही या काळात झालेली दिसते. मोरोपंतांनी कुशलवाख्यान, कृष्णविजय, ( अध्याय ६४.६९ ) इत्यादींची रचना विविध श्लोकांनी केली आहे. मोरोपंतांनी लोकप्रिय केलेले आर्यावृत्त संस्कृतामधील गती वृत्ताच्या धर्तीवर आहे.

(६) आख्यानक कवितेचा आदर्श संस्कृत पंचमहाकाव्यांचा असल्या-मुळे तिचे बाह्यांगही संस्कृतनिष्ठ तर बनलेच, पण यमक, अनुप्रास, श्लेष

....६

इत्यादी शब्दालंकारांचाही लोभ तिला जडला. यमकांच्या नाना प्रकारांत ती रमली. बोजड अशा लांबलचक समासरचनेची रीत तिने मराठीत कायम केली. यमक व अनुप्रासाच्या नादात अनेक प्रसंगी ती क्लिष्ट, कृत्रिम व रसहीन बनत गेली. चंद्र, कमल, भ्रमर, चाफा, हंस इत्यादी पारंपारिक उपमानांत ती गुरफटून गेली. सजीवतेचे तेज कमी होत जाऊन ती नाना अलंकारांच्या भाराने अवजड बनली. तिच्यात व्याकरणशुद्धता आली, पण अर्थांची व पर्यायाने भावनेची ओढाताणही ती करू लागली. लालित्य, सौंदर्य, कलात्मकता, पांडित्य यांची प्रमाणबद्धता न राहून आख्यानक कविता रसहीनतेकडे झुकली,

(७) प्राचीन संतकाव्यात एखाद्या वेळी रचनेची सफाई नसेल, वृत्त-बंधने शिथिल असतील, पण मानवी जीवनाविषयी अपार ओढ त्याला आहे. हृदयाचा जिव्हाळा त्यात ओतप्रोत दिसतो. मानवी मनास शांत व स्थिर करण्यासाठीच संतकाव्याचा जन्म आहे. उलट आख्यानक कविता पांडित्या-कडे झुकल्यामुळे वर सांगितल्याप्रमाणे ती जीवनापासून वेगळी झाली. परंतु तिच्यातील कलाकुसर वाढली. सांकेतिकता, नियमबद्धता, प्रमाणबद्धता, साचेबंदपणा, परंपरेचा अभिमान, उच्च वा वरिष्ठ वर्गाचा आदर्श; या गुणांबरोबर पांडित्यप्रदर्शनाची हौसही वाढली. 'वेडें वाकुडें गाईन' ही वृत्ती आख्यानकवींच्या पंडिती काव्यास मान्य नाही.

(८) संतकवी जनतेच्या आश्रयावर होते. 'बुडतां हे जन न देखवे डोळां' म्हणून त्यांच्या मनात सर्वसामान्य लोकांविषयी कळवळा होता. परंतु पंडितांचे आख्यानकाव्य वरिष्ठ वर्गाची मर्जी संपादित करीत राहिले. संतकाव्य लोकाश्रयी, तर पंतकाव्य बहुतांशी राजाश्रयी बनले. धनिकांच्या आश्रयाने आख्यानक कविता वाढत गेली. रघुनाथ पंडित तंजावरकडे राजा-श्रयाखाली होते. आनंदतनय शहाजीचा गुरू होता. यशवंतराव कोकाटे नावाच्या सधन गृहस्थाचा आश्रय नागेशाला होता. मोरोपंत बारामतीच्या बाबुजी नाइकांच्या आश्रयाखाली होते. या आश्रित वृत्तीचाही थोडाफार परिणाम पंडिती काव्यावर झाला.

मराठी आख्यानकाव्याचे वरील सर्व विशेष मोरोपंतांच्या काव्यरचनेत वैपुल्याने सापडत असल्याने त्यांना आख्यानकवींचे वा पंडितकवींचे मुकुटमणी असे नाव मिळाले आहे. त्यांच्या आख्यानकवितेचे गुणग्रहण अनेकांनी आजपर्यंत केले आहे. मोरोपंत ह कवीच नव्हते, येथपासून ते एक थोर प्रकारचे महाकवी होते, येथपर्यंत त्यांच्याविषयी लोकांनी व समीक्षकांनी मते व्यक्त केली आहेत. या विविध मतांचे ओझरते दर्शन घेण्यापूर्वी पंतांच्या गुण-दोषांचा संक्षेपाने एकत्रित विचार येथे करू. पंतांच्या कवितेचे गुणवर्णन यापूर्वीच्या प्रकरणांतून अनेकदा ' विराटपर्वा'च्या संदर्भात आले आहे. येथे सर्वसामान्यपणे पंतकवितेचा विचार करावयाचा आहे.

प्रथमच एक गोष्ट नजरेत भरते ती अशी की, पंतांची कविता वैपुल्याने भरलेली आहे. जवळ जवळ पाऊण लाखावर कविता त्यांनी लिहिलेली आहे. लघुकाव्ये, स्फुट काव्ये, दीर्घ-प्रदीर्घ आख्याने, स्तोत्रे इत्यादी विविध प्रकारही त्यांच्या कवितेचे आहेत. ही सर्व कविता बहुधा कथात्मक आहे. यामुळे तीत कथेचे वा आख्यानाचे सारे गुण एकवटलेले दिसतात. कथानकाची गतिमानता, स्वभावपरिपोष, रसाविष्कार, अलंकारांची विपुलता व रचनेचा नेटकेपणा यांचे कसे दर्शन होते हे आपण विस्ताराने पाहिले आहे. पंतकवितेचा आणखी एक मोठा गुण म्हणजे ती अतिशय व्याकरणशुद्ध आहे. भाषेच्या शुद्धतेमधील काटेकोरपणा पंतकाव्याखेरीज इतरत्र कोठे आढळणार नाही. पंत वृत्तीने भक्तही असल्याने पांडित्याबरोबर भावप्रवणताही त्यांच्या कवितेत जाणवते. श्लोककेकावलीत तर त्यांनी आपली कवितासुता भगवंतालाच अर्पण केली आहे. पंत पंडित व भक्त असल्यामुळे त्यांच्या कवितेत दुर्बोधता जशी आहे तशी ती अनेक ठिकाणी प्रसादपूर्ण पण आहे. विराटपर्वातील अनेक ओव्या प्रसादपूर्ण, सहज, सुलभ व अर्थवाही आहेत असे दिसून येईल. पंतांची काव्यरचना इतकी ठाकठीक व देखणी असते की, त्यांना इतर बाबतींत दोष देणारे रा. श्री. जोगही आपल्या ' मराठी वाङ्मयाभिरुचीच्या विहंगमावलोकना'त म्हणतात, ' मोरोपंतांनी केलेल्या काव्यरचनास्वरूप देवपूजेचा थाट एखाद्या खानदानी घराण्यातील प्रौढ

माणसांच्या देवपूजेच्या थाटाप्रमाणे वाटतो. आपल्या पूजेची मूर्ती चांगली, सुंदर असावी, तिचा देव्हारा चांगला सुबक नक्षीदार असावा, पूजेची उपकरणी चांगली सोन्याचांदीची असावी, मूर्तीवरील दागदागिने चांगले किमतीचे असावे, वहावयाची गंध-फुले सुवासिक, निवडक असावी, असा कटाक्ष ज्याप्रमाणे अशा व्यक्तीचा असतो, तसाच तो पंतांच्या काव्यपूजेचा होता.' (पृष्ठ १४१–४२) पंतांचे वृत्तप्रभुत्व व भाषासौष्ठव अनेकांनी वाखाणिले आहे. पंतांनी भाषेला संस्कृतनिष्ठता देऊन ती भारदस्त व प्रौढ बनविली.

पंतांच्या कवितेचे बाह्यांग अतिशय नेटके व आकर्षक आहे. संस्कृत गीतावृत्तास आर्येचे रूप देऊन पंतांनी आर्या भारदस्त व लोकप्रिय बनविली. नामसुधाचषकात त्यांनी आर्यावृत्तावरच दहा आर्या केल्या आहेत. शंकरांनी ती प्रथम छंदःशास्त्रात पिंगलांना शिकविली व त्यांच्यापासून ती आपण शिकलो असे त्यांनी म्हटले आहे. आर्याभागीरथी आपणच प्रथम मराठीत आणली असा सार्थ अभिमान व्यक्त करताना पंत म्हणतात,

**प्रकटी प्रथम भगीरथ नृपलोकीं सुरनदीस ती आर्या ।**
**तसि हे मयूर नाहीं तरि सर्वांना न दीसती आर्या ।। (१११)**

पंतांच्या आर्येवर रसिक श्रोते व कीर्तनकार सर्वच खूष असलेले दिसतात. पंतांच्या आर्येतील शब्दरचनेचे सौष्ठव, यमक-अनुप्रासादी शब्दचमत्कृतींचा विलास, भारदस्त समासरचना, व्यक्तिरेखेचा उत्तम परिपोष, स्वभावचित्रणातील मार्मिकता, कल्पनायुक्त रचनाकौशल्य व अलंकारांचा समर्पक उपयोग, सुभाषितवजा म्हणींचा योग्य ठिकाणी वापर, पात्रानुरूप भाषेची योजना आणि विविध रसांचा आविष्कार; हे पंतांच्या आर्येचे वा कवितेचे महत्त्वाचे गुण मानावे लागतील.

मोरोपंतांच्या कवितेचे समीक्षण करताना जाणत्या रसिकांनी त्यांच्या दोषांचाही निर्देष केलेला आहे. त्यांची कविता दुर्बोध आहे, क्लिष्ट आहे, संस्कृतमधील लांबलांब समासांनी अवजड बनलेली आहे, असे आरोप पंतकाव्यावर घेतले गेले आहेत. यमक, अनुप्रास व श्लेष इत्यादी शब्दचमत्कृतींच्या नादात पंतकवितेस क्लिष्टत्व आले असल्याचे समीक्षक म्हणतात.

पंतकाव्य फार थोड्या प्रमाणात सोपे व प्रसादपूर्ण आहे. त्यांच्या काळीही त्यांचे काव्य क्लिष्टतेमुळे सर्वसामान्यांना दुर्बोध राहिले. हा आक्षेप वरील विहंगमावलोकनात घेताना रा. श्री. जोग म्हणतात, 'संस्कृत वाचावयास परिश्रम करावे लागले तरी कोणी तक्रार करणार नाही; परंतु स्वभाषेतील काव्य वाचावयास दुसऱ्या भाषेतील व्युत्पत्ती आवश्यक असणे हे काही प्रसादगुणाचे द्योतक नव्हे. त्याला क्लिष्टत्व हेच नाव द्यावे लागेल. पंतांचे काव्य वाचताना अर्थाकरिता मधून मधून अडखळावे लागते. खाली दिलेल्या अर्थ सांगणाऱ्या टीपा पाहाव्या लागतात. प्रत्येक आर्या फोडून लावावी लागते असे नाही; पण डोके फार जागृत ठेवावे लागते. लीलया, झटती अर्थ प्रतीती होत नाही.' (पृष्ठ १४८) यमकासक्ती हा एक दोष सर्व पंत-काव्यास व्यापून टाकणारा आहे. या यमकासक्तीमुळे पंतकाव्यात श्रुतिकटुत्व, दूरान्वय, निरर्थकत्व, ग्राम्यता, अनुचितार्थत्व; इत्यादी दोष निर्माण होत असल्याचे जोग सांगतात. पंतांच्या काव्याचा आणखी एक दोष सांगताना ते म्हणतात, त्यांना सौन्दर्यदृष्टी नव्हती ! त्यांच्या उपमा समर्पक असल्या तरी त्या सुंदर नसत. त्यांच्या मते मोरोपंतकृत अलंकारही कविप्रतिभानिर्मित नसून नुसत्या कारागिरीचे वाटतात. पंतांच्या 'विराटपर्वा'चे जे विवेचन आपण आतापर्यंत केले आहे त्यावरून रा. श्री. जोग यांच्या या मताची परीक्षा ज्याने त्याने स्वतंत्रपणे करावी हे योग्य होईल. अलीकडे म. सा. परिषदेतर्फे प्रसिद्ध झालेल्या 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' खंड तीनमध्ये त्यांनी पंतकवितेवर हेच आक्षेप घेतले आहेत.

पंतांच्या अवाढव्य कवितासमुद्राकडे पाहाताना वरील दोष ठायी ठायी सापडणारे असले तरी अनेकदा रम्य स्थळेही आढळतात. सहज-सुंदर अशा उपमा व उत्प्रेक्षा पंत देताना दिसतात. प्रसादपूर्ण अशा आर्यांची अनेक उदाहरणे पंतकाव्यात भरपूर सापडतील. अनेक ठिकाणी रसोत्कट-तेचा अनुभव येत राहील. आपली कविता सर्वस्वी निर्दोष आहे असे पंतांनाही वाटत नसावे. मंत्ररामायणात प्रारंभीच त्यांनी म्हटले आहे,

**कोठें दूरान्वित पद, कोठें चुकली असेल यतिमात्र ।**
**अतिमात्र दोष ऐसे, न वदोत कवी समस्तगुणपात्र ॥ (१९)**

पंत स्वतःच कबूल करतात की, आपल्या कवितेत कोठे दूरान्वय असेल, कोठे यतिभंग असेल; पण हे दोष फार आहेत अशी हकाटी कोणी करू नये. पंतांच्या काळाचा संदर्भ लक्षात घेता त्यांच्या क्लिष्टतेचा अथवा दुर्बोधत्वाचा थोडाफार परिहार होईल असे वाटते.

मोरोपंतांच्या यशस्वितेचे एक मोठे गमक म्हणजे त्यांची आर्यारूप कविता त्यांच्या हयातीतच लोकप्रिय झालेली होती. कथाकीर्तनकारांकडून त्यांच्या कवितेला सतत मागणी होती. त्यांचे अनुकरण करणारे व त्यांची स्तुती करणारे त्यांना स्वतःच्या हयातीतच लाभले होते. ब्रह्मावर्तापर्यंत त्यांच्या कवितेचा लौकिक पसरला होता. 'विराटपर्वा'तील शेवटच्या दोन आर्यांसंबंधी असे सांगतात की, काशीतील संस्कृत पंडितांनी पंतकाव्याची शलाका-परीक्षा केली तेव्हा या दोन आर्या निघाल्या; व त्यांतील अर्थाने रसिक परीक्षक संतुष्ट झाले. पंतांच्या काळातच रामजोशी, मैराळबोवा, विठोवा ताहराबादकर इत्यादी कीर्तनकार पंतांच्या आर्येवर कथा करीत असत. रामचंद्र बडवे यांनी तर 'आर्या मयूरपंतांची' हा पंतांचा लौकिक कायम केला. हरिकथारूपी भगवंताच्या देहावर पंतांनी आपल्या आर्यांचे अलंकार चढवून त्याची शोभा वाढविली असे त्यांचे म्हणणे. तेच आणखी पुढे म्हणतात,

**सुस्वरकंठें रसिकें आर्या गातां मयूरबावाची ।**
**वेधी सुजनमनातें, न तशी धुन ऐकतां रबाबाची ॥**

रबाब म्हणजे एक तंतुवाद्य. याच्या धुनेपेक्षा पंतांची आर्या सुस्वर वाटत होती ! पंतांच्या नंतरही अनेक कीर्तनकारांनी पंतांच्या आर्येवरच आपली कीर्तने रंगविली आहेत. चिंतामणी जोशी, धुंडिराज व त्यांचा पुत्र, मोरेश्वर, विठ्ठल केरीकर, परशुराम बच्याजी ढवळे, गणेशशास्त्री लेले, बापुसाहेब कुरुंदवाडकर, विठोबा अण्णा कऱ्हाडकर, गोविंदराव कानेटकर इत्यादी नंतरच्या कवींनी मोरोपंतांविषयीचा आपला नितान्त आदर व्यक्त करून नंतरच स्वतः आर्यारचना केली आहे.

मोरोपंतांच्या काव्याला दूषण देणाऱ्या आधुनिक चिकित्सक पंडितांचाही येथे निर्देश करायला हवा. कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी पंतांना 'यमक्या अशीच पदवी बहाल केली आहे. न्यायमूर्ती रानडे हे केकावलीवर टीका करताना पंतांना दूषण देतात. पंतांनी देवाशी फाजील सलगी केली म्हणून रानडे पंतांना नावे ठेवतात. त्यांचे काव्य रानडे यांना कृत्रिम वाटते. 'राजा शिवाजी' या आपल्या कवितेत महादेव मोरेश्वर कुंटे पंतांच्या कवितेस नाक मुरडतात. डॉ. विल्सनने पंतांच्या कवितेवर कृत्रिमतेचा आरोप केला आहे. पु. ग. सहस्रबुद्धे तर पंत हे कवीच नव्हेत येथपर्यंत मजल मारतात. पंतांच्या या दूषकांना उत्तरे देणारेही याच काळात पुढे सरसावलेले दिसतात. परशुरामपंत गोडबोले यांनी 'नवनीता'त लिहिले आहे की, 'प्राकृत कवितेत मोरोपंतांच्या कवितेसारखी कविता नाही.' याच सुमारास दादोबा पांडुरंग तर्खडकरांनी केकावलीवर 'यशोदा पांडुरंगी' नावाची टीका लिहून लोकांचे लक्ष पंतकाव्याकडे वेधून घेतले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी तर आपल्या 'निबंधमाले'त 'मोरोपंताची कविता' या लेखमालेत पंत-काव्याचे रसग्रहण करून 'मोरोपंतांचे काव्य वाचून रसिक अधिक सहृदय बनतो' असा अभिप्राय ते देतात. मोरोपंतांची कविता केवळ भाषांतररूपाची होती काय ? पंतांना कवी म्हणता येईल काय ? पंतांच्या कवितेवरील आक्षेपांचे निराकरण कसे करता येईल ? पंतांचा यमकहव्यास कवित्वास किती बाधक आहे ? इत्यादी प्रश्न उपस्थित करून चिपळूणकरांनी पंत-दूषकांचा समाचार घेतलेला आहे ! अगदी अलीकडच्या काळात ल. रा. पांगारकर यांनी 'मोरोपंत : चरित्र व काव्यविवेचन' व श्री. ना. बनहट्टी यांनी 'मयूरकाव्यविवेचन' या ग्रंथांत पंतांच्या काव्यकर्तृत्वाचे सहृदयतेने परीक्षण केले आहे. इंदूरचे बाळकृष्ण मल्हार हंस, मुंबईचे बाबाजी अनंत तेंडोलकर, वामनरावजी ओक, श्रीधर विष्णू परांजपे, बाळकृष्ण अनंत भिडे, शि. म. परांजपे, चि. वि. वैद्य, न. चिं. केळकर, के. ना. वाटवे, द. वा. पोतदार, ना. गो. नांदापूरकर इत्यादी अनेक समीक्षकांनी व रसिकांनी पंतकाव्याचे दोष मान्य करून त्यांच्या कवितेचा यथार्थपणे गौरव केला आहे. या सर्व गौरवापेक्षा पंतसमकालीन रसिकांनी केलेला पंतगौरव

अधिक मोलाचा मानावा लागेल. बापूसाहेब कुरुंदवाडकरांनी शके १७९९ मध्ये गणेशपुराणार्या नावाचा एक ग्रंथ लिहिला. त्याच्या उपसंहारात ते म्हणतात,

केविं नवा कवि आर्यापद्धति पंता न जे मयूराला ! ।
दाविला गायक कैसा ठावी नच तान जे मयूराला ? ॥
पंतोच्छिष्टचि सारें उपमा यमकें सुवेष सुरसत्व ! ।
लिहिलें ग्रंथीं परि म्यां स्तविला श्रीमद्गणेश सुरसत्व ।।

---

परिशिष्ट : २

## अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१ : विराटपर्व – सं. वा. दा. ओक व बा. अ. भिडे.

२ : विराटपर्व – सं. म. ना. अदवंत.

३ : मोरोपंत : चरित्र आणि काव्यविवेचन – ल. रा. पांगारकर.

४ : यशोदापांडुरंगी (केकावलिटीका) – दादोबा पांडुरंग.

५ : केकादर्श – परशुरामपंत तात्या गोडबोले.

६ : ' मयूर कवि ' मासिक – बाबाजी अनंत तेंडोलकर.

७ : केकावली (प्रस्तावना) – श्री. वि. परांजपे.

८ : मोरोपंतांवरील निबंध – वा. म. हंस.

९ : मोरोपंताची कविता (निबंधमाला) – वि. कृ. चिपळूणकर.

१० : मयूरकाव्यविवेचन – श्री. ना. बनहट्टी.

११ : मोरोपंतांचे समग्र ग्रंथ (प्रस्तावना) – सं. रा. द. पराडकर.

१२ : मोरोपंतांचे समग्र ग्रंथ-स्फुटकाव्ये – सं. अ. का. प्रियोळकर.

१३ : मुक्तमयूरांची भारते – ना. गो. नांदापूरकर.

१४ : मराठी वाङ्मयाचा इतिहास – सं. रा. श्री. जोग.
खंड तिसरा – म. सा. प. पृष्ठे १९० – २९६

---

आ

प्रो

ग्रंथालय ठाणे
2903
23352
निबंध

REFBK-0023352